## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २७६व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **१२ सप्टेंबर, २०२३ (मंगळवार)** |
| **वेळ** | **:** | **सकाळी ११.३० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष<br>६वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२.** |

**उपस्थित सदस्य:**

| | | |
|---|---|---|
| श्री. मनोज सौनिक<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बाँठिया | - | सदस्य |
| श्रीमती वल्सा नायर सिंग<br>अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री. असीम गुप्ता<br>प्रधान सचिव (१)<br>नगर विकास विभाग<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| डॉ. संजय मुखर्जी<br>महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित:**

श्री. नितीन करीर
अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

डॉ. के.एच.गोविंद राज
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री. आशिष शर्मा
अतिरिक्त महानगर आयुक्त
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. अश्विन मुदगल
अतिरिक्त महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. प्रमोद आहुजा
संचालक (कामे),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. भद्रगौंड बसवराज
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. सुनिल वांढेकर
प्रमुख अभियांत्रिकी,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. शंकर देशपांडे
प्रमुख,
नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. प्रदीप यादव
प्रमुख,
नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. आ.पं.नागरगोजे
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. चंदन शिरसाट
सचिव, कार्यकारी समिती

कार्यकारी समितीच्या बैठकीस उपस्थित मा. श्री. मनोज सौनिक, मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत व अभिनंदन केले.

श्री. अनिल डिग्गीकर, व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांचे ‘पदसिध्द सदस्य’ तसेच डॉ.के.एच.गोविंदा राज, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग यांचे ‘पदसिध्द निमंत्रित’ सदस्य म्हणून स्वागत केले.

श्री. एस.व्ही.आर.श्रीनिवास, तत्कालीन महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी कार्यकारी समितीचे 'पदसिध्द सदस्य' म्हणून तसेच डॉ. सोनिया सेठी, तत्कालीन प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग यांनी कार्यकारी समितीचे 'निमंत्रित-सदस्य' म्हणून बजाविलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०४ मे, २०२३ रोजी झालेल्या २७५व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०४ मे, २०२३ रोजी झालेल्या २७५व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यकारी समितीने कार्यवाही अहवालाची नोंद घेतली.

**बाब क्र. ३: मुंबई मेट्रो २ब (डी.एन.नगर ते मंडाळे) या मेट्रो मार्गावरील डायमंड गार्डन ते मंडाळे दरम्यानच्या पाच (५) उन्नत मेट्रो स्थानकांच्या (डायमंड गार्डन, शिवाजी महाराज चौक, बीएसएनएल मेट्रो, मानखुर्द व मंडाळे) छताची (PEB) व आर्किटेक्चरल फिनिशिंगची (अंतर्गत व बाह्य) कामे करणेसाठी कंत्राटदाराच्या नियुक्तीबाबत.**

३.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले कि, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि.१७ मार्च २०१६ रोजी झालेल्या १३९व्या बैठकीत तसेच २५ ऑक्टोबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मेट्रो मार्ग २ब (डी एन नगर - मंडाळे) या उन्नत मेट्रो मार्गाच्या अंमलबजावणीसाठी रु.१०,९८६/- कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता दिली आहे. राज्य शासनाने सदरच्या मेट्रो प्रकल्पास "निकडीचा सार्वजनिक प्रकल्प" व "महत्वपूर्ण नागरी परिवहन प्रकल्प" म्हणून घोषित केले आहे.

३.२ मेट्रो मार्ग २ ब प्रकल्पासाठी साधारण सल्लागार म्हणून मे. आयका कॉन्सॉरटीयम (AICA Consortium) यांची दिनांक ०५ ऑक्टोबर २०१६ रोजी नेमणूक करण्यात आली आहे. मेट्रो मार्ग २ब च्या मार्गावरील, डायमंड गार्डन ते मंडाळे या मेट्रो मार्गाचे स्थापत्य बांधकाम मे. एनसीसी लिमिटेड यांचेतर्फे करण्यात येत असून सदरची स्थापत्य कामे प्रगतीपथावरअसून

आजमितीस सुमारे ७०% काम पूर्ण झाले आहे. सदर मेट्रो मार्गाच्या स्थापत्य बांधकामाच्या कंत्राटदारांच्या कामाच्या व्याप्तीमध्ये आर्किटेक्चरल फिनिशिंग आणि छताची (Pre - Engineered Building) कामे समाविष्ट नसल्यामुळे, ही कामे स्वतंत्र निविदा मागवून करणे प्रस्तावित आहे.

सदरहू मेट्रो मार्गावर डायमंड गार्डन ते मंडाळे दरम्यान एकूण ५ उन्नत मेट्रो स्थानके येत असून सदरच्या मेट्रो स्थानकांसाठी विषयांकित ई-निविदेत छताची (Pre-Engineered Building) कामे, प्लॅटफॉर्म स्तरावर व प्रवेश निर्गमनाची छताची निर्मिती आणि उभारणी इत्यादींचा तसेच आर्किटेक्चरल फिनिशिंगच्या कामात फरशीचे कामे, अंतर्गत आणि बाह्य आर्किटेक्चरल फिनिशिंग, दर्शनी भागाचे फिनिशिंग आणि प्लंबिंग कामे इत्यादींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक व निविदा संच तयार करणे, निविदेची तांत्रिक व आर्थिक बोलीची छाननी इ. कामे प्रकल्पाच्या साधारण सल्लागारामार्फत करण्यात आली आहेत.

३.३ विषयांकित कामाकरिता, ई-निविदा मागविण्यासाठी दैनिक सकाळ (मराठी) व "Hindustan Times" (इंग्रजी) या वृत्तपत्रात दिनांक २८/१२/२०२२ रोजी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती व महाराष्ट्र सरकारच्या Maha-Tender या ई-निविदा संकेतस्थळावर देखील उपलब्ध करण्यात आली.

सदरच्या प्रकल्पाच्या निविदेची अंदाजित रक्कम रु.१००.३० कोटी (सर्व करांसह वस्तू व सेवाकर वगळून) इतकी असून पूर्वी केलेल्या कामांचा अनुभवासाठी पात्रता निकष खालीलप्रमाणे आहेत.

१. एक काम – निविदेच्या रकमेच्या ८०% (रु.९४.६८ कोटी)

२. दोन कामे – निविदेच्या रकमेच्या ५०% (रु.५९.१८ कोटी)

३. तीन कामे – निविदेच्या रकमेच्या ४०% (रु.४७.३४ कोटी)

निविदा प्रक्रियेमध्ये केंद्र सरकारच्या दि.१२/११/२०२० च्या मार्गदर्शक सूचनेनुसार सुरक्षा रक्कम (Performance Security) ३% घेणे या बाबीचा अंतर्भाव करण्यात आला. निविदा पूर्व बैठक दिनांक १७/०१/२०२३ रोजी घेण्यात आली. निविदा पूर्व बैठकीत व तद्नंतर उपस्थित केलेल्या मुद्यांचे स्पष्टीकरण महाराष्ट्र सरकारच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख २१/०२/२०२३ होती.

३.४ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, दिनांक २३/०२/२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता लिफाफा ‘अ’ (निविदा किंमत) व ‘ब’ (तांत्रिक प्रस्ताव) निविदाकारांच्या उपस्थितीत उघडण्यात आले, ज्यामध्ये खालील निविदाकारांनी ई-निविदा प्रस्ताव सादर केले.

१. मे. अहलुवालिया काँट्रॅक्टस (इंडिया) लिमिटेड
२. मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड

३.५ प्राप्त ई निविदांच्या पात्रतेची तांत्रिक छाननी साधारण सल्लागारामार्फत करण्यात आली. सदर छाननीचा अहवाल निविदा शिफारस समितीस सादर करण्यात आला. सदर समितीने शिफारस केल्याप्रमाणे निविदाकारांचा पात्र/अपात्रतेचा अहवाल खालील प्रमाणे आहे:

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | शेरा |
|---|---|---|
| १ | मे. अहलुवालिया काँट्रॅक्टस (इंडिया) लि. | पात्र |
| २ | मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड | पात्र |

तद्नंतर दिनांक २६/०४/२०२३ रोजी अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निविदा शिफारस समितीच्या बैठकीत तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाकारांचा लिफाफा ‘क’ उघडण्यासाठी शिफारस करण्यात आली. त्यानुषंगाने तांत्रिकदृष्टया पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा ‘क’) दिनांक २८/०४/२०२३ रोजी उघडण्यात आले. उपरोक्त प्रमाणे प्राप्त आर्थिक देकाराची (लिफाफा ‘क’) छाननी साधारण सल्लागारामार्फत करण्यात आली. सदर छाननीचा अंतिम अहवाल सल्लागाराने दिनांक १८/०५/२०२३ रोजी सादर केला. सदर अहवालानुसार निविदाकारांच्या आर्थिक देकारांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | निविदेची रक्कम (रु. कोटी) (सर्व करांसह वस्तू व सेवाकर वगळून) | प्राप्त देकार (रु. कोटी) (सर्व करांसह वस्तू व सेवाकर वगळून) | % अधिक/ कमी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. अहलुवालिया काँट्रॅक्टस (इंडिया) लि. | १००.३० | ११७.७९६ | (+) १७.४४% | लघुत्तम २ |
| २ | मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड | | ९९.२९७ | (-) १.००% | लघुत्तम १ |

३.६ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सामान्य सल्लागार यांच्यामार्फत सादर करण्यात आलेला वित्तीय छाननी अहवाल अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली

निविदा शिफारस समितीस सादर करण्यात आला. निविदा शिफारस समितीने दिनांक १९/०५/२०२३ रोजी लघुत्तम निविदाकार मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड यांनी निविदा रकमेपेक्षा १.००% कमी दराने सादर केलेला रु.९९,२९,७१,०००/- (अक्षरी रुपये नव्व्याण्णव कोटी एकोणतीस लक्ष एकाहत्तर हजार फक्त) (सर्व करांसह वस्तू व सेवाकर वगळून) किंमतीचा आर्थिक देकार स्विकारण्याची शिफारस केली आहे.

३.७ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई मेट्रो २ब (डी एन नगर ते मंडाळे) या मेट्रो मार्गावरील डायमंड गार्डन ते मंडाळे दरम्यानच्या पाच (५) उन्नत मेट्रो स्थानकांच्या (डायमंड गार्डन, शिवाजी महाराज चौक, बीएसएनएल मेट्रो, मानखुर्द व मंडाळे) छताची (PEB) व आर्किटेक्चरल फिनिशिंगची (अंतर्गत व बाह्य) कामे करणेसाठी (सीए-१५८) साठी मागविण्यात आलेल्या ई-निविदेत मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड यांनी निविदा रकमेपेक्षा १.००% कमी दराने सादर केलेला रु.९९,२९,७१,०००/- (अक्षरी रुपये नव्व्याण्णव कोटी एकोणतीस लक्ष एकाहत्तर हजार फक्त) (सर्व करांसह वस्तू व सेवाकर वगळून) किंमतीचा आर्थिक देकार हा लघुत्तम आहे. सदर देकार निविदेतील सर्व अटींचे व शर्तीचे पालन करणारा तसेच रास्त व वाजवी असून कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**निर्णय: सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्रमांक : १४५६**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मुंबई मेट्रो २ब (डी एन नगर ते मंडाळे) या मेट्रो मार्गावरील डायमंड गार्डन ते मंडाळे दरम्यानच्या पाच (५) उन्नत मेट्रो स्थानकांच्या (डायमंड गार्डन, शिवाजी महाराज चौक, बीएसएनएल मेट्रो, मानखुर्द व मंडाळे) छताची (PEB) व आर्किटेक्चरल फिनिशिंगची (अंतर्गत व बाह्य) कामे करणेसाठी (सीए-१५८) मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड यांनी निविदा रकमेपेक्षा १.००% कमी दराने सादर केलेला रु.९९,२९,७१,०००/- (अक्षरी रुपये नव्व्याण्णव कोटी एकोणतीस लक्ष एकाहत्तर हजार फक्त) (सर्व करांसह वस्तू व सेवाकर वगळून) किंमतीचा आर्थिक देकार लघुत्तम असून सदरच्या लघुत्तम देकाराची ई-निविदा

स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ४ : मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाच्या मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प मेट्रो मार्ग–६ च्या संरेखनालगत लिंक रोड, अंधेरी (पश्चिम) ते पुनम नगर (JVLR) पर्यंत उड्डाणपुलाचे (मिसिंग लिंक्स) संकल्पचित्र व बांधकाम करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) सेवांसाठी (पॅकेज सी.ए.-१९७) मागविण्यात आलेल्या ई-निविदेसाठी मंजूरी देणेबाबत.**

४.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले कि, मेट्रो मार्गिका - ६ ही मुंबई शहरासाठी मेट्रो प्रणालीचा भाग असून ही मार्गिका पश्चिम उपनगरातील स्वामी समर्थ नगर, लोखंडवाला, अंधेरी (पश्चिम) ला पूर्व उपनगरातील विक्रोळी आणि कांजूरमार्ग यांना जोडण्याचे काम करते. ही मार्गिका प्रामुख्याने जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोडवरून (JVLR) धावणार असून पूर्णपणे उन्नत असणार आहे. या मार्गिकेचे बांधकाम दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC) आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांच्यातील सामंजस्य कराराद्वारे (MoU) पूर्ण करण्यात येत आहे.

मेट्रो मार्गिका ६ च्या संरेखनासोबतच, बृहन्मुंबई महानगरपालिकेने न्यू लिंक रोड (New Link Road) ते पूनम नगर, महाकाली (JVLR) पर्यंत उड्डाणपुल प्रस्तावित केला होता. त्यापैकी बृहन्मुंबई महानगरपालिकेने स्वामी विवेकानंद रोड (S. V. Road) ते लक्ष्मी नगर, जोगेश्वरी (पू) पर्यंत उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण केले असून सदर उड्डाणपुल सन २०१५ मध्ये वाहतुकीस खुला करण्यात आला, ज्याला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुल असे नाव देण्यात आले आहे.

तथापि, मेट्रो आणि उड्डाणपुलाचे संरचनेची रचना (Structural Design) आणि बांधकाम अनुक्रमे (Construction Sequence) यांचा परस्परावलंबन आणि परिणामी उर्वरित उड्डाणपुल पूर्ण होण्यास होणारा विलंब लक्षात घेऊन उड्डाणपुल आणि मेट्रो प्रकल्पांमध्ये समन्वय राखण्यासाठी, बृहन्मुंबई महानगरपालिकेने उर्वरित उड्डाणपुलांचे बांधकाम पूर्ण करण्याची जबाबदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे दिली.

..८/-

सदर प्रकल्पासाठी लागणाऱ्या एकूण रक्कमेपैकी (रु. ७६८.८६ कोटी) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ५० टक्के आगाऊ रक्कम रु. ३८४.५० कोटी प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आली आहे.

मेट्रो मार्गिका - ६ चे बांधकाम दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (DMRC) पूर्ण करण्यात येत असल्याकारणाने उर्वरित उड्डाणपुलापैकी मेट्रो आणि उड्डाणपुलाचा ओव्हरलॅपिंग (Overlapping) भाग पूर्ण करण्याची जबाबदारी दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC) ला देण्यात आली असून ५०% काम पूर्ण झाले आहे. सदर उड्डाणपुलाचा ओव्हरलॅपिंग (Overlapping) भाग हा डबल डेकर (Double Decker) फ्लायओव्हर (पहिल्या स्तरावर उड्डाणपुल आणि दुसऱ्या स्तरावर मेट्रो) म्हणून बांधला जात आहे.

तसेच, दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (DMRC) बांधण्यात येत असलेला डबल डेकर (Double Decker) उड्डाणपुल आणि बृहमुंबई महानगरपालिकेने बांधलेला अस्तित्वातील उड्डाणपुल हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुल) यांना जोडण्याचे काम (Missing Links of Flyovers) प्राधिकरणाद्वारे स्वतंत्र निविदा काढून पूर्ण करण्यात येणार आहे.

वरील प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार, कंत्राटदाराने सादर केलेल्या स्ट्रक्चरल डिझाइनचे पर्यवेक्षण, देखरेख, पुरावे तपासण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करणे आवश्यक आहे. वरील कारणामुळे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (PMC) नियुक्ती करण्याकरिता निविदा जाहिरात दिनांक २५.०३.२०२३ रोजी प्रकाशित करण्यात आले.

**४.२ कामाची ठळक वैशिष्टे:-**

| | |
|---|---|
| **प्राधिकरणामार्फत निविदा काढून पूर्ण करण्यात येणार मिसिंग लिंक (Missing Link) उड्डाणपुलाचे स्थापत्य काम**<br><br>**एकूण लांबी - १.५७ कि. मी.**<br>**अंदाजित किंमत : ३४६.१६ कोटी**<br>(व.व से. कर **वगळून)** | न्यू लिंक रोड (इन्फिनिटी मॉल जवळ) - डबल डेकर (Double Decker) उड्डाणपुलाला जोडणारा रॅम्प (Ramp) आणि उड्डाणपुल |
| | वीरा देसाई रोड- डबल डेकर (Double Decker) उड्डाण पुलाला जोडणारा रॅम्प (Ramp) |
| | मिल्लत स्कूल- डबल डेकर (Double Decker) उड्डाण पुलाला (पश्चिमेस) व बृहन्मुंबई महानगरपालिकेने बांधलेल्या उड्डाणपुलाला (पूर्वेस) जोडणारा उड्डाणपुल |
| | पश्चिम द्रुतगती महामार्ग (WEH) - बृहन्मुंबई महानगरपालिकेने बांधलेल्या उड्डाणपुलाला (पश्चिमेस) व डबल डेकर (Double Decker) उड्डाण पुलाला (पूर्वेस) जोडणारा उड्डाणपुल |
| | पूनम नगर, महाकाली (JVLR) - डबल डेकर (Double Decker) उड्डाण पुलाला जोडणारा रॅम्प (Ramp) |

**कामाची निविदा प्रक्रिया:**

सदर कामाच्या बांधकामासाठी निविदा दिनांक २५/०३/२०२३ रोजी इंडियन एक्सप्रेस आणि लोकमत मुंबई या वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली असून निविदा दस्तऐवज दिनांक १०/०५/२०२३ रोजी महाटेंडर पोर्टलवर प्रकाशित करण्यात आले आणि निविदा दस्तावेज सादर करण्याची अंतिम दिनांक ०९/०५/२०२३ रोजी होते. सदर कामांकरीता मागविण्यात आलेल्या ई-निविदांच्या अनुषंगाने एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या व या निविदांचे लिफाफे 'अ' (निविदा व इसारा रक्कम, तांत्रिक प्रस्ताव) दिनांक १०/०५/२०२३ रोजी ई-निविदाकारांच्या प्रतिनिधीसमक्ष उघडण्यात आले. या कामाकरीता खालील दोन निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १) | मे. टी पी एफ इंजिनीअरिंग प्रा. लि. |
| २) | मे. स्पेक्ट्रम टेक्नो कन्सल्टंट प्रा. लि. |

**निविदांची तांत्रिक छाननी :-**

ई-निविदांच्या पात्रतेची व तांत्रिक प्रस्तावाची छाननी संबंधित अधिकारी उपअभियंता, कार्यकारी अभियंता, मुख्य अभियंता यांच्या मार्फत करण्यात आली असून तांत्रिक मूल्यमापन अहवाल संचालक (प्रकल्प) यांनी मंजूर केला आहे. त्यासंदर्भातील तांत्रिक मुल्यमापन अहवाल दिनांक १८/०५/२०२३ रोजी सादर करण्यात आला. सदर अहवालानुसार निविदाकारांच्या पात्र/ अपात्रतेच्या तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| १) | मे. टी पी एफ इंजिनीअरिंग प्रा. लि. | पात्र |
| २) | मे. स्पेक्ट्रम टेक्नो कन्सल्टंट प्रा. लि. | पात्र |
| | **एकूण** | **पात्र- २** |

**निविदा आर्थिक छाननी:**

पॅकेज क्र. १९७ अंतर्गत तांत्रिकदृष्ट्या पात्र दोन निविदाकारांचे दिनांक २४/०५/२०२३ रोजी झालेल्या निविदा शिफारस समितीच्या बैठकीत वरील पात्र निविदाकारांचा वित्तीय लिफाफे उघडण्यासाठी शिफारस करण्यात आली. त्याप्रमाणे तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदिाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा ‘ब’ आर्थिक प्रस्ताव) दिनांक २९/०५/२०२३ रोजी ई-निविदाकारांच्या उपस्थित प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले. उघडलेल्या सर्व ई-निविदा-लिफाफा ‘ब’ आर्थिक प्रस्तावांची छाननी उप अभियंता, कार्यकारी अभियंता, मुख्य अभियंता यांच्या मार्फत करण्यात आली असून

..१०/-

आर्थिक मूल्यमापन अहवाल संचालक (प्रकल्प) यांनी मंजूर केला आहे व त्यासंदर्भातील आर्थिक मुल्यमापन अहवाल दिनांक ३१/०५/२०२३ रोजी सादर करण्यात आला सदर अहवालानुसार पात्र दोन निविदाकारांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकारांचे नांव | प्राप्त देकार (रू. कोटी) | शेरा |
|---|---|---|---|
| १) | मे. टी. पी. एफ इंजिनीअरिंग प्रा. लि. | **८,००,२८,०००.००** | **लघुत्तम** |
| २) | मे. स्पेक्ट्रम टेक्नो कन्सल्टंट प्रा. लि. | १०,८३,२०,०००.०० | व्दितीय लघुत्तम |

पॅकेज क्र. सी. ए. १९७ मध्ये मे. टी पी एफ इंजिनीअरिंग प्रा.लि.यांचा रू.८,००,२८,०००/ रक्कमेचा लघुत्तम देकार अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा म्हणजेच रू. ९.०८ कोटीच्या तुलनेत ११.९३% कमी दराचा आहे आणि उड्डाणपुलाचे (मिसिंग लिंक्स – पॅकज सी. ए. १९६) बांधकाम प्रकल्प पूर्णत्वाच्या किमतीच्या (रु.३४६.१६ कोटीच्या) सुमारे २.३१% आहे. सदर निविदेकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे व रास्त आहे.

## ४.३ निविदा समितीची शिफारस:-

सदर उड्डाणपुलाच्या कामाकरिता (पॅकज सी. ए. १९७) प्राप्त झालेल्या तांत्रिक व आर्थिक लिफाफाची छाननी/ पृथ:करण संबंधित अधिकारी, उपअभियंता, कार्यकारी अभियंता, मुख्य अभियंता यांच्या मार्फत करण्यात आली असून आर्थिक मूल्यमापन अहवाल संचालक (प्रकल्प) यांनी मंजूर केला आहे व सदर संबंधित अधिकाऱ्यांमार्फत प्राप्त झालेल्या तांत्रिक व आर्थिक अहवालाच्या अनुषंगाने निविदा स्विकृती संदर्भात शिफारस करण्याकरीता प्राधिकरणांतर्गत मा. आयुक्त यांच्या मान्यतेने अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली निविदा समिती गठित करण्यात आली. त्याअनुषंगाने प्राप्त निविदांच्या तांत्रिक लिफाफ्याच्या संबंधी अधिकाऱ्यांमार्फत प्राप्त तांत्रिक मुल्यमापन अहवाल निविदा समितीच्या दिनांक २४/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला व सदर अहवालासंबंधी संयुक्त चर्चा करण्यात आली. तसेच सदरचा अहवाल संयुक्तीक असल्याचे ठरविण्यात आले व सदर निविदांचा आर्थिक लिफाफा 'ब' उघडण्याकरीता शिफारस करण्यात आली. तद्:नंतर दिनांक २९/०५/२०२३ रोजी सदर निविदेचा आर्थिक लिफाफा 'ब' उघडण्यात आला. सदर निविदांच्या आर्थिक लिफाफा मध्ये लघुत्तम देकार **मे. टी पी एफ इंजिनीअरिंग प्रा . लि.** यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.९३% कमी दराने सादर केला. अधिकाऱ्यांमार्फत आर्थिक लिफाफ्याच्या छाननीचा मुल्यमापन अहवाल दिनांक २६/०५/२०२३ रोजी सादर केला. सदर अहवाल दिनांक ०१/०६/२०२३ रोजी आयोजित

निविदा समितीच्या बैठकीत सादर करण्यात आला. सदर बैठकीत अहवालासंबंधी सविस्तर चर्चा करण्यात आली व अधिकाऱ्यांमार्फत आर्थिक मुल्यामापन अहवाल संयुक्तीक असल्याचे ठरविण्यात आले.

उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करून निविदा समितीने **"मे. टी पी एफ इंजिनीअरिंग प्रा. लि".** यांचा रू. ८,००,२८,०००/- (व.व से. कर वगळून) रक्कमेचा लघुत्तम देकार वाजवी असल्याचे व स्विकृत करण्यास योग्य असल्याची शिफारस केली.

४.४ महानगर आयुक्त यांनी सदर कामाकरीता (पॅकेज सी. ए.-१९६) प्राप्त निविदांच्या अनुषंगाने **मे. टी पी एफ इंजिनीअरिंग प्रा. लि**. यांच्या रू.८,००,२८,०००/- (वस्तु व सेवा कर वगळून) रक्कमेचा लघुत्तम देकार अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा (-) ११.९३ % कमी रक्कमेचा देकार कार्यकारी समिती समोर मंजुरीसाठी मांडला.

४.५ सदर प्रस्तावावर चर्चा करताना कार्यकारी समितीने असे विषद केले की, सदर उडडानपुलाच्या कामासाठी आवश्यक असलेल्या प्रकल्प सल्लागाराची फी ही एकंदरीत वाजवी पेक्षा जास्त असल्याचे दिसते. त्या अनुषंगाने महानगर आयुक्तांनी नमूद केले की, प्रकल्पाच्या बांधकाम किंमतीनुसार सदर फी ही सुमारे २.३१% एवढी असून सदर उडडाणपुलांच्या क्लिष्ठता व जबाबदारी, स्वरुप इत्यादी बाबींचा विचार करता सदर फी ही तत्सम कामांच्या प्रकल्प सल्लागारांच्या फी च्या जवळपास असल्याचे नमूद केले.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र. १४५७ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे पॅकेज सी.ए. १९६ साठी **मे. टी पी एफ इंजिनीअरिंग प्रा. लि.** यांच्या

रू. ८,००,२८,०००/- (व.व से. कर वगळून) म्हणजेच अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा (-) ११.९३ % कमी रक्कमेचा देकार स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामाची निकड लक्षात घेता बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता सदरचे काम तात्काळ सुरू करण्यास सुध्दा मान्यता देत आहे".

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त मुं.म.प्र.वि. प्राधिकरण यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ५: मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाच्या मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प मेट्रो मार्ग–६ च्या संरेखनालगत लिंक रोड, अंधेरी (पश्चिम) ते पुनम नगर (JVLR) पर्यंत उड्डाणपुलाचे (मिसिंग लिंक्स) संकल्पचित्र व बांधकाम करण्यासाठी (पॅकेज सी.ए.-१९६) मागविण्यात आलेल्या लघुत्तम किंमतीच्या निविदेस मान्यता मिळण्याबाबत.**

५.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले कि, मेट्रो मार्गिका - ६ ही मुंबई शहरासाठी मेट्रो प्रणालीचा भाग असून हि मार्गिका पश्चिम उपनगरातील स्वामी समर्थ नगर, लोखंडवाला, अंधेरी (पश्चिम) ला पूर्व उपनगरातील विक्रोळी आणि कांजूरमार्ग यांना जोडण्याचे काम करते. हि मार्गिका प्रामुख्याने जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोडवरून (JVLR) धावणार असून पूर्णपणे उन्नत असणार आहे. या मार्गिकेचे बांधकाम दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC) आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांच्यातील सामंजस्य कराराद्वारे (MoU) पूर्ण करण्यात येत आहे.

मेट्रो मार्गिका ६ च्या संरेखनासोबतच, बृहन्मुंबई महानगरपालिकेने न्यू लिंक (New Link Road) रोड ते पूनम नगर, महाकाली (JVLR) पर्यंत उड्डाणपूल प्रस्तावित केला होता. त्यापैकी बृहन्मुंबई महानगरपालिकेने स्वामी विवेकानंद (SV) रोड ते लक्ष्मी नगर, जोगेश्वरी (पू) पर्यंत उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण केले असून सदर उड्डाणपूल २०१५ मध्ये वाहतुकीस खुला करण्यात आला, ज्याला हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उड्डाणपूल असे नाव देण्यात आले आहे.

तथापि, मेट्रो आणि उड्डाणपुलाचे संरचनेची रचना (Structural Design) आणि बांधकाम अनुक्रमे (Construction Sequence) यांचा परस्परावलंबन आणि परिणामी उर्वरित उड्डाणपूल पूर्ण होण्यास होणारा विलंब लक्षात घेऊन उड्डाणपूल आणि मेट्रो प्रकल्पांमध्ये समन्वय राखण्यासाठी, बृहन्मुंबई महानगरपालिकेने उर्वरित उड्डाणपूलांचे बांधकाम पूर्ण करण्याची जबाबदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे दिली .

सदर प्रकल्पासाठी लागणाऱ्या एकूण रक्कमेपैकी (रु. ७६८.८६ कोटी) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ५०टक्के आगाऊ रक्कम रु.३८४.५० कोटी प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आली आहे.

मेट्रो मार्गिका - ६ चे बांधकाम दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (DMRC) पूर्ण करण्यात येत असल्याकारणाने उर्वरित उड्डाणपूलापैकी मेट्रो आणि उड्डाणपुलाचा ओव्हरलॅपिंग (Overlapping) भाग पूर्ण करण्याची जबाबदारी दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC) ला देण्यात आली असून ५०% काम पूर्ण झाले आहे. सदर उड्डाणपुलाचा ओव्हरलॅपींग (Overlapping) भाग हा डबल डेकर (Double Decker) फ्लायओव्हर (पहिल्या स्तरावर उड्डाणपूल आणि दुसऱ्या स्तरावर मेट्रो) म्हणून बांधला जात आहे.

तसेच, दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (DMRC) बांधण्यात येत असलेला डबल डेकर (Double Decker) उड्डाणपूल आणि बृहमुंबई महानगरपालिकेने बांधलेला अस्तीत्वातील उड्डाणपूल हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उड्डाणपूल) यांना जोडण्याचे काम (Missing Links of Flyovers) प्राधिकरणाद्वारे विषयांकित निविदा काढून पूर्ण करण्यात येणार आहे.

## ५.२ उड्डाणपुलाची ठळक वैशिष्टे:-

| | |
|---|---|
| संपूर्ण उड्डाणपुलाचे संरेखन | न्यू लिंक रोड -वीरा देसाई रोड -मिल्लत स्कूल - SV रोड -WEH crossing- JVLR -पूनम नगर, महाकाली<br>**एकूण लांबी – ५.०७ कि. मी.** |
| बृहन्मुंबई महानगरपालिकेने बांधलेला उड्डाणपूल | मिल्लत स्कूल ते WEH ( त्यापैकी SV रोड ते पश्चिम द्रुतगती महामार्ग (WEH) पर्यंत वाहतुकीस खुला करण्यात आला आहे)<br>**लांबी – ०.९२ कि. मी.** |
| दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (DMRC) उड्डाणपुलाचे डबल डेकर (Double Decker) पद्धतीने बांधकाम | न्यू लिंक रोड ते मिल्लत स्कूल<br>WEH ( पूर्व) ते पूनम नगर, महाकाली (JVLR)<br>**एकूण लांबी – २.५८ कि. मी.** |
| संपूर्ण उड्डाणपुलाचे संरेखन | न्यू लिंक रोड -वीरा देसाई रोड -मिल्लत स्कूल - SV रोड -WEH crossing- JVLR -पूनम नगर, महाकाली<br>**एकूण लांबी – ५.०७ कि. मी.** |

| | |
|---|---|
| **प्राधिकरणामार्फत विषयांकित निविदा काढून पूर्ण करण्यात येणार मिसिंग लिंक (Missing Link) उड्डाणपुलाचे काम एकूण लांबी - १.५७ कि. मी.** | **न्यू लिंक रोड (इन्फिनिटी मॉल जवळ)-** डबल डेकर (Double Decker) उड्डाणपूलाला जोडणारा रॅम्प (Ramp) आणि उड्डाणपुल |
| | **वीरा देसाई रोड-** डबल डेकर (Double Decker) उड्डाणपूलाला जोडणारा रॅम्प (Ramp) |
| | **मिल्लत स्कूल-** डबल डेकर (Double Decker) उड्डाणपूलाला (पश्चिमेस) व बृहन्मुंबई महानगरपालिकेने बांधलेल्या उड्डाणपूलाला ( पूर्वेस) जोडणारा उड्डाणपूल |
| | **पश्चिम द्रुतगती महामार्ग (WEH)-** बृहन्मुंबई महानगरपालिकेने बांधलेल्या उड्डाणपूलाला (पश्चिमेस) व डबल डेकर (Double Decker) उड्डाणपूलाला ( पूर्वेस) जोडणारा उड्डाणपूल<br>**या भागात २२० मी. लांबीचा केबल स्टेड ब्रिज (Cable Stayed Bridge) प्रस्तावित करण्यात आला आहे.** |
| | **पूनम नगर, महाकाली (JVLR )-** डबल डेकर (Double Decker) उड्डाण पूलाला जोडणारा रॅम्प (Ramp) |

## ५.३ प्रकल्पाकरीता निविदा प्रक्रिया:

सदर कामाच्या बांधकामासाठी निविदा २५/०३/२०२३ रोजी इंडियन एक्सप्रेस आणि लोकमत मुंबई या वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आले असून निविदा दस्ताऐवज दिनांक ०३/०४/२०२३ रोजी महाटेंडर पोर्टलवर प्रकाशित करण्यात आले आणि निविदा दस्तावेज सादर करण्याची अंतिम दिनांक २५/०४/२०२३ होती. सदर कामांकरीता ३४६.१६ कोटी (वस्तु व सेवा कर वगळून) रकमेची मागविण्यात आलेल्या ई-निविदांच्या अनुषंगाने एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या व या निविदांचे लिफाफा 'अ' (निविदा व इसारा रक्कम, (तांत्रीक प्रस्ताव)) दि.२६/०४/२०२३ रोजी ई-निविदकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले. या कामाकरीता खालील तीन निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १) | मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लिमिटेड |
| २) | मे. एन. सी. सी. लिमिटेड |
| ३) | मे. कल्पतरू पावर ट्रान्समिशन लिमिटेड |

## ५.४ निविदांची तांत्रिक छाननी:-

ई-निविदांच्या पात्रतेची व तांत्रिक प्रस्तावाची छाननी संबंधित अधिकारी उपअभियंता, कार्यकारी अभियंता, मुख्य अभियंता यांच्या मार्फत करण्यात आली असून तांत्रिक मूल्यमापन अहवाल संचालक (प्रकल्प) यांनी मंजूर केला आहे. त्यासंदर्भातील तांत्रिक मुल्यमापन

अहवाल दि. ०८/०५/२०२३ रोजी सादर करण्यात आला. सदर अहवालानुसार निविदाकारांच्या पात्र/ अपात्रतेच्या तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| १) | मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लिमिटेड | पात्र |
| २) | मे. एन. सी. सी . लिमिटेड | पात्र |
| ३) | मे. कल्पतरू पावर ट्रान्समिशन लिमिटेड | पात्र |
| | **एकूण** | **पात्र- ३** |

**५.५ निविदा आर्थिक छाननी:**

पॅकेज क्र. १९६ अंतर्गत तांत्रिकदृष्ट्या पात्र तीन निविदिाकारांचे दि. ११/०५/२०२३ रोजी झालेल्या निविदा शिफारस समितीच्या बैठकीत वरील पात्र निविदाकारांचा वित्तीय लिफाफे उघडण्यासाठी शिफारस करण्यात आली. त्याप्रमाणे तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदिाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा 'ब' आर्थिक प्रस्ताव) दि. १५/०५/२०२३ रोजी ई-निविदाकारांच्या उपस्थित प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले.

निविदाकारांनी सादर केलेल्या आर्थिक देकारांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अनु. क्र. | निविदाकाराचे नाव | आर्थिक देकार रक्कम रु कोटी | निविदा रकमेसंदर्भात टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लिमिटेड | ३८०.४४ | (+)९.९०% | **लघुत्तम** |
| २) | मे. एन. सी. सी. लिमिटेड | ३८८.३८ | (+)१२.२०% | व्दितीय लघुत्तम |
| ३) | मे. कल्पतरू पावर ट्रान्समिशन लिमिटेड | ३९७.६३ | (+)१४.८७% | तृतीय लघुत्तम |

५.६ वरील तपशिलानुसार मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांचा निविदेमध्ये नमूद अंदाजित किंमतीच्या ९.९०% जास्त इतक्या दराचा रु. ३८०.४४ कोटी किंमतीचा आर्थिक देकार लघुत्तम आढळून आला. मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांचा निविदेमध्ये नमूद अंदाजित किंमतीच्या ९.९०% जास्त इतक्या दराचा असल्याने याबाबत त्यांचेकडून त्यांचे देकाराबाबत कारणमिमांसा मागविण्यात आली. यास अनुसरून मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांनी कारणमिमांसा सादर केली. प्राधिकरणाने या कारणमिमांसेची छाननी करून त्यांचे विश्लेषण सादर केले. निविदाकाराने सादर केलेली कारणमिमांसा आणि प्राधिकरणाने केलेले विश्लेषण निविदा समितीसमोर सादर करण्यात आली. याबाबत निविदा समितीने नोंदविलेली खालील निरीक्षणे कार्यकारी समितीस सादर करण्यात आली.

- प्रस्तावित उड्डाणपूल अत्यंत वर्दळीच्या ठिकाणाहून जात असून कार्यरत असलेल्या मेट्रो मार्ग -२अ व ७ ला ओलांडून पुढे जात आहे. तथापि, वरील कारणांमुळे यंत्रसामग्री आणि मनुष्यबळाची कमी उत्पादकता तसेच उड्डाणपूलाच्या बांधकामादरम्यान सुरक्षा अंमलबजावणीसाठी लागणारे अतिरिक्त मनुष्यबळ आणि उपकरणे प्रकल्पाच्या अंदाजित किंमतीमध्ये विचारात घेतलेली नाही.
- प्रकल्पाच्या जवळपासच्या परिसरात कास्टिंग यार्ड (Casting Yard), लेबर कॅम्प (Labour Camp), साइट ऑफिस व प्रयोगशाळा (Material Quality testing laboratory) च्या जागेसाठी लागणारा अतिरिक्त खर्च प्रकल्पाच्या अंदाजित किंमतीत समाविष्ट केलेला नाही.

५.७ महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमूद केले की, याबाबत प्राधिकरणाने केलेले विश्लेषण व निविदाकाराचा देकार यातील तफावत पाहता प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या दिनांक ०१/०६/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत निविदाकार मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांना वाटाघाटीसाठी पाचारण करण्यात आले. या अनुषंगाने निविदाकाराने मूळ देकार किंमतीत रु.१,७४,२१,३५३/- इतक्या रक्कमेची सूट देऊन रु.३,७८,७०,३८,३५०/- (अंदाजपत्रकातील किमतीपेक्षा (+) ९.४ % अधिक) इतक्या रकमेत सदर प्रकल्पाचे काम करण्याचे मान्य केले. उपरोक्त लघुत्तम देकार निविदेतील अटी व शती पूर्तत: करणारा असल्याने मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांनी सादर केलेली निविदा स्वीकृत करण्याबाबतचा प्रस्ताव कार्यकारी समितीकडे सादर करण्यास निविदा समितीने मान्यता दिली आहे.

महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की प्रकल्पाची आखणी मुंबई शहराच्या अत्यंत वर्दळीच्या पाच वेगवेगळ्या ठिकाणी पसरलेले आहे. सदर उड्डाणपुलाची उंची सर्वसाधारण उड्डाणपुलांपेक्षा बरीच जास्त आहे. तसेच प्रकल्पात आव्हानात्मक केबल स्टे पूल (Cable Stayed Bridge) देखील असून ज्याची लांबी २२० मीटर आहे. सदर केबल स्टे पूल पश्चिम द्रुतगती महामार्ग आणि मेट्रो मार्ग ७ ला ओलांडून पुढे जात असून प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक असल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. याबाबत कार्यकारी समितीने महानगर आयुक्त व अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी स्थळपाहणी करुन याची पुनश्च खात्री करावी असे आदेश दिले. या बाबींचा विचार करता कंत्राटदाराचा रु. ३,७८,७०,३८,३५०/- इतक्या रक्कमेचा सुधारीत देकार रास्त व वाजवी असून कार्यकारी समितीस मान्यतेकरीता सादर केला.

..१७/-

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४५८:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे पॅकेज सी.ए. १९६ साठी **मे. जे. कुमार इफ्राप्रोजेक्टस लिमिटेड** यांच्या रू. ३,७८,७०,३८,३५०/- कोटी (व.व से. कर वगळून) म्हणजेच अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा (+) ९.४ % अधिक रक्कमेचा देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. तसेच सदर कामाची निकड लक्षात घेता बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीची प्रतिक्षा न करता सदरचे काम तात्काळ सुरू करण्यास सुध्दा मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त मुं.म.प्र.वि. प्राधिकरण यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र. ६: मुंबई मेट्रो मार्ग-४ आणि ४अ प्रकल्पाच्या मोघरपाडा येथील डेपोच्या स्टॅबलिंग यार्ड, ऑपरेशनल कंट्रोल सेंटर आणि प्रशासकीय इमारत, देखभाल व कार्यशाळेच्या इमारती, सहाय्यक सबस्टेशन, स्टाफ क्वार्टर, आर्किटेक्चरल फिनिशिंग, प्लंबिंग, जमीन विकासासाठी भूकाम, कुंपण, रस्ता, डेपोला जोडणारा पूल, भूमिगत सेवा वाहिनी यासह डेपो पायाभूत सुविधांचे बांधकाम, गटाराची व्यवस्था, सांडपाणी प्रक्रिया संयंत्र आणि मैला प्रक्रिया संयंत्रचे संकल्पचित्र आणि बांधणी इत्यादी, आर्किटेक्चरल फिनिशिंग आणि संकल्पचित्र आणि प्री-इंजिनीयर्ड बिल्डिंग स्ट्रक्चर्सचा समावेश इत्यादी बांधकाम करणे (पॅकेज सी.ए. - १६०) या कामासाठी मागविण्यात आलेल्या ई-निविदेसाठी मंजूरी देणेबाबत.**

६.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले कि, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८ व्या बैठकीत तसेच दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुंबई शहरात

पुढील ३ ते ४ वर्षात ११८ कि.मी. लांबीच्या उन्नत मेट्रो मार्गांची त्वरित अंमलबजावणी करण्यास मान्यता मिळाली असून त्याची त्वरीत अंमलबजावणी करण्याकरीता अंदाजे ₹३५,४००/- कोटीस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यापैकी मेट्रो मार्ग ४ साठी अंदाजीत केलेल्या ₹१४,५४९/- कोटी प्रकल्प किंमतीच्या खर्चास प्राधिकरणाच्या दिनांक १३ जून, २०१६ रोजीच्या १४० व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता मिळाली असून दिनांक २७ सप्टेंबर, २०१६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रकल्पास मान्यता मिळाली आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने सदर प्रकल्पाकरीता दिनांक २५ ऑक्टोंबर, २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. तसेच सदर मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता दिली आहे. मेट्रो मार्ग ४ आणि ४अ (वडाळा - घाटकोपर - मुलुंड - ठाणे - कासारवडवली - गायमुख) या मार्गिकाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. मेट्रो मार्गिका ४ अ हा मेट्रो मार्ग ४ चा विस्तार आहे आणि मेट्रो कॉरिडॉर ४ आणि ४अ ची एकूण लांबी ३५.३८४ कि.मी. आहे व त्यात ३२ एलिव्हेटेड स्टेशनचा समावेश आहे. दिनांक २५.१०.२०१६ आणि दिनांक २५.०१.२०१९ च्या शासन निर्णयानुसार, महाराष्ट्र शासनाने प्राधिकरणाला मेट्रो मार्ग - ४ आणि ४अ ची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली आहे. सदर मेट्रो प्रकल्पासाठी शासनाने दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दिनांक २६ जुन, २०१९ रोजी सदर प्रकल्पास "महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प (Vital Urban Transport Project)" म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

६.२ महानगर आयुक्तांनी सद्यस्थिती बद्द्ल माहिती देताना असे सांगितले कि, मेट्रो मार्ग ४ या प्रकल्पाकरीता स्थापत्य बांधकामांची पाच भागांमध्ये विभागणी करण्यात आली असून त्यापैकी पॅकेज क्र. ८, १०, व १२ करीता M/s RINFRA-ASTALDI (Sub- Contractor M/s. Millan) या सहभागी संस्थेची व पॅकेज क्र. ९ व ११ करीता M/s CHEC-TPL Line 4 JV या सहभागी संस्थेची दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. तसेच मेट्रो मार्ग-४अ, पॅकेज क्र. ५४ या प्रकल्पाच्या स्थापत्य बांधकामाकरीता M/s J. Kumar Infra Project Pvt. Ltd. यांना दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ रोजी स्थापत्य कामे करण्याकरिता कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. सदर कंत्राटदारांमार्फत सद्य:स्थिती मध्ये प्रकल्पाच्या बांधकामाकरिता स्थापत्य कामे प्रगतीपथावर आहेत. स्थापत्य कामांची दिनांक ३०/०८/२०२३

पर्यंतची एकूण भौतिक प्रगती ५९.४२% आहे. मेट्रो मार्गिका ४ व ४अ च्या सर्वसाधारण सल्लागाराच्या निविदेस प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या २५४ व्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. या मेट्रो मार्गीकेचे मेसर्स. डि. बी. इंजिनिअरिंग अॅण्ड कन्सल्टींग जी.एम.बी.एच. व हिल इंटरनॅशनल इन कॉर्पोरेटेड आणि लुईस बर्जर कन्सल्टींग कंपनी लिमिटेड (मे. डि. बी. हिल - एल.बी.जी. यांचा संयुक्त संघ) सर्वसाधारण सल्लागार म्हणून दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१७ पासून त्यांना नियुक्त करण्यात आले आहे. मेट्रो मार्गिका ४ व ४अ च्या सविस्तर संकल्पचित्र सल्लागार (Detail Design Consultant) निविदेस प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ९ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या २५५ व्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. या मेट्रो मार्गीकेचे सविस्तर संकल्पचित्र सल्लागार म्हणून दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

६.३ मेट्रो मार्ग ४, ४ अ, १० आणि ११ चा तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) DMRC द्वारे तयार केला होता. मेट्रो मार्ग - १० च्या DPR मध्ये नमूद केल्यानुसार, मेट्रो मार्ग -४, ४ अ, १० आणि ११ साठी (CSMT, मुंबई - मीरा रोड) पासून ५५.९९ किमी अंतरासाठी एकच मुख्य डेपो बांधण्याचा विचार केला होता. मोघरपाडा येथे सर्व ४ मेट्रो मार्गासाठी देखभाल डेपोचे नियोजन करण्यात आले आहे. मेट्रो मार्ग-४ आणि ४-अ च्या DPR मध्ये प्रस्तावित डेपोचे स्थान ओवळे किंवा गायमुख येथे होते. तथापि, डेपोचे बांधकाम, मोठ्या जागेची उपलब्धता, झाडे तोडणे, आर अँड आर, मेट्रो लाईनची नजीक आणि इतर घटकांचा समावेश असलेल्या सर्व शक्यता तपासल्यानंतर, डेपोचे स्थान मोघरपाडा येथे निश्चित करण्यात आले आहे. आता मेट्रो मार्ग-४ आणि ४ अ साठी मोघरपाडा, ठाणे येथे कार डेपोचे स्थान निश्चित करण्यात आले आहे. मोघरपाडा येथील जमीन ही सरकारी जमीन असून तिचे एकूण क्षेत्र २११.७६ हेक्टर आहे. सर्व आवश्यक डेपो सुविधा सामावून घेण्यासाठी एकूण ४२.२५ हेक्टर जमीन आवश्यक आहे.

**१.० कामाची निविदा प्रक्रिया व कामाची ठळक वैशिष्टे** :-

- मेट्रो मार्ग-४ आणि ४-अ (वडाळा–घाटकोपर– मुलुंड – ठाणे – कासारवडवली – गायमुख) च्या मोघरपाडा येथे मेट्रो कारडेपो कामांकरीता दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी ₹७११.३४ कोटी (सर्व करांसहित) रक्कमेची ई- निविदा मागविण्यात आली होती. सदर निविदेमध्ये प्रकल्पाखालील कामांचा समावेश आहे.
    - डेपो नियंत्रण केंद्र व प्रशासन (अॅडमिन) इमारत.

- ६४ स्टेबलिंग लाईन, १० इन्स्पेक्शन लाईन, १० वर्कशॉप लाईनसाठी प्रि –इंजिनीयर शेड (PEB).
- कर्मचारी निवासस्थाने.
- मेट्रो कारशेडची इतर संलग्न कामे जसे, रस्ते, जलवाहिनी, पर्जन्यवाहिनी, माती भराव, इ.

- ई-निविदांच्या अनुषंगाने एकूण तीन ई-निविदा प्राप्त झाल्या व या निविदांचे लिफाफा 'अ' (निविदा, इसारा रक्कम व तांत्रिक प्रस्ताव) दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले. या कामाकरीता खालील तीन निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या.

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १) | मे. एस. इ. डब्लू. – व्ही. एस. इ. (जे. व्ही. ) |
| २) | मे. एन.सी .सी .प्रा. लि. |
| ३) | मे. रित्विक – के.पी. सी. पी. एल. (जे. व्ही.) |

### १.१ निविदा समिती :-

प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या निविदांच्या छाननीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने खालीलप्रमाणे निविदा समिती गठीत केली आहे:

१. अतिरिक्त महानगर आयुक्त (१) -अध्यक्ष
२. संचालक (कामे) - सदस्य
३. वित्तीय सल्लागार – सदस्य
४. प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग – सदस्य
५. प्रमुख, नियोजन विभाग - सदस्य
६. मुख्य अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका- सदस्य

### १.२ निविदांची तांत्रिक छाननी :-

ई-निविदांच्या पात्रतेची व तांत्रिक प्रस्तावाची छाननी मेट्रो मार्ग -४ आणि ४ अ (पॅकेज क्र. सी.ए.१६०) या प्रकल्पाच्या सामान्य सल्लागार (General consultant) M/s. DB Engineering & Consulting GmbH, M/s. Louis Berger & M/s. Hill International Consortium मार्फत करण्यात आली व त्यासंदर्भातील तांत्रिक मुल्यमापन अहवाल दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी

..२१/-

सादर करण्यात आला. सदर अहवालानुसार निविदाकारांच्या पात्र/ अपात्रतेचे तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| १) | मे. एस. इ. डब्लू. – व्ही. एस. इ. (जे. व्ही. ) | पात्र |
| २) | मे. एन.सी .सी .प्रा. लि. | पात्र |
| ३) | मे. रित्विक - के.पी. सी. पी. एल. (जे. व्ही.) | अपात्र |
| **एकूण** | | **पात्र- २, अपात्र- १** |

मे. रित्विक - के.पी.सी.पी.एल. (जे. व्ही.) यांनी सादर केलेल्या दस्तावेजानुसार प्रस्तावित कामाच्या किंमतीच्या ४०% किंमतीच्या तीन सारख्या कामाच्या अनुभवाचा निकष पूर्ण करीत नव्हता. मे. रित्विक - के.पी.सी.पी.एल. (जे. व्ही.) यांनी सादर केलेल्या तीन कामांपैकी तिसऱ्या कामाची किंमत आवश्यक किंमतीपेक्षा कमी असल्याने, निविदा निकष पूर्ण करीत नसल्याचे निष्पन्न झाले. सबब मे. रित्विक-के.पी.सी.पी.एल. (जे. व्ही.) यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली.

**१.३ निविदा आर्थिक छाननी :**

पॅकेज क्र. सी. ए. १६० अंतर्गत तांत्रिकदृष्ट्या पात्र तीन निविदाकारांचे दिनांक १५/०३/२०२३ रोजी झालेल्या निविदा शिफारस समितीच्या बैठकीत वरील पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे उघडण्यासाठी शिफारस करण्यात आली. त्याप्रमाणे तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे दिनांक ०६/०४/२०२३ रोजी उघडण्यात आले. निविदाकारांच्या आर्थिक देकारांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकारांचे नांव | निविदेची रक्कम (₹कोटी) | प्राप्त देकार (₹कोटी) | % कमी/ अधिक (-)/(+) |
|---|---|---|---|---|
| १) | मे. एस. इ. डब्लू. – व्ही. एस. इ. (जे. व्ही. ) | **७११.३४** | ९०५.७७ | (+)२७.३३% |
| २) | मे. एन.सी .सी .प्रा. लि. | | ९४४.२५ | (+)३२.७४% |

सदर निविदांच्या आर्थिक लिफाफा मध्ये लघुत्तम देकार मे. एस. इ. डब्लू. – व्ही. एस. इ.(जे.व्ही.) यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.३३% जास्त दराने सादर केल्याने सदर दराबाबत खुलासा मिळण्याकरीता प्राधिकरणामार्फत विचारणा करण्यात आली. त्याअनुषंगाने मे. एस. इ. डब्लू – व्ही. एस. इ. (जे.व्ही.) यांनी त्यांच्या दिनांक १७/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदरचा खुलासा

..२२/-

सादर केला व त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे :-

- बांधकाम सामग्रीच्या किंमतीत झालेली वाढ व निविदेमधील दर हे राज्य दरसूची २०२२-२०२३ पेक्षा कमी आहे.
- कोविड १९ महामारीनंतर बांधकाम साहित्य, मजदुर आणि यंत्रसामग्रीच्या किंमतीत अचानक वाढ झाल्याने अतिरिक्त खर्च.
- बांधकाम कालावधी दरम्यान तात्पुरते रस्ते आणि देखभालीचा अतिरिक्त खर्च.
- अनुभवी अभियंता/कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसाठी अतिरिक्त खर्च.
- कॉर्पोरेशन क्षेत्रामध्ये क्षेत्र भत्ते म्हणून लागू असलेल्या सामान्य SSR दरांपेक्षा ५% ची वाढ होत असल्याकारणाने अतिरिक्त खर्च.

  कॉर्पोरेशनच्या हद्दीतील जागेच्या जवळपासच्या परिसरात कॅम्प, साइट ऑफिस व प्रयोगशाळेच्या (Material Quality testing laboratory) स्थापनेसाठी अतिरिक्त खर्च.
- सदर वरीलप्रमाणे लघुत्तम निविदाकाराचा प्राप्त आर्थिक देकाराचा व देकाराबाबतचे स्पष्टीकरण याचे मेट्रो मार्ग ४ आणि ४ अ प्रकल्पाचे सल्लागार M/s. DB Engineering & Consulting GmbH, M/s. Louis Berger & M/s. Hill International Consortium यांच्यामार्फत छाननी करण्यात आली.

सदर छाननी प्रमाणे सदर कामाचे ₹७११.३४ कोटी (सर्व करांसहित) रक्कमेचे अंदाजपत्रक हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसूची २०२१-२०२२, व प्राधिकरणाच्या मंडाळे येथील मेट्रो डेपोच्या कामाच्या व इतर तत्सम कामाचे दर घेऊन बनविण्यात आले होते. सल्लागाराने सदर कामातील महत्वाचा घटक कामे जसे की, माती भराव कामे, सळी कामे (Reinforcement Works), पाइलींग, ड्राय लीन कॉंक्रीट (DLC), खोदकामातील अतिरिक्त मातीची विल्हेवाट (Disposal), स्ट्रक्चरल स्टील इ . कामांच्या निविदा दर व सध्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसूची २०२२-२०२३ मधील दरातील वाढीव तफावत विचारात घेऊन वरील कामांचा वाढलेल्या दरांचा अंदाजपत्रकावर २४.४५ % इतका वाढीव परिणाम होत आहे.

| अनु.क्र. | महत्वाचे घटक कामे | निविदा दर व राज्य दरसूची २०२२-२३ मध्ये वाढीव तफावत असल्यामुळे अंदाजपत्रकामध्ये होणारी वाढ. |
|---|---|---|
| १ | मेट्रो कारडेपो साठीचे माती व भराव काम | २०.३६१ % |
| २ | मातीचे भराव काम | ०.५६२% |
| ३ | सळई (HYSD-TMT-FE-५०० Reinforecment Bars) | ३.४७९% |
| ४ | सळई (Mild Steel Reinforecment Bars) | ०.०४७% |
| | **एकुण अंदाजपत्रकामध्ये होणारी वाढ (टक्केवारी)** | **२४.४५%** |

वरील बाबीं विचारात घेऊन सामान्य सल्लागारास सदर कामाचे अंदाजपत्रक हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सूची २०२२-२०२३ व बृहन्मुंबई महानगरपालिका दर सूची २०२३ नुसार तयार करण्याचे सुचविण्यात आले जेणेकरून नवीन अंदाजपत्रकाबरोबर लघुत्तम देकाराची तुलना करणे उचित ठरेल .

६.४ सामान्य सल्लागाराने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सूची २०२२-२०२३ व बृहन्मुंबई महानगरपालिका दर सूची २०२३ मधील दरावर आधारीत नवीन अंदाजपत्रक सादर केले व त्यानुसार सदर अंदाजपत्रक हे ₹ ९०५.३१ कोटी (सर्व करांसहित) इतके येत आहे.

| अ.क्र. | कामाचे वर्णन | निविदा रक्कम (राज्य दर सुची -२०२१-२२ व तत्सम कामाच्या दरावर आधारित) | सुधारित अंदाजपत्रक (राज्य दर सुची -२०२२ – २०२३, बृहन्मुंबई महानगरपालिका दर सुची २०२३ वर आधारित) |
|---|---|---|---|
| १ | **सुची (अ)**: डेपोचे आर.सी.सी. काम प्रशासकीय इमारतीचे काम. | २७४,४३,६३,१३०/- | ३,०३,२९,०८,९५४ /- |
| २ | **सुची (ब)**: माती उत्खनन आणि भराव रस्ता, रस्त्यांची कामे, पर्जन्य वाहिन्या, भू-तांत्रिक तपासणी, वृक्षतोड, पुनर्रोपण, नवीन वृक्षारोपण इत्यादीचे कामे. | १९३,३०,३०,४७६/- | ३,१२,४३,९६,२१९/- |
| ३ | **सुची (क)**: डेपोसाठी प्री- इंजिनिअर शेड. | ७८,१६,८६,४६३/- | ७८,१६,८६,४६३/- |
| ४ | **सुची (ड)**: कर्मचारी निवासस्थाने | ९०,०६,९१,३३६/- | १,०२,४८,६०,६३१/- |
| ५ | **सुची (इ)** : मुख्य रस्त्यापासुन डेपोसाठी प्रवेश (approach) रस्ता व पुल | २७,५८,४७,३९८/- | ३०,७९,३४,६५८ /- |
| ६ | **सुची (फ)**: जमिनीच्या अतिरिक्त क्षेत्रातील माती उत्खनन आणि भराव रस्ता, रस्त्यांची कामे, पर्जन्य वाहिन्या, भू-तांत्रिक तपासणी, वृक्षतोड, पुनर्रोपण, नवीन वृक्षारोपण इत्यादीचे कामे. | ३०,४३,०५,१२४/- | ६०,७८,५०,५८४/- |
| ७ | **सुची ( जी )**: आकास्मिक कामासांठी तरतुद | १७,३४,९८,०९८/- | १७,३४,९८,०९८/- |
| | **एकुण** | **७११,३४,२२,०२५/-** | **९,०५,३१,३५,६०८/-** |

वरील वाढलेल्या अंदाजपत्रकाबाबत सामान्य सल्लागाराने स्पष्टीकरण देतांना निविदा समितीच्या दिनांक १६/०५/२०२३ च्या बैठकित सांगितले की, वाढलेली रक्कम हि मुख्यतः निविदा दर व सध्याच्या राज्य दर सूची २०२२-२०२३ मधील वाढीव तफावतामुळे आहे.

६.५ वरील सर्व बाबीं लक्षात घेऊन सामान्य सल्लागार यांनी असे सांगितले की सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सूची २०२२-२०२३ व बृहन्मुंबई महानगरपालिका दर सूची २०२३ वर आधारित अंदाजपत्रकानुसार लघुत्तम देकाराची रक्कमही कमी जरी असली तरी लघुत्तम निवीदाकाराबरोबर वाटाघाटी करण्यात यावी .

| अ.क्र. | कामाचे वर्णन | निविदा रक्कम | सुधारित अंदाजपत्रक | लघुत्तम निविदाकाराचा प्राप्त देकार |
|---|---|---|---|---|
| १ | **सुची (अ):** डेपोचे आर.सी.सी. कामे व प्रशासकीय इमारतीचे काम. | २७४,४३,६३,१३०/- | ३,०३,२९,०८,९५४/- | ३,२७,९५,१३,९४०/- |
| २ | **सुची (ब):** माती उत्खनन आणि भराव रस्तस, रस्त्यांची कामे, पर्जन्य वाहिन्या, भू-तांत्रिक तपासणी, वृक्षतोड, पुनर्रोपण, नवीन वृक्षारोपण इत्यादीचे कामे. | १९३,३०,३०,४७६/- | ३,१२,४३,९६,२१९/- | २,९१,८८,७६,०१९/- |
| ३ | **सुची (क):** डेपोसाठी प्री-इंजिनिअर शेड. | ७८,१६,८६,४६३/- | ७८,१६,८६,४६३/- | ८३,६४,०४,५१५/- |
| ४ | **सुची (ड):** कर्मचारी निवासस्थाने | ९०,०६,९१,३३६/- | १,०२,४८,६०,६३१/- | १,०९,४३,३९,९७३/- |
| ५ | **सुची (इ)** : मुख्य रस्त्यापासुन डेपोसाठी प्रवेश (approach) रस्ता व पुल | २७,५८,४७,३९८/- | ३०,७९,३४,६५८ /- | ३२,३०,१७,३०३/- |
| ६ | **सुची (फ):** जमिनीच्या अतिरिक्त क्षेत्रातील माती उत्खनन आणि भराव रस्तस, रस्त्यांची कामे, पर्जन्य वाहिन्या, भू-तांत्रिक तपासणी, वृक्षतोड, पुनर्रोपण, नवीन वृक्षारोपण इत्यादीचे कामे. | ३०,४३,०५,१२४/- | ६०,७८,५०,५८४/- | ४३,२१,१३,२७६ /- |
| ७ | **सुची ( जी ):** आकास्मिक कामासांठी तरतुद | १७,३४,९८,०९८/- | १७,३४,९८,०९८/- | १७,३४,९८,०९८/- |
| | **एकुण** | **७११,३४,२२,०२५/-** | **९,०५,३१,३५,६०८/-** | **९,०५,७७,६३,१२५/-** |

निविदा शिफारस समितीच्या दिनांक १२/०५/२०२३ व दिनांक १६/०५/२०२३ च्या बैठकीत सामान्य सल्लागारामार्फत दिनांक २३/०५/२०२३ रोजी प्राप्त झालेल्या वित्तीय मूल्यमापन अहवाल सादर करण्यात आला व वरीलप्रमाणे स्पष्टीकरणावर चर्चा करण्यात आली.

६.६ निविदा शिफारस समितीने लघुत्तम निविदाकाराला वाटाघाटी करण्यासाठी बोलाविले. लघुत्तम निविदाकाराने त्याचा देकार उपरोक्त बाब २.३ मध्ये दिलेल्या कारणास्तव देकार अत्यंत वाजवी आहे असे स्पष्टीकरण दिले.

६.७ सखोल चर्चेनंतर, निविदा समितीने लघुत्तम निविदाकारास सांगितले कि, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सूची २०२२-२०२३ व बृहन्मुंबई महानगरपालिका दर सूची २०२३ वर आधारीत अंदाजपत्रकानुसार लघुतम देकार हा सूची (अ), (ब), (ड) व (फ) मध्ये जास्त असल्याने लघुत्तम निविदेकारास पुनर्विचार करून अंतिम देकार सादर करावे, असे सुचविले. त्याअनुषंगाने लघुत्तम निविदेकार मे. एस. इ. डब्लू.– व्ही. एस. इ. (जे. व्ही.) यांनी

देकारात रु. ७७,६३,१२५/- इतकी रक्कम कमी करुन दिनांक १८/०५/२०२३ च्या पत्रान्वये अंतिम देकार रु. ९,०५,००,००,०००/- (सर्व करांसहित) सादर केला.

तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ क्र. | कामाचे वर्णन | निविदा रक्कम (राज्य दर सुची - २०२१-२२ व तत्सम कामाच्या दरावर आधारित) | सुधारित अंदाजपत्रक रक्कम (सा.बां. राज्य दर सुची — २०२२ बृहन्मुंबई महानगरपालिका दर सुची २०२३ वर आधारित) | लघुत्तम निविदाकराचा प्राप्त देकार | लघुत्तम निविदाकराचा अंतिम देकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | **सुची (अ)**: डेपोचे आर. सी. सी. कामे व प्रशासकीय इमारतीचे काम. | २७४,४३,६३,१३०/- | ३,०३,२९,०८,९५४/- | ३,२७,९५,१३,९४०/- | ३,२७,९५,१३,९४०/- |
| २ | **सुची (ब)**: माती उत्खनन आणि भराव रस्तस, रस्त्यांची कामे, पर्जन्य वाहिन्या भू-तांत्रिक तपासणी, वृक्षतोड, पुनर्रोपण, नवीन वृक्षारोपण इत्यादीचे कामे. | १९३,३०,३०,४७६/- | ३,१२,४३,९६,२१९/- | २,९१,८८,७६,०१९/- | २,९१,८८,७६,०१९/- |
| ३ | **सुची (क)**: डेपोसाठी प्री-इंजिनिअर शेड. | ७८,१६,८६,४६३/- | ७८,१६,८६,४६३/- | ८३,६४,०४,५१५/- | ८३,६४,०४,५१५/- |
| ४ | सुची (ड): कर्मचारी निवासस्थाने | ९०,०६,९१,३३६/- | १,०२,४८,६०,६३१/- | १,०९,४३,३९,९७२/- | १,०९,४३,३९,९७३/- |
| ५ | सुची (इ) : मुख्य रस्त्यापासुन डेपोसाठी प्रवेश (approach) रस्ता व पुल | २७,५८,४७,३९८/- | ३०,७९,३४,६५८ /- | ३२,३०,१७,३०३/- | ३१,५२,५४,१७८/- |
| ६ | सुची (फ): जमिनीच्या अतिरिक्त क्षेत्रातील माती उत्खनन आणि भराव रस्ता, रस्त्यांची कामे, पर्जन्य वाहिन्या, भू-तांत्रिक तपासणी, वृक्षतोड,पुनर्रोपण, नवीन वृक्षारोपण इत्यादीचे कामे. | ३०,४३,०५,१२४/- | ६०,७८,५०,५८४/- | ४३,२१,१३,२७६ /- | ४३,२१,१३,२७६/- |
| ७ | सुची (जी): आकास्मिक कामासांठी तरतुद | १७,३४,९८,०९८/- | १७,३४,९८,०९८/- | १७,३४,९८,०९८/- | १७,३४,९८,०९८/- |
| | **एकुण** | **७११,३४,२२,०२५/-** | **९,०५,३१,३५,६०८/-** | **९,०५,७७,६३,१२५/-** | **९,०५,००,००,०००/-** |

लघुत्तम निविदाकाराने सादर केलेला अंतिम देकार निविदा रकमेपेक्षा (+)२७.२२% इतका जास्त आहे. सदर देकार हा सा.बां. विभागाच्या राज्य दर सूची सन २०२२-२०२३ व बृहन्मुंबई महानगरपालिका दर सूची २०२३ वर आधारित अंदाजपत्रकानुसार (-) ०.०३५% इतका कमी आहे. ही बाब लक्षात घेता लघुत्तम निविदाकाराने केलेला अंतिम देकार वाजवी व रास्त असून निविदा समितीने देकार स्विकारण्याची शिफारस केली .

६.८ महानगर आयुक्त यांनी असेही निदर्शनास आणले की, मा. आमदार श्री. प्रताप सरनाईक यांचे दिनांक १२ जून, २०२३ रोजीचे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले. सदर पत्रात मा. आमदार यांनी मोघरपाडा डेपोची निविदा प्रक्रिया रद्द करावी अशी विनंती केली. तद्नंतर प्राधिकरणाने

प्रतिउत्तरात असे नमूद केले की, प्राधिकरणाच्या विनंतीवरून, सदर जमीन प्राधिकरणाला मेट्रो कारशेड व अनुषंगिक कामाकरीता हस्तांतरित करण्याबाबत व बाधित शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबतच्या विषयावर शासन स्तरावर चर्चा करण्यात आली असून, लवकरच याबाबतचा निर्णय शासनस्तरावर घेतला जाणार आहे. मेट्रो मार्ग ४ व ४अ च्या स्थापत्य कामाची प्रगती ६०% पूर्ण झालेली आहे. सदर, कारडेपोचे बांधकाम पूर्ण होण्यास किमान ३६ महिने कालावधी आवश्यक आहे व वेळेच्या व स्थापत्य कामाच्या सुनियोजनाची व रोलिंगस्टॉकच्या स्टेब्लिंग साठीची निकड लक्षात घेता मोघारपाडा डेपोच्या स्थापत्य कामांची निविदा २१/१०/२०२२ रोजी प्रकाशित करण्यात आली असुन निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी २७६ व्या बैठकीत सादर करण्यात आली.

६.९ सदर कामाची निविदा हि सल्लागारामार्फत (सामान्य सल्लागार व संकल्पचित्र सल्लागार) तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकावर आधारित असून सदर निविदा अंदाजपत्रक हे सल्लागाराने तस्यम कामाचे स्विकृत दर, सा.बां. राज्य दर सुची २०२१-२२ व बृहन्मुंबई महानगरपालिका दर सुची २०१८ यांचे दर घेऊन तयार केलेले आहे. तथापि, आर्थिक निविदा उघडल्यानंतर असे आढळून आले की, सल्लागाराने तयार केलेले अंदाजपत्रक हे प्रचलित आणि बाजार दरानुसार नसल्याने परिणामी विषयांकित कामासाठी जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्या. वरील बांबी लक्षात घेता कार्यकारी समितीने असे मत मांडले कि सदर अंदाजपत्रक तयार करताना सल्लागाराने प्रचलित आणि कार्यक्षम दर मिळविण्यासाठी योग्य परिश्रम घेतले नाहीत. परिणामी सल्लागाराने तयार केलेल्या अन्दाजपत्रकातील त्रुटी लक्षात घेता कार्यकारी समितीने नाराजी व्यक्त करून संबंधित सल्लागारांवर उचित कार्यवाही करण्याचे आदेश दिले .

६.१० सादर केलेल्या प्रस्तावाबाबत कार्यकारी समितीमध्ये साधक बाधक चर्चा करून प्रकरणाची योग्यता लक्षात घेता सदर लघुत्तम निविदेस मान्यता देऊन खालीलप्रमाणे ठराव मंजुर केला.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४५९:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप कलम (३) चे पोट कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मेट्रो मार्ग ४ आणि ४अ प्रकल्पातील पॅकेज सी. ए. – १६०: मोघरपाडा येथील कारशेड बांधकामासाठी मे. एस. इ. डब्लू. – व्ही. एस. इ. (जे. व्ही.) यांनी सादर केलेला सुधारित लघुत्तम देकार ₹.९,०५,००,००,०००/- (सर्व करांसहित) स्विकारण्यास व त्याअनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांच्या याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ७: मुंबई मेट्रो प्रकल्प ४ व ४-अ (वडाळा – कासारवडवली – गायमुख) मार्गिकेच्या, मुलुंड अग्निशमन स्थानक (सा. क्र. १८९२९.६११ मी.) ते गायमुख स्थानक (सा. क्र. ३४७०२.२७२ मी.) आणि गायमुख स्थानकातील सायडिंग तसेच डेपोला जोडणारा गिटटीरहित (Ballastless) रेल्वेमार्गाच्या कामासाठी संरचना (डिझाईन), उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि मार्ग कमिशनिंग करणे (खुला करणे) (सी.ए.१६१) या कामाकरिता मागविलेल्या ई-निविदांना मान्यता मिळणेबाबत.**

७.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, राज्य शासनाने मेट्रो मार्ग ४ साठी शासन निर्णय दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ अन्वये रु. १४,५४९ कोटी इतक्या खर्चास आणि मेट्रो मार्ग ४अ साठी दिनांक २५ जानेवारी, २०१९ अन्वये रु. ९४९ कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच मेट्रो मार्ग ४ आणि ४अ वडाळा – कासारवडवली - गायमुख प्रकल्पासाठी अंमलबजावणी संस्था म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मेट्रो मार्ग ४ आणि ४अ प्रकल्पासाठी सर्वसाधारण सल्लागार (General Consultant) म्हणून M/s. DBEC-HILL-LBG यांची नेमणूक करण्यात आली.

७.२ महानगर आयुक्त यांनी अशीही माहिती दिली की, मेट्रो मार्ग ४ मधील स्थापत्य कामे प्रगतीपथावर असून ५५% आणि मेट्रो मार्ग ४अ मधील स्थापत्य कामे प्रगतीपथावर असून ६०% कामे पूर्ण झाली आहेत. मुख्य मार्गिकेमधील खांबांचा पाया आणि सबस्ट्रक्चरची कामे जोरात सुरू असून गर्डर्स उभारणीसारखी सुपरस्ट्रक्चरची कामेही प्रगतीपथावर आहेत. स्थापत्य कामामध्ये गिट्टीरहीत (Ballastless) ट्रॅकसह मुख्य मार्ग आणि गिट्टीसहीत (Ballasted) ट्रॅकसह

डेपो अशा कामांचा समावेश होतो. व्हायाडक्ट आणि स्टेशनसाठी गर्डर्स उभारण्यासह स्थापत्य कामे पूर्ण होताच ट्रॅकचे काम सुरू करणे अपेक्षित आहे. या बाबी विचारात घेऊन, मेट्रो ४ व ४-अ मार्गिकेवरील मुलुंड अग्निशमन स्थानक (सा. क्र. १८९२९.६११ मी.) ते गायमुख स्थानक (सा. क्र. ३४७०२.२७२ मी.) गिट्टीरहित (Ballastless) रेल्वेमार्ग आणि गायमुख स्थानकातील सायडिंग तसेच डेपोला जोडणारा गिट्टीरहित (Ballastless) रेल्वेमार्ग या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या.

७.३ मुंबई मेट्रो मार्ग ४ आणि ४अ (वडाळा – कासारवडवली – गायमुख) मार्गिकेच्या, मुलुंड अग्निशमन स्थानक(सा. क्र. १८९२९.६११ मी.) ते गायमुख स्थानक (सा. क्र. ३४७०२.२७२ मी.) गिट्टीरहित (Ballastless) रेल्वेमार्ग आणि गायमुख स्थानकातील सायडिंग तसेच डेपोला जोडणारा गिट्टीरहित (Ballastless) रेल्वेमार्गाच्या कामासाठी संरचना (डिझाईन),उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि मार्ग कमिशनिंग करणे (खुला करणे) या कामाकरिता ई-निविदा मागविण्यासाठी मिड डे (सर्व आवृत्ती) व मुंबई चौफेर या वृत्तपत्रात दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी ई-निविदा सूचना प्रसिद्व करण्यात आली. प्रचलित पध्दतीनुसार निविदापूर्व बैठक दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी घेण्यात आली. निविदाकारांनी उपस्थित केलेल्या इतर बाबींचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले. ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष दिनांक ०३ मार्च, २०२३ रोजी दु. ३ वाजता लिफाफा - अ (निविदा इसारा किंमत) आणि लिफाफा - ब (तांत्रिक प्रस्ताव) उघडण्यात आला. निविदा प्रक्रियेत भाग घेतलेल्या निविदाकारांची नावे खालीलप्रमाणे आहेत :-

- मे. अपुर्वक्रिती इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.
- मे. आयटीडी सिमेंटेशन इंडिया लि.
- मे. पारस रेलटेक प्रा. लि.
- मे. राही इन्फ्राटेक लि.
- मे. टेक्समॅको रेल आणि इंजिनियरींग लि.

७.४ ई-निविदांची तांत्रिक छाननी / प्रकल्पाच्या सर्वसाधारण सल्लागारामार्फत करण्यात आली आणि सदर अहवाल प्राधिकरणास दिनांक ०५ एप्रिल, २०२३ रोजी सादर करण्यात आला.

सर्वसाधारण सल्लागाराने सादर केलेल्या अहवालानुसार निविदाकारांचा पात्र/अपात्रतेचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | पात्र/अपात्र |
|---|---|---|
| १ | मे. अपुर्वक्रिती इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | पात्र |
| २ | मे. आयटीडी सिमेंटेशन इंडिया लि. | पात्र |
| ३ | मे. पारस रेलटेक प्रा. लि. | पात्र |
| ४ | मे. राही इन्फ्राटेक लि. | पात्र |
| ५ | मे. टेक्समॅको रेल आणि इंजिनीयरींग लि. | पात्र |

वरील तांत्रिक छाननी अहवाल निविदा शिफारस समितीच्या दिनांक १२ एप्रिल, २०२३ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला. अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या निविदा शिफारस समितीमध्ये (१) संचालक (कामे), मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी विभाग (२) वित्तीय सल्लागार, (३) प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग, (४) प्रमुख, नियोजन विभाग, (५) मुख्य अभियंता, नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचा समावेश होता. सदर तांत्रिक छाननी अहवालावर विस्तृत चर्चा केल्यानंतर निविदा शिफारस समितीने अहवालास मान्यता दिली.

७.५ चर्चेमध्ये असे नमूद केले की, पॅकेज सी.ए.- १६१ अंतर्गत तांत्रिकदृष्ट्या पात्र ५ निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा-क- आर्थिक प्रस्ताव) दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले. त्यानुसार निविदाकारांचा प्राप्त देकार खालीलप्रमाणे आहेत :-

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत (GST वगळून) | निविदाकाराचा देकार (GST वगळून) | %अंदाज पत्रकीय किमंतीच्या अधिक/ कमी | स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १/५ | मे. अपुर्वक्रिती इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | १३१,११,६८,५५८/- | १२१,५५,९१,३४९/- | -०७.२९ % | L१ |
| २/५ | मे. आयटीडी सिमेंटेशन इंडिया लि. | | १४४,५२,२०,२९७/- | +१०.२२ % | L५ |
| ३/५ | मे. पारस रेलटेक प्रा. लि. | | १२९,९०,००,०००/- | -०.९३ % | L३ |
| ४/५ | मे. राही इन्फ्राटेक लि. | | १४१,८६,०५,२७९/- | +०८.१९ % | L४ |
| ५/५ | मे. टेक्समॅको रेल आणि इंजिनीयरींग लि. | | १२४,४०,५०,३७५/- | -०५.१२ % | L२ |

उघडलेल्या ई-निविदांची आर्थिक छाननी, मेट्रो ४ व ४-अ प्रकल्पाचे सर्वसाधारण सल्लागारामार्फत करण्यात आली. सर्वसाधारण सल्लागाराने दिनांक ०२ मे, २०२३ रोजी आर्थिक छाननी अहवाल प्राधिकरणास सादर केला. त्यानुसार पॅकेज सी.ए. - १६१ मध्ये मे. अपुर्वक्रिती इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचा रु. १२१,५५,९१,३४९/- (GST वगळून) रकमेचा लघुत्तम देकार अंदाजपत्रकीय रु. १३१,११,६८,५५८/- (GST वगळून) किमंतीपेक्षा ०७.२९% कमी दराचा आहे. सदर निविदाकार, निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे व रास्त असून सर्वसाधारण सल्लागार यांनी निविदा स्विकारण्याकरिता शिफारस केली.

७.६ सर्वसाधारण सल्लागार यांनी सादर केलेला आर्थिक छाननी अहवाल निविदा शिफारस समितीपुढे मान्यतेसाठी दिनांक १२ मे, २०२३ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत सादर करण्यात आला. सदर आर्थिक छाननी अहवालावर विस्तृत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती, निविदा शिफारस समितीने मे. अपुर्वक्रिती इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचेकडून त्यांच्या कमी देकारासाठी स्पष्टीकरण मागविण्यास सांगितले. तसेच मे. अपुर्वक्रिती इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचेकडून अतिरिक्त सुरक्षा ठेवी म्हणून त्यांच्या आर्थिक देकाराच्या १% रक्कमेची बँक हमी सादर करण्याचे हमी पत्र घेण्यास सांगितले. मे. अपुर्वक्रिती इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी त्यांच्या कमी रक्कमेच्या आर्थिक देकारासाठी दिनांक २२ मे, २०२३ रोजीच्या पत्रान्वये स्पष्टीकरण सादर केले. तसेच त्यांच्या आर्थिक देकाराच्या १% रक्कमेची बँक हमी सादर करण्याचे हमीपत्र दिले. निविदाकाराने सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे मुद्दे खालील प्रमाणे आहेत:-

अ) निविदाकाराकडे बहुसंख्य साधनसामुग्री उपलब्ध आहे.

ब) निविदाकाराकडील चालू असलेली मुंबई मेट्रो मार्ग ३, पुणे मेट्रो आणि नवी मुंबई मेट्रोतील रेलपथची कामे पूर्णत्वाच्या अंतिम टप्यात असल्याने सदर कामासाठी लागणारे मजूर व यंत्रसामुग्री विनाविलंब उपलब्ध करू शकतो.

क) निविदाकाराला १५ वर्षांचा रेलपथच्या कामाचा अनुभव असल्याने निविदाकारास रेलपथशी निगडीत घटक/सुटे भाग पुरवठादारांकडून वाजवी दरात उपलब्ध होऊ शकतात.

सर्वसाधारण सल्लागार यांनी त्यांच्या दिनांक २७ मे, २०२३ रोजीच्या पत्रान्वये मे. अपुर्वक्रिती इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाचे अवलोकन केले व त्यांचा रु. १२१,५५,९१,३४९/- (GST वगळून) रकमेचा देकार स्विकारण्याची शिफारस केली. निविदा शिफारस समितीने दिनांक ३० जून, २०२३ रोजी आयोजीत बैठकीत मे. अपुर्वक्रिती इन्फ्रास्ट्रक्चर

प्रा. लि. यांनी सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे तसेच त्यांच्या आर्थिक देकाराच्या १% रकमेची बँकहमी सादर करण्याच्या हमी पत्राचे अवलोकन केले व मे. अपुर्वक्रिती इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचा रु. १२१,५५,९१,३४९/- (GST वगळून) अंदाजपत्रकीय रु. १३१,११,६८,५५८/- (GST वगळून) किमंतीपेक्षा ०७.२९% कमी रक्कमेचा लघुत्तम देकार स्विकारण्याची शिफारस केली.

७.७ सादर केलेल्या प्रस्तावाबाबत कार्यकारी समितीमध्ये विस्तृत चर्चा करुन सदर लघुत्तम निविदेस मान्यता देऊन खालीलप्रमाणे ठराव मंजूर केला :

**ठराव क्र.१४६०:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे पॅकेज सी.ए.-१६१ साठी मे. अपुर्वक्रिती इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचा रु. १२१,५५,९१,३४९/- (GST वगळून) अंदाजपत्रकीय रु. १३१,११,६८,५५८/- (GST वगळून) किंमतीपेक्षा ०७.२९% कमी रक्कमेचा लघुत्तम देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे".

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र. ८:** **मुंबई मेट्रो मार्ग-५ प्रकल्पाच्या कशेळी येथील मुख्य डेपोच्या स्टेबलिंग यार्ड, डि.सी.सी. आणि प्रशासकीय इमारत, मेंटेनन्स आणि वर्क शॉप इमारत, ए.एस.एस., फिनिशिंग, प्लम्बिंग, जमिनीच्या मजबुतीसाठी भराव, संरक्षण भिंत, रस्ते, पुल, रेन वॉटर हार्वेस्टिंग, अंडरग्राउंड युटिलिटी, कर्मचारी निवासस्थान इत्यादी आर्किटेक्चरल फिनिशिंग व पी. ई. बी. च्या कामांसहीत बांधकाम करणे (पॅकेज सी.ए. - १५१) या कामासाठी मागविण्यात आलेल्या ई-निविदेसाठी मंजूरी देणेबाबत.**

८.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, महानगर आयुक्तांनी या प्रस्तावाविषयी माहिती देताना असे सांगितले कि, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या १४१ व्या बैठकीत मेट्रो मार्ग- ५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) या प्रकल्पास मान्यता देण्यात आली असून मंत्रिमंडळाच्या दिनांक २४ ऑक्टोंबर, २०१७ रोजीच्या १५० व्या बैठकीत सदर प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे.

तसेच दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मेट्रो मार्ग ५ (ठाणे- भिवंडी - कल्याण) या उन्नत मेट्रो मार्गाच्या उभारणी करिता रु. ८,४१७ कोटी किंमतीच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता दिली आहे. सदर मेट्रो प्रकल्पासाठी शासनाने दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दिनांक २६ जून, २०१९ रोजी सदर प्रकल्पास "महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प (Vital Urban Transport Project)" म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

८.२ सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल M/s D'APPOLONIA TATA Consulting Engineers Ltd. यांनी बनविला असून सदरच्या अहवालानुसार सदर प्रकल्पाची उन्नत मार्गिका कापूरबावडी, ठाणे येथुन जुना ठाणे- भिवंडी रस्त्याने भिवंडी शहरात राजीव गांधी चौक येथून कल्याण रोड मार्ग राजनोली ते दुर्गाडी पर्यंत व त्यापुढे कल्याण शहरातून कल्याण शीळरोड मार्गे कल्याण APMC पर्यंत प्रस्तावित केली आहे.

८.३ मेट्रो मार्ग -५ (ठाणे -भिवंडी- कल्याण) प्रकल्पाच्या भिवंडी शहरामधील सुमारे ३.०० कि.मी. लांबी मध्ये मोठया प्रमाणात पुनर्वसन व पुनर्वसाहत संबंधी समस्या असल्यामुळे सदरचा प्रकल्प दोन टप्प्यात करण्यात येत असून टप्पा -१ (ठाणे ते भिवंडी) मध्ये मार्गिके संबंधी तसेच पुनर्वसन व पुनर्वसाहत संबंधी विशेष समस्या नसल्यामुळे सदर लांबीतील स्थापत्य कामे हाती घेण्यात आली आहेत. सदर प्रकल्पाच्या टप्पा- १ ची लांबी १२.७ कि. मी. असून एकूण ६ मेट्रो स्थानके आहेत. सदर लांबीतील स्थापत्य कामांकरिता Consortium of Systra-CEG-SMCIPL या सहभागी संस्थेची सामान्य सल्लागार (General Consultant) म्हणून दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी नेमणूक करण्यात आली आहे. M/s. AFCONS Infrastructure Ltd. यांना दिनांक ०९ ऑगस्ट, २०१९ रोजी स्थापत्य कामे करण्याकरिता कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. स्थापत्य कामांची दिनांक ३०/०८/२०२३ पर्यंतची एकूण भौतिक प्रगती ८०.२४`% आहे. तसेच सदर प्रकल्पाच्या टप्पा-१ मधील प्रणालीच्या कामांकरिता Consortium of Systra-MVA- Consulting (India) Pvt. Ltd. & Systra या सहभागी संस्थेची सामान्य सल्लागार (General Consultant) म्हणून दिनांक ३१ मे, २०२१ रोजी नेमणूक करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पाच्या उर्वरीत टप्पा -२ (भिवंडी ते कल्याण) मधील भिवंडी शहरामध्ये राजीव गांधी चौक ते साईबाबा मंदीर, टेमघर पर्यंत (सुमोर ३.५ कि. मी. लांबी) मध्ये मोठया प्रमाणात पुनर्वसन व पुनर्वसाहत संबंधी समस्या असल्यामुळे प्रधिकरणाच्या दिनांक२२/०२/२०२२ रोजी झालेल्या १५२ व्या बैठकीत मेट्रो मार्ग ५ (ठाणे -भिवंडी -कल्याण) या प्रकल्पामध्ये धामणकार नाका ते टेमघर मधील उन्नत मार्गिकेचे भूमिगत मार्गात बदल करण्यास प्रस्तावित करण्यात आले असून सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. सदरचा भुमिगत मेट्रो मार्गाचा प्रस्ताव दिनांक२५/०४/२०२२ रोजी शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता. सदर भूमिगत मेट्रो मार्गिकेच्या प्रस्तावास शासनाच्या दिनांक ०६/०६/२०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे तत्वतः मान्यता मिळाली आहे.

८.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमूद केले की, मेट्रो मार्ग -५ या प्रकल्पाचे सद्य: स्थितीचे अवलोकन केले असता सदर प्रकल्पातील टप्पा -१ मधील कामे प्रगतीपथावर असून सदरची काम टप्पा -२ मधील कामांच्या अगोदर पूर्ण होणार आहेत. परंतु सदर प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालात मेट्रो मार्ग -५ साठीचा मेट्रो कारडेपोचे ठिकाण टप्पा -२ मध्ये कोनगाव एमआयडीसी व स्टॅबलिंग यार्ड कल्याण एपीएमसी येथे प्रस्तावित करण्यात आला आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाच्या टप्पा -१ ची कामे पूर्ण होऊन सुध्दा सदरचा टप्पा कार्यान्वत करणे शक्य होणार नाही. त्यामुळे टप्पा -१ कार्यान्वत करण्याकरीता मेट्रो कारडेपोचे ठिकाण टप्पा -१ मध्ये असणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मेट्रो मार्ग -५ या प्रकल्पाचा टप्पा -१ कार्यान्वत करण्याच्या दृष्टीकोनातून मेट्रो कारडेपो सदर टप्पाच्या मौजे. कशेळी, ता. भिवंडी, जि. ठाणे येथे करण्याबाबत प्राधिकरणाच्या १५१ बैठकीत मान्यता घेण्यात आली आहे.

**१.० महानगर आयुक्त यांनी खालीलप्रमाणे सदर कामाचे ठळक वैशिष्टे व निविदा प्रक्रिया बाबत माहिती दिली** :-

**१.१ कामाची ठळक वैशिष्टे :-**

- मेट्रो मार्ग -५ (ठाणे - भिवंडी - कल्याण) च्या कशेळी येथे मेट्रो कारडेपो कामांकरीता दिनांक २१ ऑक्टोबर २०२२ रोजी रू. ४७२.०२ कोटी (सर्व करांसहित) रक्कमेची ई- निविदा मागविण्यात आली होती. सदर निविदेमध्ये खालील कामांचा समावेश आहे.
  - डेपो कंट्रोल सेंटर व प्रशासन (ॲडमिन) इमारत.

- ३० स्टेबलिंग लाईन, ४ इन्स्पेकशन लाईन, ३ वोर्कशॉप लाईनसाठी प्रि - इंजिनीयर शेड (PEB).
- कर्मचारी निवासस्थाने
- मेट्रो कारशेड ची इतर संलग्न कामे जसे, रस्ते, जलवाहिनी, पर्जन्यवाहिनी, माती भराव, इ.

- ई-निविदांच्या अनुषंगाने एकूण चार निविदा प्राप्त झाल्या व या निविदांचे लिफाफा 'अ' (निविदा, इसारा रक्कम व तांत्रिक प्रस्ताव) दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले. या कामाकरीता खालील चार निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या.

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १) | मे. रित्विक प्रोजेक्ट्स प्रा. लि. |
| २) | मे. एन.सी .सी .प्रा. लि. |
| ३) | मे. एस.इ.डब्लू – व्ही.एस.इ (जे.व्ही) |
| ४) | मे. एम.सी.एल – वाय.एफ.सी (जे.व्ही) |

### १.२ निविदा समिती :-

- प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या निविदांच्या छाननीसाठी मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाने खालील प्रमाणे निविदा समिती गठीत केली आहे:
  १. अतिरिक्त महानगर आयुक्त (२) - अध्यक्ष
  २. संचालक (कामे )- सदस्य
  ३. वित्तीय सल्लागार – सदस्य
  ४. प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग - सदस्य
  ५. प्रमुख, नियोजन विभाग - सदस्य
  ६. मुख्य अभियंता, बृहन्मुंबई महानगर पालिका- सदस्य

### १.३ निविदांची तांत्रिक छाननी :-

- ई-निविदांच्या पात्रतेची व तांत्रिक प्रस्तावाची छाननी मेट्रो मार्ग -५ या प्रकल्पाच्या सामान्य सल्लागार (General consultant) M/s Systra-CEG-SMCIPL मार्फत करण्यात आली व त्यासंदर्भातील तांत्रिक मुल्यमापन अहवाल दिनांक २० फेब्रुवारी,

२०२३ रोजी सादर करण्यात आला. सदर अहवालानुसार निविदाकारांच्या पात्र/ अपात्रतेच्या तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| **अ.क्र.** | **निविदाकारांचे नाव** | **तपशिल** |
|---|---|---|
| १) | मे. रित्विक प्रोजेक्ट्स प्रा. लि. | पात्र |
| २) | मे. एन.सी .सी .प्रा. लि. | पात्र |
| ३) | मे. एस.इ.डब्लू – व्ही.एस.इ (जे.व्ही) | पात्र |
| ४) | मे. एम.सी.एल – वाय.एफ.सी (जे.व्ही) | अपात्र |
| | **एकूण** | **पात्र- ३, अपात्र- १** |

मे. एम.सी.एल – वाय.एफ.सी (जे.व्ही) यांनी सादर केलेली निविदा आवश्यक माती स्थिर करण्याच्या (Soil Stabilisation) कामाचा अनुभवाची निकष पूर्ण करीत नसल्याने सदर मे. एम.सी.एल – वाय.एफ.सी (जे.व्ही) यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली.

## १.४ **निविदा आर्थिक छाननी :**

- पॅकेज क्र. १५१ अंतर्गत तांत्रिकदृष्ट्या पात्र तीन निविदिकारांचे दिनांक २३/०२/२०२३ रोजी झालेल्या निविदा शिफारस समितीच्या बैठकीत वरील पात्र निविदाकारांचा वित्तीय लिफाफे उघडण्यासाठी शिफारस करण्यात आली. त्याप्रमाणे तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे दिनांक ०९/०३/२०२३ रोजी उघडण्यात आले. निविदाकारांच्या आर्थिक देकारांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **निविदाकारांचे नांव** | **निविदेची रक्कम (रू. कोटी)** | **प्राप्त देकार (रू. कोटी)** | **% कमी/ अधिक** |
|---|---|---|---|---|
| १) | मे. रित्विक प्रोजेक्ट्स प्रा. लि. | **४७२.०२** | **५९७.९२** | **(+)२६.६०%** |
| २) | मे. एन सी सी प्रा. लि. | | ६०८.९१ | (+)२९.०१% |
| ३) | मे. एस इ डब्लू - व्ही एस इ (जे व्ही ) | | ६१२.०८ | (+)२९.८१% |

- सदर निविदांच्या आर्थिक लिफाफा मध्ये लघुत्तम देकार मे. रित्विक प्रोजेक्ट्स प्रा. लि. यांनी अंदाजप्रत्रकीय दरा पेक्षा २६.६०% जास्त दराने सादर केल्याने सदर दराबाबत खुलासा मिळण्याकरीता प्राधिकारणामार्फत लघुत्तम देकारास विचारण्यात आले. त्याअनुषंगाने मे. रित्विक प्रोजेक्ट्स प्रा. लि. यांनी त्यांच्या दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या पत्रान्वये सदरचा खुलासा सादर केला व त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

- बांधकाम सामग्रीच्या किंमतीत झालेली अतिरिक्त वाढ व निविदेमधील दर हे राज्य दरसूची २०२२-२०२३ पेक्षा कमी असल्याने.
- कुशल मजदूरांसाठी अतिरिक्त खर्च.
- बांधकाम कालावधी दरम्यान तात्पुरते रस्ते आणि देखभालीचा अतिरिक्त खर्च.
- सुरक्षा रक्षक कर्मचाऱ्यांच्या तैनातीसाठी अतिरिक्त खर्च.
- अनुभवी अभियंता/कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसाठी अतिरिक्त खर्च.
- डिझाईन अभियांत्रिकी सेवांसाठी अतिरिक्त खर्च.
- साइट ऑफिस व प्रयोगशाळा (Material Quality testing laboratory) च्या स्थापनेसाठी अतिरिक्त खर्च.
- दोष दायित्व कालावधी (DLP) मध्ये अभियंता/कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसाठी अतिरिक्त खर्च.
- कामगार विमा, कामगार कल्याण कर (Labour cess) साठीचा अतिरिक्त खर्च.

- सदर वरील प्रमाणे लघुत्तम निविदाकाराचा प्राप्त आर्थिक देकाराचा व देकारा बाबतचे स्पष्टीकरण याचे मेट्रो मार्ग ५ प्रकल्पाचे सल्लागार M/s. SYSTRA-CEG-SMCIPL Consortium यांच्या मार्फत छाननी करण्यात आली.
- सामान्य सल्लागारा मार्फत सदर कामाचे रू. ४७२.०२ कोटी (सर्व करांसहित) रक्कमेचे अंदाजपत्रक सा. बां. विभागाच्या राज्य दर सूची २०२१-२०२२ व प्राधिकरणाच्या मंडाले येथील मेट्रो कारडेपोच्या कामाच्या व इतर तत्सम कामाचे दर घेऊन बनविण्यात आले होते.
- सामान्य सल्लागार मार्फत कशेळी कारडेपोचे (सी.ए.-१५१) अंदाजपत्रक तयार करतेवेळी मेट्रो मार्ग -२ब च्या मंडाळे येथील मेट्रो कारडेपोची (L2B-C103) स्थापत्य कामे प्रगतीपथावर असल्याने व सदरची स्थापत्य कामे कशेळी डेपोच्या स्थापत्य कामाच्या समान स्वरूपाची असल्याने व मंडाळे कारडेपो मधील (L२B-C१०३) मातीभराव कामाचा दर हा सा. बां. विभागाच्या २०२०-२१ च्या दरसूची पेक्षा कमी असल्याने तसेच स्पर्धात्मक निविदा येण्यासाठी मातीभरावाच्या कामासाठी मंडाळे कारडेपो मधील (L२B-C१०३) मातीभराव कामाचा स्वीकृत दर (भाववाढीसह) घेण्यात आला.

- मेट्रो मार्ग -२ब च्या मंडाळे येथील मेट्रो कारडेपो मधील मातीभरावाचा दर रु. ३३५.५२/- प्रती घन मीटर (वस्तू व सेवा कर, रॉयल्टी ,इ.सहीत) इतका आहे व भाववाढीसह (५% प्रति वर्ष असे दोन वर्षाकरिता) रु.३८९.७३/- इतका घेण्यात आला .
- मातीभराव कामाचा दर सा. बां. विभागाच्या २०२०-२१ च्या दरसूचीनुसार रु.६६६.४० प्रती घन मीटर (वस्तू व सेवा कर, रॉयल्टी ,इ. सहीत) इतका होता आणि सध्याच्या सा. बां. विभागाच्या २०२२-२३ च्या दरसूचीनुसार रु.११६६.२२ प्रती घन मीटर (वस्तू व सेवा कर, रॉयल्टी ,इ. सहीत) इतका असून. सदर दर सा. बां. विभागाच्या २०२०-२१ च्या दरसूची पेक्षा ७५% अधिकचा आहे. यानुसार असे निदर्शनास येत की, सदरची भाववाढ Ministry of Housing and Urban Affairs (MoHUA) च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार असणाऱ्या ५% प्रति वर्ष भाववाढी पेक्षा खूपच जास्त आहे.
- तसेच सळई कामाचा (reinforcement work) चा सा. बां. विभागाच्या २०२२-२३ च्या दरसूचीचा दर हा सा. बां. विभागाच्या २०२१-२२ च्या दरसूची पेक्षा २५% अधिकचा आहे.
- वरील बाबीं विचारात घेता सल्लागारने सदर कामातील महत्वाचे घटक कामे जसे की माती भराव कामे, सळी कामे (Reinforcement Works), पाइलींग, ड्राय लीन कॉंक्रीट
- (DLC), खोदकामतील अतिरिक्त मातीची विल्हेवाट (Disposal), स्ट्रक्चरल स्टील इ. कामांच्या निविदा दर व सध्याच्या सा. बां. विभागाच्या राज्य दर सूची २०२२-२०२३ मधील दरातील वाढीव तफावत विचारात घेऊन वरील कामांचा वाढलेला दरांचा अंदाजपत्रकावर २२.३६ % इतका वाढीव परिणाम होत आहे असे कळविले.

| अनु.क्र. | महत्वाचे घटक कामे | निविदा दर व सा.बां. राज्य दरसूची २०२२-२३ मध्ये वाढीव तफावत असल्यामुळे अंदाजपत्रकामध्ये होणारी वाढ. |
|---|---|---|
| १ | मेट्रो कारडेपो साठीचे माती व भराव काम | १५.४७ % |
| २ | अतिरिक्त मातीची विल्हेवाट (Disposal) | ०.७७% |
| ३ | सळई (Reinforecment Bars) | ३.७९% |
| ४ | पाइलींग | १.४८% |
| ५ | इतर कामे (ड्राय लिन कॉंक्रिट (DLC), पेव्हमेंट क्वालिटी कॉंक्रिट (PQC), स्ट्रक्चरल स्टील, इ.) होणारी वाढ. | ०.८५% |
| | **एकुण अंदाजपत्रकामध्ये होणारी वाढ (टक्केवारी)** | **२२.३६%** |

..३८/-

- वरील बाबीं विचारात घेऊन सामान्य सल्लागारास सदर कामाचे अंदाजपत्रक हे सा.बां. विभागाच्या राज्य दर सूची २०२२-२०२३ व बृहन्मुंबई महानगरपालिका दर सूची २०२३ नुसार तयार करण्याचे सुचविण्यात आले जेणे करून नवीन अंदाजपत्रका बरोबर लघुत्तम देकाराची तुलना करणे उचित ठरेल.
- सामान्य सल्लागारने सा.बां. विभागाच्या राज्य दर सूची २०२२-२०२३ व बृहन्मुंबई महानगरपालिका दर सूची २०२३ मधील दरावर आधारीत नवीन अंदाजपत्रक निविदा समितीच्या दिनांक ०९/०५/२०२३ च्या बैठकित सादर केले व त्यानुसार सदर अंदाजपत्रक रु.६०२.८८ कोटी (सर्व करांसहित) इतके आहे.

| अ.क्र. | कामाचे वर्णन | निविदा रक्कम (राज्य दर सुची -२०२१-२२ व तत्सम कामाच्या दरावर आधारित) | सुधारित अंदाजपत्रक रक्कम ( सा.बां. राज्य दर सुची -२०२२-२३ व बृहन्मुंबई महानगरपालिका दर सुची २०२३ वर आधारित) |
|---|---|---|---|
| १ | **सुची (अ)**: डेपोचे आर.सी.सी. कामे प्रशासकीय इमारतीचे काम. | २०३,३८,२६,६२०/- | २३५,३६,७३,०२९/- |
| २ | **सुची (ब)**: माती भराव, रस्ते, पर्जन्य वाहिन्या, इत्यादीचे कामे. | १०५,३३,२५,२२१/- | १८९,३६,००,१८१/- |
| ३ | **सुची (क)**: डेपोसाठी प्री-इंजिनिअर शेड. | ४८,२०,७१,९०२/- | ४८,२०,७१,९०२/- |
| ४ | **सुची (ड)**: आकास्मिक कामासांठी तरतुद | १२,१८,८२,५५२/- | १२,१८,८२,५५२/- |
| ५ | **सुची (इ)** : कर्मचारी निवासस्थाने | ९०,०६,९१,३३६/- | १०१,७३,५५,१७५/- |
| ६ | **सुची (फ)**: मुख्य रस्त्यापासुन डेपोसाठी प्रवेश (approach) रस्ता व पुल | १२,८४,३४,२७४/- | १६,०३,०५,३०४/- |
| | **एकुण** | **४७२,०२,३१,९०५/-** | **६०२,८८,८८,१४३/-** |

- वरील वाढलेल्या अंदाजपत्रकाबाबत सामान्य सल्लागाराने स्पष्टीकरण देतांना निविदा समितीच्या दिनांक०९/०५/२०२३ च्या बैठकीत सांगितले की, वाढलेली रक्कम हि मुख्यतः निविदा दर व सध्याच्या राज्य दर सूची २०२२-२०२३ मधील वाढीव तफावत मुळे आहे.
- वरील सर्व बाबीं लक्षात घेऊन सामान्य सल्लागार यांनी असे सांगितले की सा.बां. विभागाच्या राज्य दर सूची २०२२-२०२३ व बृहन्मुंबई महानगरपालिका दर सूची २०२३ वर आधारित अंदाजपत्रका नुसार लघुत्तम देकाराची रक्कम हि कमी जरी असली तरी लघुत्तम निवीदाकारा बरोबर वाटाघाटी करण्यात यावी .

| अ.क्र | कामाचे वर्णन | **निविदा रक्कम (राज्य दर सुची - २०२१-२२ व तत्सम कामाच्या दरावर आधारित)** | **सुधारित अंदाजपत्रक रक्कम ( सा.बां. राज्य दर सुची २०२२-२३ व बृहन्मुंबई महानगरपालिका दर सुची २०२३ वर आधारित)** | **लघुत्तम निविदाकाराचा प्राप्त देकार** |
|---|---|---|---|---|
| १ | **सुची (अ)**: डेपोचे र.सी.सी. कामे व प्रशासकीय मारतीचे कामे | २०३,३८,२६,६२०/- | २३५,३६,७३,०२९/- | २५१,७८,९९,९४२/- |
| २ | **सुची (ब)**: माती भराव, रस्ते, पर्जन्य वाहिन्या, इत्यादीचे कामे. | १०५,३३,२५,२२१/- | १८९,३६,००,१८१/- | १४९,९६,९१,१०२/- |
| ३ | **सुची (क)**: डेपोसाठी प्री- इंजिनिअर शेड. | ४८,२०,७१,९०२/- | ४८,२०,७१,९०२/- | ४९,०५,२८,७१५/- |
| ४ | **सुची (ड)**: आकास्मिक कामासांठी तरतुद | १२,१८,८२,५५२/- | १२,१८,८२,५५२/- | १२,१८,८२,५५२/- |
| ५ | **सुची (इ)** : कर्मचारी निवासस्थाने | ९०,०६,९१,३३६/- | १०१,७३,५५,१७५/- | ११६,२६,१३,४७९/- |
| ६ | **सुची (फ)**: मुख्य रस्त्यापासुन डेपोसाठी प्रवेश (approach) रस्ता व पुल | १२,८४,३४,२७४/- | १६,०३,०५,३०४/- | १८,२९,८६,२८८/- |
| | **एकुण** | **४७२,०२,३१,९०५/-** | **६०२,८८,८८,१४३/-** | **५९७,५६,०२,०७८/-** |

- निविदा समितीच्या दिनांक ०३/०५/२०२३ व दिनांक ०९/०५/२०२३ च्या बैठकित सामान्य सल्लागारामार्फत दिनांक २८/०३/२०२३ रोजी प्राप्त झालेल्या वित्तीय मूल्यमापन अहवाल सादर करण्यात आला व वरील प्रमाणे स्पष्टीकरणावर चर्चा करण्यात आली.
- निविदा समितीने लघुत्तम निविदाकाराला वाटाघाटी करण्यासाठी बोलाविले. लघुत्तम निविदाकाराने त्याचा देकार उपरोक्त बाब २.४ मध्ये दिलेल्या कारणास्तव देकार अत्यंत वाजवी आहे असे स्पष्टीकरण दिले.
- सखोल चर्चेनंतर, निविदा समितीने लघुत्तम निविदाकारास सांगितले कि, सा.बां. विभागाच्या राज्य दर सूची २०२२-२०२३ व बृहन्मुंबई महानगरपालिका दर सूची २०२३ वर आधारित अंदाजपत्रका नुसार लघुतम देकार हा सूची (अ), (इ), व (फ) मध्ये जास्त असल्याने लघुत्तम निविदेकारास पुर्नविचार करून अंतिम देकार सादर करावे, असे सुचवले. त्या अनुषंगाने लघुत्तम निविदाकार मे. रित्विक प्रोजेक्ट्स प्रा. लि. यांनी देकार मध्ये रु.८.०० कोटी (आठ कोटी) इतके कमी करून दिनांक ०९/०५/२०२३ रोजीच्या पत्रानव्ये अंतिम त देकार रु.५८९,५६,०२,०७८/- (सर्व करांसहित) सादर केला.

| अ.क्र. | कामाचे वर्णन | निविदा रक्कम (राज्य दर सुची - २०२१-२२ व तत्सम कामाच्या दरावर आधारित) | सुधारित अंदाजपत्रक रक्कम ( सा.बां. राज्य दर सुची -२०२२-२३ व बृहन्मुंबई महानगरपालिका दर सुची २०२३ वर आधारित) | लघुत्तम निविदाकाराचा प्राप्त देकार | लघुत्तम निविदाकराचा अंतिम सुधारित देकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | **सुची (अ)**: डेपोचे आर.सी.सी. कामे व प्रशासकीय इमारतीचे काम. | २०३,३८,२६,६२०/- | २३५,३६,७३,०२९/- | २५१,७८,९९,९४२/- | **२४९,७८,९९,९४२/-** |
| २ | **सुची (ब)**: माती भराव, रस्ते, पर्जन्य वाहिन्या, इत्यादीचे कामे. | १०५,३३,२५,२२१/- | १८९,३६,००,१८१/- | १४९,९६,९१,१०२/- | **१४९,९६,९१,१०२/-** |
| ३ | **सुची (क)**: डेपोसाठी प्री-इंजिनिअर शेड. | ४८,२०,७१,९०२/- | ४८,२०,७१,९०२/- | ४९,०५,२८,७१५/- | **४९,०५,२८,७१५/-** |
| ४ | **सुची (ड)**: आकास्मिक कामासांठी तरतुद | १२,१८,८२,५५२/- | १२,१८,८२,५५२/- | १२,१८,८२,५५२/- | **१२,१८,८२,५५२/-** |
| ५ | **सुची (इ)** : कर्मचारी निवासस्थाने | ९०,०६,९१,३३६/- | १०१,७३,५५,१७५/- | ११६,२६,१३,४७९/- | **११०,२६,१३,४७९/-** |
| ६ | **सुची (फ)**: मुख्य रस्त्यापासुन डेपोसाठी प्रवेश (approach) रस्ता व पुल | १२,८४,३४,२७४/- | १६,०३,०५,३०४/- | १८,२९,८६,२८८/- | **१८,२९,८६,२८८/-** |
| | **एकुण** | ४७२,०२,३१,९०५/- | ६०२,८८,८८,१४३/- | ५९७,५६,०२,०७८/- | **५८९,५६,०२,०७८/-** |

- लघुत्तम निविदाकाराने सादर केलेला अंतिम देकार हा सा.बां. विभागाच्या राज्य दर सूची २०२२-२०२३ व बृहन्मुंबई महानगरपालिका दर सूची २०२३ वर आधारित अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा (-)२.२१% इतका कमी आहे व निविदा रक्कमेपेक्षा (+)२४.९०% इतका जास्त आहे.

- वरील बाबीं व राज्य दर सूची २०२३ दरा मुळे अंदाजपत्रकामध्ये झालेली वाढीव तफावत लक्षात घेता लघुत्तम निविदाकरने केलेला अंतिम देकार वाजबी व रास्त असून सामान्य सल्लागारने दिनांक १२/०५/२०२३ च्या पत्रानव्ये व निविदा समितीने देकार स्विकारण्याची शिफारस केली आहे.
- सदर कामाची निविदा हि सल्लागारामार्फत (सामान्य सल्लागार व संकल्पचित्र सल्लागार) तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकावर आधारित असून सदर निविदा अंदाजपत्रक हे सल्लागाराने तस्यम कामाचे स्वीकृत दर,सा.बां. राज्य दर सुची २०२१-२२ व बृहन्मुंबई महानगरपालिका दर सुची २०१८ यांचे दर घेऊन तयार केलेले आहे. तथापि, आर्थिक निविदा उघडल्यानंतर असे आढळून आले की, सल्लागाराने तयार केलेले अंदाजपत्रक हे प्रचलित आणि बाजार दरानुसार नसल्याने परिणामी विषयांकित कामासाठी जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्या.
- वरील बांबी लक्षात घेता कार्यकारी समितीने असे मत मांडले कि सदर अंदाजपत्रक तयार करताना सल्लागाराने प्रचलित आणि कार्यक्षम दर मिळविण्यासाठी योग्य परिश्रम घेतले नाहीत. परिणामी सल्लागाराने तयार केलेल्या अन्दाजपत्रकातील त्रुटी लक्षात घेता कार्यकारी समितीने नाराजी व्यक्त करून संबंधित सल्लागारांवर उचित कार्यवाही करण्याचे आदेश दिले .
- सादर केलेल्या प्रस्तावाबाबत कार्यकारी समितीमध्ये साधक बाधक चर्चा करून प्रकरणाची योग्यता लक्षात घेता सदर लघुत्तम निविदेस मान्यता देऊन खालीलप्रमाणे ठरव मंजूर केला.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४६१:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ७ चे उप कलम (३) चे पोट कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मेट्रो मार्ग-५ प्रकल्पातील पॅकेज (सी.ए. – १५१) कशेळी येथील

मेट्रो कारडेपो बांधकामासाठी मे. रित्विक प्रोजेक्ट्स प्रा.लि. यांनी सादर केलेला सुधारित लघुत्तम देकार रु.५८९,५६,०२,०७८/- (रु.पाचशे एकोण नव्वद कोटी छप्पन लाख दोन हजार अठ्ठ्यात्तर फक्त) (सर्व करांसहित) स्विकारण्यास व त्याअनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.”

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांच्या याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र. ९: मुंबई मेट्रो प्रकल्प ५ च्या (ठाणे-भिवंडी-कल्याण) मार्गिकेच्या कापूरबावडी स्थानक (सा.क्र.-३०१.३७३ मी.) ते धामणकर नाका स्थानक (सा.क्र. १३०२५.९५७ मी.) तसेच कशेळी स्थानकानजिकचा तिसरा रेल्वेमार्ग आणि डेपो प्रवेश / निकास जोडणारा गिट्टीरहित (Ballastess) रेल्वेमार्गाच्या कामासाठी संरचना (डिझाईन), उत्पादन, पूरवठा, स्थापना, चाचणी आणि मार्ग कमिशनिंग करणे (खुला करणे) (सी.ए.-१६६) च्या कामाकरीता मागविलेल्या ई-निविदांना मान्यता मिळणेबाबत.**

९.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मेट्रो मार्ग – ५ (ठाणे – भिवंडी – कल्याण) या उन्नत मेट्रो मार्गाच्या उभारणीकरीता रु. ८,४१७ कोटी किंमतीच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. तसेच मेट्रो मार्ग ५ (ठाणे – भिवंडी – कल्याण) या प्रकल्पासाठी अंमलबजावणी संस्था म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मेट्रो मार्ग ५ या प्रकल्पासाठी सर्वसाधारण सल्लागार (General Consultant) म्हणून M/s. Systra-CEG-SMCIPL Consortium यांची नेमणूक करण्यात आली आहे.

९.२ चर्चेदरम्यान महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, मेट्रो मार्ग ५ टप्पा – १ मधील स्थापत्य कामे प्रगतीपथावर असून ८०% कामे पूर्ण झाली आहेत. मुख्य मार्गिकेमधील खांबांचा पाया, सबस्ट्रक्चर, गर्डर्स उभारणीसारखी सुपरस्ट्रक्चरची कामे प्रगतीपथावर आहेत. स्थापत्य कामामध्ये गिट्टीरहीत (Ballastless) ट्रॅकसह मुख्य मार्ग आणि गिट्टीसहीत (Ballasted) ट्रॅकसह डेपो अशा कामांचा समावेश होतो. व्हायाडक्ट आणि स्टेशनसाठी गर्डर्स उभारण्यासह स्थापत्य कामे पूर्ण होताच ट्रॅकचे काम सुरू करणे अपेक्षित आहे. या बाबी विचारात घेऊन, मेट्रो मार्ग ५ या मार्गिकेवरील कापूरबावडी स्थानक (सा. क्र. – ३०१.३७३ मी.) ते धामणकर नाका स्थानक

(सा. क्र. १३०२५.९५७ मी.) तसेच कशेळी स्थानकानजिकचा तिसरा रेल्वेमार्ग आणि डेपो प्रवेश/निकास जोडणाऱ्या गिट्टीरहित (Ballastess) रेल्वेमार्गाच्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या. सदर कामाकरिता ई-निविदा मागविण्यासाठी मिड डे व सामना या वृत्तपत्रात दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजी ई-निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आली. प्रचलित पध्दतीनुसार निविदापूर्व बैठक दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी घेण्यात आली. निविदाकारांनी उपस्थित केलेल्या इतर बाबींचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले.

९.३ ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष दिनांक ०५ एप्रिल, २०२३ रोजी दुपारी ३:०० वाजता लिफाफा - अ (निविदा इसारा किंमत) आणि लिफाफा - ब (तांत्रिक प्रस्ताव) उघडण्यात आला. निविदा प्रक्रियेत भाग घेतलेल्या निविदाकारांची नावे खालीलप्रमाणे आहेत :-

- मे. अपुर्वक्रिती इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.
- मे. आयटीडी सिमेंटेशन इंडिया लि.
- मे. पारस रेलटेक प्रा. लि.
- मे. राही इन्फ्राटेक लि.
- मे. टेक्समॅको रेल आणि इंजिनियरींग लि.

९.४ ई-निविदांची तांत्रिक छाननी प्रकल्पाच्या सर्वसाधारण सल्लागारामार्फत करण्यात आली आणि सदर अहवाल प्राधिकरणास दिनांक ०४ मे, २०२३ रोजी सादर करण्यात आला. सर्वसाधारण सल्लागाराने सादर केलेल्या अहवालानुसार निविदाकारांचा पात्र/अपात्रतेचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | पात्र/अपात्र |
|---|---|---|
| १ | मे. अपुर्वक्रिती इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | पात्र |
| २ | मे. आयटीडी सिमेंटेशन इंडिया लि. | पात्र |
| ३ | मे. पारस रेलटेक प्रा. लि. | पात्र |
| ४ | मे. राही इन्फ्राटेक लि. | पात्र |
| ५ | मे. टेक्समॅको रेल आणि इंजिनीअरींग लि. | पात्र |

वरील तांत्रिक छाननी अहवाल, निविदा शिफारस समितीच्या दिनांक ११ मे, २०२३ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला. अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या निविदा शिफारस समितीमध्ये (१) संचालक (कामे), मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी विभाग(२) वित्तीय सल्लागार, (३) प्रमुख - नगर व क्षेत्र नियोजन विभाग, (४) प्रमुख -नियोजन विभाग, (५) मुख्य अभियंता, नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र, बृहन्मुंबई महानगरपालिका

यांचा समावेश होता. सदर तांत्रिक छाननी अहवालावर विस्तृत चर्चा केल्यानंतर निविदा शिफारस समितीने अहवालास मान्यता दिली.

९.५ पॅकेज सी.ए.-१६६ अंतर्गत तांत्रिकदृष्ट्या पात्र ५ निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा – क - आर्थिक प्रस्ताव) दिनांक २४ मे, २०२३ रोजी ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले. त्यानुसार निविदाकारांचा प्राप्त देकार खालीलप्रमाणे आहेत :-

| **अ.क्र.** | **निविदाकाराचे नाव** | **अंदाजपत्रकीय किंमत (GST वगळून)** | **निविदाकाराचा देकार (GST वगळून)** | **%अंदाज पत्रकीय किमंतीच्या अधिक/ कमी** | **स्थिती** |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **१/५** | **मे. पारस रेलटेक प्रा. लि.** | १०८,४१,२८,८४१/- | **९७,४०,००,०००/-** | **- १०.१६ %** | **L१** |
| २/५ | मे. अपुर्वक्रिती इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | | ९८,५४,८६,३१२/- | -९.१० % | L२ |
| ३/५ | मे. टेक्समॅको रेल आणि इंजिनीअरींग लि. | | ९९,०४,९९,८१६/- | - ८.६४ % | L३ |
| ४/५ | मे. राही इन्फ्राटेक लि. | | १०६,६६,००,०००/- | -१.६२ % | L४ |
| ५/५ | मे. आय.टी.डी. सिमेंटेशन इंडिया लि. | | ११६,९२,७८,८१४/- | +७.८५ % | L५ |

उघडलेल्या ई-निविदांची आर्थिक छाननी, मेट्रो मार्ग ५ (ठाणे – भिवंडी – कल्याण) प्रकल्पाचे सर्वसाधारण सल्लागारामार्फत करण्यात आली. सर्वसाधारण सल्लागाराने दिनांक ०७ जून, २०२३ रोजी आर्थिक छाननी अहवाल प्राधिकरणास सादर केला. त्यानुसार पॅकेज सी.ए. - १६६ मध्ये मे. पारस रेलटेक प्रा. लि. यांचा रु. **९७,४०,००,०००/-** (GST वगळून) रकमेचा लघुत्तम देकार अंदाजपत्रकीय रु. १०८,४१,२८,८४१/-(GST वगळून) किमंतीपेक्षा **१०.१६**% कमी दराचा आहे.

९.६ चर्चेदरम्यान महानगर आयुक्तांनी पुढे असे नमूद केले की, मे. पारस रेलटेक प्रा. लि. यांचा सदर देकार हा अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १०. १६% कमी दराचा असल्यामुळे प्राधिकरणाच्या दिनांक ३० मे, २०२३ रोजीच्या पत्रान्वये मे. पारस रेलटेक प्रा. लि. यांचेकडून कमी देकारासाठी स्पष्टीकरण मागविण्यात आले. तसेच मे. पारस रेलटेक प्रा. लि. यांना अतिरिक्त सुरक्षा ठेवी म्हणून अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.१६% रकमेची बँक हमी सादर करण्याचे हमी पत्र देण्यास सांगितले. मे. पारस रेलटेक प्रा. लि. यांनी त्यांच्या कमी रक्कमेच्या आर्थिक देकारासाठी दिनांक ०३ जून, २०२३ रोजीच्या पत्रान्वये स्पष्टीकरण सादर केले. तसेच त्यांच्या आर्थिक देकाराच्या १.१६% रक्कमेची बँकहमी सादर करण्याचे हमीपत्र दिले.

निविदाकाराने सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

अ) निविदाकाराकडे स्वत:च्या मालकीची बहुसंख्य साधनसामुग्री जसे की, वेल्डींग मशीन, बॅचिंग प्लान्ट, बुमप्लेसर इ. उपलब्ध आहेत.

ब) निविदाकाराकडे भारतीय रेल्वे तसेच विविध मेट्रोतील गिट्टीरहित रेल्वे मार्गाच्या कामाचा अनुभव आहे.

क) निविदाकाराकडे मुंबई महानगर क्षेत्रामध्ये कामाचा देखील अनुभव आहे. निविदाकाराने मुंबई मेट्रो मार्ग २अ (दहिसर ते डि एन. नगर) च्या गिट्टीरहित रेल्वेमार्गाचे काम पुर्ण केले आहे.

सर्वसाधारण सल्लागार यांनी त्यांच्या दिनांक ०७ जून, २०२३ रोजीच्या पत्रान्वये मे. पारस रेलटेक प्रा. लि. यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाचे अवलोकन केले व त्यांचा रु. **९७,४०,००,०००/-** (GST वगळून) रक्कमेचा देकार स्विकारण्याची शिफारस केली.

९.७ महानगर आयुक्तांनी पुढे असेही नमूद केले की, सर्वसाधारण सल्लागार यांनी सादर केलेला आर्थिक छाननी अहवाल निविदा शिफारस समितीपुढे मान्यतेसाठी दिनांक ११ ऑगस्ट, २०२३ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत सादर करण्यात आला. सदर आर्थिक छाननी अहवालावर व तसेच मे. पारस रेलटेक प्रा. लि. यांनी त्यांच्या कमी देकारासाठी सादर केलेल्या स्पष्टीकरणावर विस्तृत चर्चा करण्यात आली. तसेच मे. पारस रेलटेक प्रा. लि. यांनी अंदाजपत्रकीय रकमेच्या १.१६% रकमेची बँक हमी सादर करण्याच्या हमीपत्राचे अवलोकन केले.

चर्चेअंती मे. पारस रेलटेक प्रा. लि. यांचा रु.**९७,४०,००,०००**/- (GST वगळून) अंदाजपत्रकीय रु. १०८,४१,२८,८४१/- (GST वगळून) किंमतीपेक्षा १०.१६% कमी रक्कमेचा लघुत्तम देकार स्विकारण्याची शिफारस केली.

९.८ कार्यकारी समितीने सदर प्रस्तावाबाबत चर्चा करुन प्रकरणाची योग्यता लक्षात घेता सदर लघुत्तम निविदेस मान्यता देऊन खालीलप्रमाणे ठराव मंजूर केला.

**<u>ठराव क्र.१४६२:</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे पॅकेज सी.ए.- १६६साठी मे. पारस रेलटेक प्रा. लि.यांचा **रु.९७,४०,००,०००**/- (GST वगळून) अंदाजपत्रकीय रु. १०८,४१,२८,८४१/-(GST वगळून) किंमतीपेक्षा १०.१६% कमी रकमेचा लघुत्तम देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने

करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे".

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.१०: मेट्रो मार्ग-१२ मार्गिकेसाठी (कल्याण - तळोजा) डेपो, स्टेशन, स्टाफ क्वार्टर, ओसीसी, ऑक्सिलरी स्ट्रक्चर्ससाठी ई आणि एम वर्क्स, सिव्हिल वर्क्स यांच्यासह आर्किटेक्चरल आणि बिल्डींग सर्व्हिसेससाठी सविस्तर संकल्पचित्र सल्लागार (डीडीसी) ची नियुक्ती करणेबाबत.**

१०.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले कि, मुंबई महानगर प्रदेशात होणारी लोकसंख्या वाढ, विकास व रोजगार वाढ लक्षात घेऊन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने आवश्यक असणारे परिवहन जाळ यांचा अभ्यास करुन सर्वंकष परिवहन अभ्यास सन २००८ मध्ये पूर्ण केला. तसेच कल्याण-डोंबिवली या शहरातील वाढती लोकसंख्या व परिसराचा होणारा विकास, विशेष नियोजन प्राधिकरण असलेल्या २७ गावांचा विकास आराखडा, कल्याण विकासकेंद्र व NAINA चे क्षेत्र तसेच कल्याण-डोंबिवलीही शहरे नवी मुंबई या शहराला जोडण्याची निकड लक्षात घेता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मेट्रो मार्ग-५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) चे पुढे कल्याण ते तळोजा (डोंबिवली मार्गे ) मेट्रो मार्गिका- १२ अन्वये विस्तार प्रस्तावित केला आहे. सदर मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी मे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC) ची सल्लागार म्हणून नियुक्ती केली असून त्यांनी सविस्तर प्रकल्प अहवाल माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये प्राधिकरणास सादर केला आहे.

१०.२ सदर मेट्रो मार्ग १२ ची एकूण लांबी २०.७५६ कि.मी. असून १७ स्थानके प्रस्तावित आहेत. तसेच या प्रकल्पाची किंमतरु.५,८६५ कोटी एवढी आहे. सदर मार्गास प्राधिकरणाच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या १४६ व्या बैठकीत मान्यता मिळाली असून दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी शासनाची मान्यता मिळाली आहे. त्याप्रमाणे दिनांक ०६ सप्टेंबर, २०१९ रोजी सदर प्रकल्पास "महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प (Vital Urban Transport Project)" म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

१०.३ प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सामान्य सल्लागार म्हणून मे. सिस्ट्रा एस ए आणि मे. डी. बी. इंजिनीअरिंग अँड कन्सलटिंग जीएमबीएच यांचे संयुक्त उपक्रम यांची दिनांक ०७ सप्टेंबर, २०२२ रोजी नेमणूक करण्यात आली असून त्यांनी मेट्रो मार्ग १२ करीता सविस्तर संकल्पचित्र सल्लागार (DDC) नेमणूकीसाठी अंदाजपत्रक व मसुदा निविदा सादर केली होती. सविस्तर संकल्पचित्र सल्लागाराकडून प्रामुख्याने खालील सेवा अपेक्षित आहेत :-

१. स्थानकांच्या इमारतीचे वास्तुकला योजना (Architectural Scheme)

२. विद्युत यांत्रिकी सेवांचे (E & M) संकल्पचित्र बनविणे,

३. डेपोतील इमारतीचे विस्तृत संकल्पचित्बनविणे.

१०.४ मेट्रो मार्ग – १२ (कल्याण-तळोजा) या मेट्रो मार्गाच्या स्थापत्य, वास्तु आणि इमारत सेवा, विद्युत व यांत्रिकी कामासाठी सविस्तर संकल्पचित्र सल्लागार (DDC) ची नियुक्ती करणे करिता ई-निविदा मागविण्यासाठी 'द इंडियन एक्सप्रेस' व 'प्रहार' या वृत्तपत्रात दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. प्रचलित पद्धतीनुसार निविदा पूर्व बैठक घेवून उपस्थित केलेले प्रश्न व स्पष्टीकरण महा-टेंडरच्या ई-निविदा संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आले.

१०.५ दिनांक २० मार्च, २०२३ रोजी दुपारी ११.०० वाजता लिफाफा 'अ' (निविदा व इसारा किंमत) व 'ब' (तांत्रिक प्रस्ताव) उघडण्यातआले, ज्यामध्ये खालील ६ निविदाकारांनी ई-निविदाप्रस्ताव सादर केले:-

| अ.क्र | निविदा कारांचे नाव |
|---|---|
| १ | मे. आयेसा इंजिनेरिया वाय आर्किटेक्टच्युरा, एस. ए. यू. |
| २ | मे. बालाजी रेलरोड सिस्टिम्स प्राईव्हेट लिमिटेड आणि एफ पी इंडिया प्रोजेक्ट मॅनेजमेंण्ट यांचे संयुक्त उपक्रम |
| ३ | मे. एजिस रेल एस ए आणि एजिस इंडिया कन्सलटिंग इंजिनिअर्स प्राइव्हेट लिमिटेड यांचे संयुक्त उपक्रम |
| ४ | मे. एल के टी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्राइव्हेट लिमिटेड यांचे संयुक्त उपक्रम |
| ५ | मे. एम एम एस पी ए आणि एसएमइसी (इंडिया) प्राइव्हेट लिमिटेड यांचेसंयुक्त उपक्रम |
| ६ | मे. राइट्स लिमिटेड आणि सीइजी लिमिटेड यांचे संयुक्त उपक्रम |

प्राप्त झालेल्या ई-निविदांची पात्रता व तांत्रिक छाननी सामान्य सल्लागारामार्फत करण्यात आली. सामान्य सल्लागाराने निविदेचा तांत्रिक छाननीचा अहवाल मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखेसमोर सादर केला. या अहवालानुसार निविदाकारांचा पात्र/अपात्रतेचा तपशिल खालील प्रमाणे आहे:-

| अ.क्र | निविदा कारांचे नाव | पात्र/ अपात्र |
|---|---|---|
| १ | मे. आयेसा इंजिनेरिया वायआर्किटेक्टच्युरा, एस. ए. यू. | पात्र |
| २ | मे. बालाजी रेलरोड सिस्टिम्स प्राईव्हेट लिमिटेड आणि एफपी इंडिया प्रोजेक्ट मॅनेजमेंण्ट यांचे संयुक्तउ पक्रम | पात्र |
| ३ | मे. एजिस रेल एसए आणि एजिस इंडिया कन्सलटिंग इंजिनिअर्स प्राइव्हेट लिमिटेड यांचे संयुक्त उपक्रम | अपात्र |
| ४ | मे. एल के टी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्राइव्हेट लिमिटेड यांचे संयुक्त उपक्रम | पात्र |
| ५ | मे. एम एम एस पीए आणि एसएमइसी (इंडिया) प्राइव्हेट लिमिटेड यांचे संयुक्त उपक्रम | अपात्र |
| ६ | मे. राइट्स लिमिटेड आणि सीइजी लिमिटेड यांचे संयुक्त उपक्रम | पात्र |
| | **एकूण** | **०४/०६** |

१०.६ अति. महानगर आयुक्त (२) यांच्या अध्यक्षतेखाली निविदा शिफारस समिती समोर दिनांक २४ मे, २०२३ रोजी वरील तपशील सादर करण्यात आला. सदर निविदा शिफारस समितीमध्ये, अतिरिक्त महानगर आयुक्त यांचा अध्यक्ष म्हणून तसेच, १) संचालक (प्रकल्प) -मेट्रो (सदस्य) २) वित्त सल्लागार (वित्त आणि लेखा विभाग) (सदस्य), ३) अभियांत्रिकी प्रमुख (अभियांत्रिकी विभाग) (सदस्य), ४) संयुक्त प्रकल्प संचालक (Legal) (सदस्य), ५) मुख्य अभियंता (नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र, बृहन्मुंबई महानगरपालिका) (सदस्य) ह्यांचा समावेश आहे.निविदा शिफारस समितीने मान्य केल्यानुसार, सदर पात्र निविदाकारांचा आर्थिक प्रस्ताव (लिफाफा –क) उघडण्यासाठी सक्षम प्राधिकरणातर्फे मान्यता देण्यात आली.

त्यानुसार, चारही पात्र निविदाकारांचे लिफाफा 'क' (आर्थिक प्रस्ताव) दिनांक ०५ जून, २०२३, रोजी निविदाकारांच्या प्रतिनिधी तसेच लेखा अधिकारी यांच्या समक्ष उघडण्यात आले.

..४९/-

प्राप्त वित्तीय प्रस्ताव (जीएसटी वगळता) खालील प्रमाणे होते :

| अ.क्र. | निविदा काराचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत | निविदाकाराने दिलेली किंमत (रू. कोटी) | श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | मे. आयेसा इंजिनेरियावाय आर्किटेक्टच्युरा, एस. ए. यू. | ११.२८ कोटी | ₹ ८,६२,०००,०० /- | L२ |
| २ | मे. बालाजी रेलरोड सिस्टिम्स प्राईव्हेट लिमिटेड आणि एफपी इंडिया प्रोजेक्ट मॅनेजमेंण्ट यांचे संयुक्त उपक्रम | | ₹ १०,१४,०००,०० /- | L३ |
| ३ | मे. एल के टी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्राइव्हेट लिमिटेड यांचे संयुक्त उपक्रम | | ₹ ६,५१,०००,०० /- | L१ |
| ४ | मे. राइट्स लिमिटेड आणि सीइजी लिमिटेड यांचे संयुक्त उपक्रम | | ₹ १३,४२,०००,०० /- | L४ |

१०.७ मे. एल के टी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन लिमिटेड (संयुक्त उपक्रम) यांच्या ₹६,५१,०००,०० /- + GST (अंदाज पत्रकातील किमतीपेक्षा ४२.३१% कमी) किंमतीचा देकार लघुत्तम आहे. सदर देकार अंदाजपत्रकीय किंमती पेक्षा ४२.३१% कमी असल्याने यासंदर्भात प्राधिकरणाने मे. एलकेटी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्रा.लि., (संयुक्त उपक्रम) यांना Metro-PIU/ML१२/DDC/२०२३/१५३ दिनांक ०५ जून, २०२३ पत्रान्वये निविदेमधील कामाची व्याप्ती समजली आहे व त्यानुसार त्यांनी आर्थिक प्रस्ताव सादर केला आहे, याबाबत स्पष्टीकरण मागितले. त्यास अनुसरून मे. एलकेटी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्रा. लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्रा.लि., (संयुक्त उपक्रम) यांनी त्यांचे पत्र क्र. LKT/२०२३-२४/१३० दिनांक ०६ जून, २०२३ च्या पत्रान्वये सदर कामाची व्याप्ती समजली असून त्याप्रमाणेच प्रस्ताव सादर केल्याचे कळविले आहे.

१०.८ सदर आर्थिक प्रस्ताव निविदा शिफारस समितीसमोर मान्यतेसाठी दिनांक २७ जून, २०२३ रोजी सादर करण्यातआला. निविदा शिफारस समितीने मेट्रो मार्ग १२ चे काम पूर्ण होईपर्यंत संपूर्ण मनुष्यबळ तैनातीच्या खर्चासह तपशील सादर करण्याचे निर्देश दिले. त्यास अनुसरून मे. एलकेटी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्राइव्हेट लिमिटेड (संयुक्त उपक्रम) यांनी त्यांचेपत्र क्र. LKT/२०२३-२४/१६६ दिनांक २८ जुन, २०२३ व LKT/२०२३-२४/१९० दिनांक १० जुलै, २०२३ अनव्ये त्यांच्या देकार बाबत तपशील सादर केला. त्यानुसार, सामान्य सल्लागाराने

(मे. डी बी इंजिनीअरींग अँड कन्सलटिंग जीएमबीएच यांचे संयुक्त उपक्रम निविदाकाराने सादर केलेल्या दोन्ही पत्रांची छाननी करून दिनांक १८ जुलै,२०२३ च्या पत्रान्वये अहवाल सादरकेलाआणि थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे आहे:

अ. मे. एलकेटी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्राइव्हेट लिमिटेड (संयुक्तउपक्रम) ला मेट्रो स्थानके, व्हायाडक्ट्स, डेपो इत्यादींच्या तपशीलवार डिझाईन कन्सल्टन्सी सेवांमध्ये काम करण्याचा अनुभव आहे आणि सध्या इतर संस्थांसाठी देखील तत्सम प्रकारचे प्रकल्प राबविण्याचा अनुभव आहे.

ब. मे. एलकेटी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्राइव्हेट लिमिटेड (संयुक्तउपक्रम) यांच्याकडे प्रिंटर, प्लॉटर स्कॅनर, डेस्कटॉप, लॅपटॉप सारखी सर्व आवश्यक संसाधने आधीपासूनच उपलब्ध असल्याने ती मेट्रो मार्ग १२ च्या कामाकरीता वापरण्यात येतील.

क. मे. एलकेटी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्राइव्हेट लिमिटेड (संयुक्तउपक्रम) यांचा एक प्रकल्प आधीच मुंबईमध्ये सुरू असल्यामुळे आणि बहुतेक ह्या प्रकल्पाकरीता प्रस्तावित मनुष्यबळ देखील या चालू प्रकल्पासाठी काम करत असल्यामुळे, त्यांचा वाहतूकआणि निवासाचा खर्च देखील कमी होईल.

ड. तसेच, सविस्तर संकल्प चित्र सल्लागाराच्या कामासाठी बहुतेक स्पर्धात्मक निविदाकार हे MNC आहेत आणि सामान्यत: त्यांचे नफा मार्जिन/ओव्हरहेड सुमारे ३०-३२% आहे, तर मे. एलकेटी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्राइव्हेट लिमिटेड (संयुक्त उपक्रम) ही भारतीय कंपनी असल्याने, फक्त भारतीय चलनात व्यवहार करतात. त्यामुळे त्यांचे नफा मार्जिन/ओव्हरहेड्स देकार दराच्या सुमारे १०-१२%आहे. म्हणून त्यांनी देकार केलेला दर MNC च्या देकार दराच्या तुलनेत कमी आहे आणि सविस्तर संकल्पचित्र सल्लागाराचे काम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी त्यांची देकार रक्कम त्यांच्यासाठी पुरेशी आहे.

१०.९ सदर अहवाल निविदा शिफारस समिती पुढे मान्यतेसाठी दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी सादर करण्यातआला. निविदा शिफारस समितीने आर्थिक मूल्यमापन अहवालाचे पुनरावलोकन केले ज्यामध्ये असे स्पष्ट केले होते की, निविदाकाराने मनुष्यबळाची किंमत इतर प्रकल्पांसह सामायिक केली आहे, त्यामुळे निविदारक्कम कमी आहे. वरील बाबींचा विचार करून मे. एलकेटी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्राइव्हेट लिमिटेड (संयुक्त उपक्रम) यांनी

त्यांच्या लघुत्तम देकाराबाबत सादर केलेले समर्थनार्थ विवेचन व सामान्य सल्लागार यांनी सदर देकाराचे शिफारशीबाबतचा अहवाल मान्य करून निविदा शिफारस समितीने मे. एलकेटी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्राइव्हेट लिमिटेड (संयुक्त उपक्रम) यांच्या रु. ६,५१,०००,०० /- रक्कमेचा लघुत्तम देकार मान्य करुन यांची नेमणुक करणे प्रस्तावित आहे.

१०.१० त्यानंतर अशी ही चर्चा करण्यात आली की, मे.एलकेटी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्राइव्हेट लिमिटेड (संयुक्त उपक्रम), यांचा प्रस्ताव निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा तसेच संयुक्त व वित्तीय निकषानुसार निवड झालेला प्रस्ताव सुसंवादी व वाजवी असल्यामुळे मे.एलकेटी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्राइव्हेट लिमिटेड (संयुक्त उपक्रम) यांची नेमणुक करणे प्रस्तावित आहे.

१०.११ कार्यकारी समितीच्या सदस्यांनी अशी विचारणा केली की, मे.एलकेटी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्राइव्हेट लिमिटेड (संयुक्त उपक्रम) यांचा रु. ६,५१,०००,००/- रक्कमेचा लघुत्तम देकार असल्यामुळे त्याच्या कामगिरीवर परिणाम होऊ शकतो, व यासंदर्भात प्राधिकरणाने मे. एलकेटी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्राइव्हेट लिमिटेड (संयुक्त उपक्रम) यांच्याकडून सविस्तर स्पष्टीकरण मागवावे असे प्रस्तावित केले. या अनुषंगाने अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी नमूद केले की, मे.एल के टी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्राइव्हेट लिमिटेड (संयुक्तउपक्रम) यांनी मेट्रो मार्ग-१२ चे काम पूर्ण होईपर्यंत संपूर्ण मनुष्यबळ तैनातीच्या खर्चासह तपशील सादर केला आहे व सदर निविदाकाराचा एक प्रकल्प आधीच मुंबई मेट्रोमध्ये सुरू असल्यामुळे आणि बहुतेक ह्या प्रकल्पाकरीता प्रस्तावित मनुष्यबळ देखील या चालू प्रकल्पासाठी काम करत असल्यामुळे,त्यांची देकार रक्कम कमी आहे.

१०.१२ सदर कामासाठी ४ पात्र निविदाकारांपैकी ३ निविदाकारांनी अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा कमी रकमेचा देकार सादर केल्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अंदाजपत्राचे पुनरावलोकन करावे व भविष्यातील निविदांसाठी दुरुस्ती करावी असे कार्यकारी समितीने सुचविले. सदर बाबतची मा. महानगर आयुक्त यांनी भविष्यातील निविदांसाठी नोंद घेतली.

..५२/-

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४६३:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे मे. एल के टी इंजिनिअरींग कन्सलन्टंट लिमिटेड आणि एनिया डिझाईन प्राइव्हेट लिमिटेड यांचे संयुक्त उपक्रम यांचा रु.६,५१,०००,००/- सर्व करांसहित (जीएसटी वगळून) किंमतीचा लघुत्तम देकार स्विकारण्यास व सविस्तर संकल्पचित्र सल्लागार (DDC) म्हणून नियुक्ती करण्यास तसेच या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलांसह अधिदान करण्यात मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यकती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११: कल्याण बाह्यवळण रस्ता भाग-३ (साखळी क्र.७/००० ते साखळी क्र.१२/८६० कि.मी.) मोठागांव पूल ते गोविंदवाडी रोड या रस्त्याचे संकल्पन व बांधकाम तसेच भाग-४ च्या उर्वरित लांबीचे बांधकाम करणेच्या प्रथम लघुत्तम निविदेस मान्यता मिळणेबाबत.**

११.१ महानगर आयुक्तांनी प्रकल्पाची प्रस्तावना करताना असे नमूद केले की, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या (कडोंमपा) मंजूर विकास आराखड्यानुसार कल्याण बाह्यवळण रस्त्याची संपूर्ण लांबी सुमारे ३०.५० कि.मी. व रूंदी ३० मी. ते ४५ मी. असून सदर रस्ता हा बदलापूर-कटाई रस्त्यावरील हेदुटणे गावापासून पुढे कल्याण शिळ रस्त्यास माणगांव येथे, मध्य लोहमार्गास कोपर रेल्वे स्थानकाजवळ, वसई-दिवा लोहमार्गास गांवदेवी गावाजवळ छेदून ठाकुर्ली, दुर्गाडी पुलापासून पुढे टिटवाळापर्यंत उल्हास/काळू नदीस समांतर आहे. महानगर आयुक्तांनी असे नमूद केले की कल्याण डोंबिवली महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामध्ये दि. ०२/०८/२०१६ रोजी करण्यात आलेल्या सामंजस्य करारानुसार (Memorandum of Understanding) सदर रस्त्याच्या बांधकामासाठी अतिक्रमण विरहित जमीन (unencumbered land) उपलब्ध करून देण्याची जबाबदारी कडोंमपाची आहे.

कडोंमपामार्फत कळविण्यात आलेल्या जमीन उपलब्धतेनुसार सदर रस्त्याचे बांधकाम ७ भागांमध्ये हाती घेण्याचे नियोजन असून त्याची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे असल्याचे त्यांनी सांगितले;

१.१. **भाग-१ व २** (लांबी ७ कि.मी.) - या भागाच्या आराखड्यामध्ये अतिक्रमणे जास्त प्रमाणात असल्याचे महानगर आयुक्तांनी समितीस सांगितले. सदर परिसरामध्ये अनेक प्रकल्प जसे की, बुलेट ट्रेन, डेडिकेटेड फ्रेट लाईन (DFCC), कल्याण ग्रोथ सेंटर, मल्टी मॉडेल कॉरिडॉर (MMC) व प्राधिकरणाच्या नियोजनामधील राखीव जागा (२७ गावे) इत्यादी विकासामुळे जमीनीचे मोठे क्षेत्र अगोदरच बाधित होत असल्यामुळे जमीन मालक जमीन देण्यास विरोध करीत असल्याने संयुक्त मोजणी अद्याप पर्यंत होऊ शकली नसल्याचे त्यांनी नमूद केले. रस्त्याच्या बांधकामासाठी आवश्यक जमीन कडोंमपामार्फत उपलब्ध झाल्यानंतर सदरचे काम हाती घेण्याबाबतचे नियोजन आहे. सदरबाबत विद्यमान व भविष्यात होणा-या विकास लक्षात घेता, दि. ०६/०७/२०२३ रोजी प्राधिकरण, कडोंमपा व स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे समवेत झालेल्या संयुक्त बैठकीत ठरल्याप्रमाणे प्राधिकरण व कडोंमपाकडून भाग- १ व २ चे संरेखन (alignment) निश्चित करून पुढील कार्यवाही हाती घेण्याचे प्रस्तावित असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

१.१.१ **भाग-३** (लांबी ५.८६ कि.मी.)- दि.२१/०९/२०२२ व दि. १३/०४/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे कडोंमपाने कळविल्याप्रमाणे कल्याण बाह्यवळण रस्ता भाग क्र.३ मोठागांव पूल ते गोविंदवाडी बाह्यवळण रस्त्यासाठी आवश्यक असलेली ८७% जमीन उपलब्ध असून निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उर्वरित जमीन देण्याचे आश्वासित करण्यात आले असल्याचे महानगर आयुक्तांनी नमूद केले. सदर आश्वासनास अनुसरुन भाग-३ साठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली असून कल्याण बाह्यवळण रस्ता भाग-३ च्या बांधकामाच्या निविदा मागविण्यात आल्या असल्याचे त्यांनी पुढे नमूद केले. कल्याण बाह्यवळण रस्ता भाग-३ पूर्ण झाल्यानंतर प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर असलेल्या मोठागांव-माणकोली पूल व जोडरस्ते या प्रकल्पास आवश्यक असलेली रस्ते संलग्नता (Road Connectivity) उपलब्ध होईल आणि प्राधिकरणामार्फत यापूर्वी बांधकाम करून कडोंमपाला हस्तांतरीत करण्यात आलेल्या कल्याण बाह्यवळण रस्ता भाग-४ ते ७ ची उपयोगिता देखील वाढेल, असे महानगर आयुक्तांनी कार्यकारी समितीच्या निर्देशनास आणले.

**१.१.२. भाग-४ ते ७** (लांबी १६.४० कि.मी.)- कडोंमपामार्फत प्रथमत: उपलब्ध झालेल्या जमिनीवर भाग-४ ते ७ अंतर्गत (दुर्गाडी पूल ते टिटवाळा) १६.४० कि.मी. लांबीमध्ये रस्त्याचे बांधकाम प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले होते. सद्य:स्थितीत जमिनीच्या उपलब्धतेनुसार ८०% लांबीत काम पूर्ण झाले असून देखभाल व दुरुस्तीसाठी भाग-४ ते ७ दि.०८/०४/२०२२ रोजी कडोंमपाकडे हस्तांतरीत करण्यात आल्याचे महानगर आयुक्तांनी नमूद केले.

**१.१.३.** अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी कार्यकारी समितीस सांगितले की, प्राधिकरणाच्या दि. १६/११/२०२१ रोजी झालेल्या १५१ व्या बैठकीतील ठराव क्र. १५७३ अन्वये कल्याण बाह्यवळण रस्ता भाग-३ च्या कामासाठी रु. ६६१.३८ कोटी इतक्या अंदाजित किंमतीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर किंमतीत रस्त्याचे संकल्पचित्र, बांधकाम, वस्तू व सेवा कर, सेवावाहिन्या स्थलांतरणाचा खर्च, आकस्मित खर्च, भाववाढ, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क, MRIDCL मार्फत वसई-दिवा रेल्वे मार्गाखाली बांधण्यात येणारा भुयारी मार्ग (RUP) इत्यादींचा समावेश असल्याचे अतिरिक्त महानगर आयुक्त-२ यांनी सांगितले. प्रस्तावित निविदेत एकूण ६.६ किमी लांबीचा रस्त्याचा व भाग-४ च्या उर्वरित रस्त्याच्या लांबीचा समावेश असून तांत्रिक मान्यतेनुसार प्रकल्पाच्या भाग-३ ची अंदाजित किंमत रु. ५३१.६८ कोटी (वस्तू व सेवा कर वगळून) असून सदर किंमतीत रु. ४४.१६ कोटी इतक्या तात्पुरत्या तरतुदीचाही (Provisional Sum) समावेश असल्याचे अतिरिक्त महानगर आयुक्त-२ यांनी नमूद केले.

**१.१.४** अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांनी भाग-४ च्या लांबीतील रस्ता अपूर्ण असल्याचे कारण विचारले. यावर अतिरिक्त महानगर आयुक्त-२ यांनी स्पष्ट केले की सदरच्या लांबीत अतिक्रमण, अडथळे (जसे की मंदिर, मुख्य जलवाहिनी, कचऱ्याचा ढीग इ.), सेवा वाहिनी, भुसंपादन इ. बाबींमुळे रस्त्याचे बांधकाम पूर्ण होऊ शकले नाही. परंतु, दि. ०६/०७/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत कडोंमपाने सदर अडथळे व प्रलंबित भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्याचे आश्वासित केलेले आहे. त्याप्रमाणे प्रस्तावित भाग- ३ च्या निविदेअंतर्गत सदरच्या ७५०मी. इतक्या लांबीचे बांधकाम पूर्ण करण्यात येईल अतिरिक्त महानगर आयुक्त-२ यांनी अवगत केले.

**१.१.५** अतिरिक्त महानगर आयुक्त-२ यांनी कार्यकारी समितीच्या असे निदर्शनास आणले की, महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या (MCZMA) दि.३१/०८/२०१३ रोजी झालेल्या ४८ व्या बैठकीत शिफारस केल्याप्रमाणे राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाने (SEIAA) दि. २८/०७/२०१५ रोजी झालेल्या ८६ व्या बैठकीत संपूर्ण कल्याण बाह्यवळण रस्त्यास सीआरझेड विषयक मान्यता दिली. सदर मान्यता ही तीन भागांत देण्यात आली. त्यानुसार दुर्गाडी पुलापासून टिटवाळा पर्यंतचे काम टप्पा-१ अंतर्गत म्हणजेच ३० कि.मी. पैकी १६ कि.मी. लांबीचे ४ भागात काम हाती घेण्याचे ठरविण्यात आले. मोठागांव माणकोली पुलाचे काम पुर्णत्वास येत असल्याने कल्याण आणि डोंबिवलीला जोडणाऱ्या रस्त्याचे बांधकाम पूर्ण करणे आवश्यक आहे, जेणेकरुन ठाणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक सदर रस्त्याद्वारे डोंबिवली-कल्याणमध्ये ये-जा करण्यास सुकर होऊन कोनगावमार्गे होणारी वाहतूक कोंडी सुटेल. यामुळे भाग-३ च्या निविदा मागविण्याचा निर्णय घेण्यात आला. CRZ च्या मंजुरीनुसार सदर मंजुरी CRZ अधिसूचना, २०११ अन्वये पाच वर्षापर्यंत वैध असल्याने, सीआरझेड मान्यतेच्या नूतनीकरणासाठी प्राधिकरणाने दि. ११/११/२०२२ व दि. ०२/०५/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाला (MCZMA) विनंती केली. केंद्राच्या पर्यावरण, वन व हवामान बदल (MoEF & CC) विभागाने दि.०३/०७/२०२३ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार CRZ अधिसूचना, २०११ अंतर्गत मान्यता दिलेल्या प्रकल्पास १० वर्षापर्यंत वैधता असल्याने सदर प्रकल्पास दि. २६/०७/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यास हरकत नाही असे महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या (MCZMA) दि. १०/०८/२०२३ रोजी झालेल्या १६८व्या बैठकित प्रस्तावित करण्यात आले. सदर बैठकीत महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाने सदर प्रस्ताव मान्य केलेला आहे. तथापि, सदर बैठकीचे इतिवृत्त किंवा औपचारिक मान्यता प्राप्त होणे प्रलंबित असल्याचे अतिरिक्त महानगर आयुक्त-२ यांनी सांगितले. सीआरझेडच्या मान्यतेनंतरच ठेकेदारास कार्यारंभ आदेश देण्याचे प्रस्तावित असल्याचे अतिरिक्त महानगर आयुक्त-२ यांनी कार्यकारी समितीस विशद केले.

**१.२.** निविदा प्रक्रिया : अतिरिक्त महानगर आयुक्त-२ यांनी पुढे असे सादर केले की, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने दिलेल्या आश्वासनास अनुसरून प्राधिकरणाने दि.२४/१२/२०२२ रोजी टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) व लोकसत्ता (मराठी) या वर्तमानपत्रामध्ये व महाटेंडर संकेतस्थळावर ई-निविदा सुचना प्रसिद्धीस देऊन संकल्पन व बांधणे (Design-Build/EPC) या तत्वावर निविदा मागविण्यात आल्या. निविदा सूचनेला अनुसरुन ४ निविदाकारांनी निविदा सादर केल्या.

**१.२.१** अतिरिक्त महानगर आयुक्त-२ यांनी पुढे असे सांगितले की, निविदाकारांनी सादर केलेल्या तांत्रिक प्रस्तावांच्या छाननीनंतर असे आढळून आले की, निविदाकार मे. गवार-एनएसीपीएल (संयुक्त उपक्रम), मे. एमईआयएल-ईआयआयएल (कंसोर्टियम) आणि मे. ऋत्विक-आरपीएस (संयुक्त उपक्रम) हे निविदाकार निविदेतील पात्रता अटी व शर्तींची पूर्तता करत असून तांत्रिकदृष्टया पात्र ठरले आहेत. तथापि, मे. अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. हा निविदाकार स्टील्ट रस्त्यासाठी आवश्यक असलेली मुख्य पात्रता अट पूर्ण करीत नसल्याचे दिसून आले. सदर कामासाठी संयुक्त उपक्रम (Joint Venture) स्विकृत होते. निविदेतील पात्रता अटींनुसार (केंद्रीय दक्षता विभागाच्या (CVC) मार्गदर्शक तत्वांस अनुसरून) निविदाकारास मागील १० वर्षात प्रस्तावित स्टील रस्त्याच्या किंमतीच्या कमीत कमी ८०% इतक्या किंमतीचा उड्डाणपूल/पूल बांधण्याचा अनुभव असणे अनिवार्य होते. तसेच रस्त्यासाठी तत्सम कामाचा अनुभव असणेसुद्धा अनिवार्य होते. निविदा शिफारस समितीच्या (Tender Recommendation Committee) दि. १७/०५/२०२३ रोजी झालेल्या पहिल्या बैठकीत निविदाकारांनी सादर केलेले दस्ताऐवज, स्पष्टीकरण व त्या आधारे प्रकल्प सल्लागाराने तयार केलेल्या तपशीलवार तांत्रिक मुल्यमापन अहवालाचे सादरीकरण करण्यात आले. निविदाकारांकडून प्राप्त झालेले स्पष्टीकरण आणि तांत्रिक मुल्यमापन अहवाल यांच्या आधारे निविदा समितीने दि. १७/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत प्राप्त झालेल्या ४ पैकी ३ निविदा तांत्रिकदृष्टया पात्र असल्याने सदर ३ पात्र निविदाकारांचे आर्थिक देकार उघडण्याची शिफारस केली. आर्थिक देकाराचा तपशील खालीलप्रमाणे आहे असे अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी कार्यकारी समितीच्या निदर्शनास आणले.

| अ.क्र | निविदाकाराचे नाव | निविदा रक्कम (रू.) | प्रस्तावित रक्कम (रू.) | तात्पुरती रक्कम (रू.) | निविदा बोली (रू.) | टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मे. ऋत्विक-आरपीएस (संयुक्त उपक्रम) | ५३१,६८,००,०००/- | ५६७,२९,५४,०८० | ४४,१६,००,००० | ६११,४५,५४,०८० | (+)१५% | L१ |
| २. | मे. गवार-एनएसीपीएल (संयुक्त उपक्रम). | | ५८३,२४,६०,००० | ४४,१६,००,००० | ६२७,४०,६०,००० | (+)१८% | L२ |
| ३. | मे. एमईआयएल-ईआयआयएल (कंसोर्टियम). | | ६३३,५५,००,००० | ४४,१६,००,००० | ६७७,७१,००,००० | (+)२७.४७% | L३ |

**१.२.२.** अतिरिक्त महानगर आयुक्त-२ यांनी पुढे असेही सांगितले की, निविदा शिफारस समितीने दि. १७/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत शिफारस केल्याप्रमाणे ३ पात्र निविदाकारांचे आर्थिक ई-देकार (लिफाफा-२) दिनांक १९/०५/२०२३ रोजी उघडण्यातआले. मे. ऋत्विक-आरपीएस (संयुक्त उपक्रम) या निविदाकाराने सादर केलेला रु. ६११,४५,५४,०८०/- (रुपये सहाशे अकरा कोटी पंचेचाळीस लाख चौपन्न हजार ऐंशी मात्र) (वस्तु व सेवा कर वगळून) इतक्या किंमतीचा देकार लघुत्तम असून निविदा किंमतीपेक्षा १५% अधिक्याचा आढळला. मे. ऋत्विक-आरपीएस (संयुक्त उपक्रम) यांनी सादर केलेला देकार हा निविदा किंमतीपेक्षा अधिक्याचा असल्याने त्याचा समर्थन करणारा खुलासा कारणमिमांसेसह सादर करणेबाबत प्राधिकरणाने दि. १९/०५/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे निविदाकारास कळविले. त्यास अनुसरुन मे. ऋत्विक-आरपीएस (संयुक्त उपक्रम) यांनी दि. २२/०६/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे कारणमिमांसेसह सविस्तर खुलासा सादर करुन तसेच सादर केलेला देकार वाटाघाटीनंतर कमी करुन रु.५९८,१२,५६,८००/- (निविदा किंमतीपेक्षा १२.५% अधिक) हा सुधारीत देकार प्राधिकरणास सादर केला. खुलाशातील समर्थनाची कारणे आणि वाटाघाटीनंतर कमी करण्यात आलेला देकार प्रकल्प सल्लागार मे. टेक्नोजेम कन्सलटंट प्रा. लि. यांना पडताळणीसाठी दि. २३/०६/२०२३ रोजी पाठविण्यात आला. त्याबाबतचा सविस्तर अहवाल प्रकल्प सल्लागारागाराने त्यांचे दि. २६/०६/२०२३ रोजी प्राधिकरणास सादर केला. निविदाकाराचा वाटाघाटीअंती सादर केलेला रु. ५९८,१२,५६,८००/- इतक्या किंमतीचा (निविदा किंमतीपेक्षा १२.५% अधिक) सुधारीत देकार रास्त असल्याचे सल्लागाराने प्राधिकरणास शिफारशीसह कळविले. यानुसार मे. ऋत्विक-आरपीएस (संयुक्त उपक्रम) यांचा खुलासा व प्रकल्प सल्लागार यांचा अहवाल निविदा शिफारस समितीच्या दि. २६/०६/२०२३ रोजी झालेल्या

दुसऱ्या बैठकीत सादर करण्यात आला. निविदा रक्कमेपेक्षा अधिक देकाराची बोली सादर करण्याची प्रमुख कारणे कार्यकारी समितीसमोर अवलोकनार्थ ठेवण्यात आली असता कार्यकारी समितीने निविदाकाराने सादर केलेली कारणांची नोंद घेतली.

निविदाकाराने दिलेला खुलासा व प्रकल्प सल्लागाराने तपासणी करुन सादर केलेल्या शिफारशीअंती निविदा शिफारस समितीने वाटाघाटीअंती कमी केलेला रु. ५९८,१२,५६,८००/- (निविदा किंमतीपेक्षा १२.५% अधिक) (वस्तु व सेवा कर वगळून) किंमतीचा देकार मंजूर करण्यास निविदा शिफारस समितीने शिफारस केली, असे अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी कार्यकारी समितीस अवगत केले.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४६४:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत कल्याण बाह्यवळण रस्ता भाग- ३ (साखळी क्र. ७/००० ते १२/८६० कि.मी.) मोठागांव पूल ते गोंविदवाडी बाह्यवळण रोड या रस्त्याचे संकल्पन व बांधकाम तसेच भाग- ४ च्या उर्वरित लांबीचे बांधकाम करणे या कामासाठी मे.ऋत्विक-आरपीएस (संयुक्त उपक्रम) यांनी सादर केलेला रु. ५९८,१२,५६,८००/- (रुपये पाचशे अठ्ठयाण्णव कोटी बारा लाख छप्पन हजार आठशे मात्र) (वस्तू व सेवा कर वगळून) इतक्या किंमातीच्या लघुत्तम निविदेस कार्यकारी समिती याद्वारे मंजुरी देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की**, या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास कार्यकारी समिती याद्वारे मंजुरी देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की**, सदर प्रकल्पासाठी लागणाऱ्या सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी कार्यकारी समिती याद्वारे प्राधिकरणास शिफारस करीत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमजबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

..५९/-

**<u>बाब क्र.१२:</u>** **<u>सांताक्रुझ-चेंबुर जोडरस्त्यांतर्गत कुर्ला ते वाकोला या उन्नत मार्गाच्या (भाग-१) कामामध्ये करावयाच्या सुधारीत किंमतीस व मुदत वाढीस मान्यता देणेबाबत.</u>**

१२.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, प्राधिकरणाच्या दि. २६/०८/२०१५ रोजीच्या १४९ व्या बैठकीमध्ये वांद्रे-कुर्ला संकुलाचा भविष्यात होणारा विस्तार पहाता खालील दोन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**<u>भाग-१</u>** सांताक्रुझ चेंबुर जोड रस्त्यामध्ये वाकोला जंक्शन, आंबेडकर चौक, युनिव्हर्सिटी जंक्शन व बीकेसी जंक्शन मिळून कुर्ला ते वाकोला पुलाला जोडणारा उन्नत मार्ग बांधणे:- किंमत ₹ ४८०.६३ कोटी **<u>भाग-२</u>** भारत डायमंड कंपनी, वांद्रे-कुर्ला संकुल ते वाकोला जंक्शन उन्नत मार्ग बांधणे :- किंमत ₹ २६३.०९ कोटी.

१२.२ कार्यकारी समितीने भाग-१ च्या लघुत्तम निविदेस दि.२१/०७/२०१५ रोजी २४५व्या बैठकीत मान्यता दिलेली असून सदर कामाचा कार्यादेश मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांना दि.२७/१०/२०१६ रोजी देण्यात आला. सदर कंत्राटाची मुळ किंमत ₹.४४९.१९ कोटी इतकी आहे व मुळ काम पूर्ण करण्याचा कालावधी ३६ महिने (पावसाळ्यासहीत) इतका होता. सद्य:स्थितीत भाग-१ चे काम ९२% पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

१२.३ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी पुढे सांगितले की, कार्यकारी समितीच्या २६६ व्या बैठकीत पश्चिम द्रुतगती महामार्गावरील वाकोला उड्डाणपुल ओलांडण्याकरीता व्दितीय स्तरावर (Second level) Extra Dose Span या संकल्पनेआधारीत ₹२७.८८ कोटी इतक्या वाढीव ढोबळ किंमतीचा अतिरिक्त किंमत प्रस्तावास व एकूण सुधारीत किंमत ₹६४५.९५ कोटी रक्कमेस मान्यता देण्यात आली होती. प्रकल्पातील कठीणता व महत्वाच्या चौकातील प्रकल्प विचारात घेता संरचनेची फेरतपासणी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सल्लागार व प्रा. रवी सिन्हा यांची नियुक्ती करणेत आली. सदर संकल्पन अंतीम झाल्यानंतर कामाच्या अंदाजपत्रकाची किंमत ₹५१.४६ कोटी झाली आहे. ही वाढ पुर्वी मंजूर असलेल्या किंमतीपेक्षा ₹२३.५८ कोटी अधिक आहे. याशिवाय Extra dose Cable Stay bridge व Cable Stay Bridge या मधील कार्य करण्याची पद्धत पण अवगत केली.

१२.४ अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी केबल स्टे भागाच्या किंमतीत वाढ खालील तांत्रिक कारणामुळे झाली असे समितीस सांगितले :-

1. The pier PP87A was coming above Metro Line-3 tunnel. The ML3 restricted to keep the foundation 3 m away from exterior surface of

tunnel. It also restricted to limit the safe veering capacity to 5 T/m$^2$. Hence, the depth of piles increased from 25 m to 8.5 m.

2. The commissioner of Police (Traffic) asked change the location of portal PP87A & PP88 as they were coming in the carriageway of slip roads.
3. The geometry of bridge has complexity of 100$^0$ curve, radius 100 m and obligatory span of 105 m. During detail designing it was found that extra dose Cable Stay Bridge has to be changed to Cable Stay Bridge.
4. The open tub girder at sharp curvature is susceptible to local buckling during erection and it required to wider deck width for more rigidity. Hence, open tub girder was modified to orthotropic superstructure deck closed box girder with width widening from 8.5 to 10.5 m.
5. The new cable girder bridge required temporary supports like foundation, pier, pier cap during construction.
6. The height of Pylon was increased from 31 m to 48.6 m.

१२.५ चर्चेमध्ये मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी भविष्यात मुंबईमध्ये केबल स्टे ब्रिज घेताना पुढील काळात येणाऱ्या Metro Line, Elevated Bridges/Flyovers याचा विचार करून तांत्रिक आवश्यकता असल्यासच घेण्याच्या सुचना देण्यात आल्या.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र.१४६५:</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ-चेंबुर जोड रस्त्यामध्ये वाकोला जंक्शन, आंबेडकर चौक, युनिव्हर्सिटी जंक्शन व बीकेसी जंक्शन मिळून कुर्ला ते वाकोला पुलाला जोडणारा उन्नत मार्ग बांधणे कामामध्ये करावयाच्या सुधारित खर्चास व मुदत वाढीस कार्यकारी समिती मंजूरी देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** केबल स्टे स्पॅनच्या ₹२३.५८ कोटी इतक्या अतिरिक्त किंमतीस व एकूण ₹६६९.५३ कोटी रक्कमेस कार्यकारी समिती याव्दारे मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** केबल स्टे स्पॅनचे काम पूर्ण करण्यास ठेकेदारास निविदा शर्ती नुसार ३०/०४/२०२४ पर्यंत कार्यकारी समिती याव्दारे मुदतवाढ देण्यात येत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर कामाच्या सर्वेक्षणासाठी कार्यरत असलेल्या प्रकल्प सल्लागार मेसर्स पेडयाको को. लि. यांना वाढीव फी सह काम पूर्णत्वापर्यंत (३०/०६/२०२४ पर्यंत) कार्यकारी समिती याव्दारे मुद्तवाढ देण्यात येत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमजबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**<u>बाब क्र.१३:</u>** **<u>विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ४७ रस्त्यांचे सुधारीकरण आणि काँक्रीटीकरण करणे (भाग १ ते भाग ४).</u>**

१३.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सध्या अस्तित्वात असलेल्या डांबरी रस्त्याचे कॉक्रिटीकरण करून दर्जावाढ करण्याचे नियोजित असून याअंतर्गत एकूण ४७ रस्त्यांची कामे हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. सदर ४७ रस्त्यांची एकूण लांबी २१.८० कि.मी.असून विकास आराखडयानुसार रस्त्यांची रुंदी ६ मी.ते ४५ मी. दरम्यान आहे. सदर रस्ते हे राष्ट्रीय महामार्ग ८ व मुख्य रस्त्यांशी जोडलेले असून वाहतूकीच्या कोंडीची सुधारणा होऊन इंधनाची व प्रवासाच्या वेळेची बचत होईल.

१३.२ रस्त्याचे अंदाजपत्रक सन २०२२-२३ (DSR/SSR) मधील दर सूचीनुसार तयार करण्यात आले आहे. अंदाजित खर्चामध्ये सिमेंट काँक्रीट / UTWT रस्त्याच्या दोन्ही बाजूला पर्जन्य जलवाहीन्यांसह (Strom Water Drain) रस्त्याचे बांधकाम असेल. रस्त्याच्या दोन्ही बाजूस सेवा वाहिन्यांकरीता डांबरीकरणाची तरतुद व तसेच पादचारी पथ असेल.

सिमेंट काँक्रीट रस्त्याची थरांची जाडी (crust thickness) खालीलप्रमाणे असेल.

१. Soling -२३० मि.मी.
२. GSB – ३०० मि.मी.
३. DLC – १५० मि.मी.
४. PQC (काँक्रीट) – ३०० मि.मी.

१३.३ मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या बांधकामाच्या कामासाठी कंत्राटदार नेमण्यासाठी ई-निविदा मागविण्यात आली होती. ई-निविदा सूचना दि. २४/०३/२०२३

रोजी वृत्तपत्रांमध्ये आणि प्राधिकरणाच्या वेबसाइटवर दि. ३१/०३/२०२३ रोजी प्रकाशित करण्यात आली. दि. १०/०४/२०२३ रोजी बोली पूर्व बैठक नियोजित होती. ७ ते ८ निविदाकारांनी निविदापूर्व बैठकीला (Pre-bid Meeting) हजेरी लावली. बैठकीतील बदलाचा व सुचनांचा, विचलनाचा सामाईक संच (Commen Set of Deviation) प्राधिकरणाच्या ई-निविदा पोर्टलवर प्रकाशित करण्यात आला.

भाग -१ ते भाग- ४ याकरीता ई-निविदा मधील तारखांचा तपशील खालील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | भाग | निविदा डाउनलोड करणे | बोली सादर करण्याची तारीख | तांत्रिक बोली उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | **भाग -१** | ३१/०३/२०२३ | ०३/०५/२०२३ | ०९/०५/२०२३ |
| २ | **भाग -२** | | | |
| ३ | **भाग -३** | | | |
| ४ | **भाग-४** | | | |

भाग - १ ते भाग -४ करीता खालीलप्रमाणे ठेकेदारांकडुन निविदा प्राप्त झालेल्या आहेत:-

| **निविदाकारांचे तपशिल** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **भाग-१** | **भाग-२** | **भाग -३** | **भाग-४** |
| १ | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स प्रा.लि. | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स प्रा.लि. | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स प्रा.लि. | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स प्रा.लि. |
| २ | मे. लँडमार्क कॉर्पोरेशन प्रा.लि. | मे. लँडमार्क कॉर्पोरेशन प्रा.लि. | मे. लँडमार्क कॉर्पोरेशन प्रा.लि. | मे. लँडमार्क कॉर्पोरेशन प्रा.लि. |
| ३ | मे. एन.ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | मे. एन.ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | - | मे आर ई इन्फ्रा प्रा.लि. |
| ४ | मे आर ई इन्फ्रा प्रा.लि. | मे आर ई इन्फ्रा प्रा.लि. | - | - |
| ५ | - | मे गजानन कन्स्ट्रक्शन | - | - |

सल्लागारद्वारे तांत्रिक मूल्यमापन अहवाल निविदा शिफारस समितीच्या बैठकीत(Tender Recommendation Committee) सादर करण्यात आले.सदर निविदेत एका कंत्राटादारास एकच काम देणे ही अट आहे.यानुसार सदर आर्थिक देकार उघडण्यात येऊन ते निविदा शिफारस समितीस सादर करण्यात आले.

**१. भाग-१ लघुत्तम निविदाकार तपशील खालीलप्रमाणे :**

| **भाग-१** | **लघुत्तम निविदाकार** | **सादर आर्थिक देकार (प्रोव्हीजीनल सम +रॉयल्टी वजा करुन) (₹)** | **दर (टक्केवारी मध्ये)** |
|---|---|---|---|
| १. | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स प्रा.लि. | ९०,१२,६४,७६५.७६ | (+) २.३४% |
| २. | मे. लँडमार्क कॉर्पोरेशन प्रा.लि. | ८८,५०,६०,६६९.९१ | (+) ०.५०% |
| ३. | मे. एन.ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ८८,०१,२८,९८८.५७ | (-) ०.०६०% |
| ४. | मे आर ई इन्फ्रा प्रा.लि. | ९०,१७,९३,१०७.१९ | (+) २.४०% |

| **भाग-२** | **लघुत्तम निविदाकार** | **सादर आर्थिक देकार (प्रोव्हीजीनल सम +रॉयल्टी वजा करुन) (₹)** | **दर (टक्केवारीमध्ये)** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| १. | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स प्रा.लि. | ६५,२५,३९,०९६.८७ | (+) २.७०% | चतुर्थ लघुत्तम निविदाकार |
| २. | मे गजानन कन्स्ट्रक्शन | ६३,५३,२०,१९७.६२ | (-) ०.०१०% | प्रथम लघुत्तम निविदाकार |
| ३. | मे. लँडमार्क कॉर्पोरेशन प्रा.लि. | ६३,८५,६०,६५४.६८ | (+) ०.५०% | व्दितीय लघुत्तम निविदाकार |
| ४. | मे आर ई इन्फ्रा प्रा.लि. | ६५,०६,३२,९४५.६६ | (+) २.४०% | तृतिय लघुत्तम निविदाकार |

| **भाग-३** | **लघुत्तम निविदाकार** | **सादर आर्थिक देकार (प्रोव्हीजीनल सम +रॉयल्टी वजा करुन) (₹)** | **दर (टक्केवारीमध्ये)** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| १. | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स प्रा.लि. | ८५,९७,२६,८५२.९९ | (-) ०.४५% | प्रथम लघुत्तम निविदाकार |
| २. | मे. लँडमार्क कॉर्पोरेशन प्रा.लि. | ८६,७९,३१,१७७.५६ | (+) ०.५०% | व्दितीय लघुत्तम निविदाकार |

| **भाग-४** | **लघुत्तम निविदाकार** | **सादर आर्थिक देकार (प्रोव्हीजीनल सम +रॉयल्टी वजा करुन) (₹)** | **दर (टक्केवारीमध्ये)** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| २. | मे. लँडमार्क कॉर्पोरेशन प्रा.लि. | ७८,५५,५०,१७०.८० | (+) ०.५०% | व्दितीय लघुत्तम निविदाकार |
| ३. | मे आर ई इन्फ्रा प्रा.लि. | ७८,१५,६३,७९६.८० | (-) ०.०१०% | प्रथम लघुत्तम निविदाकार |

प्राधिकरणाच्या निविदा शिफारस समितीच्या बैठकीत निविदाकारांचे देकार सादर करण्यात आले. निविदा समितीने भाग- १, भाग-२, भाग-३ व भाग-४ या लघुत्तम निविदाकाराची देकार शिफारस करण्यात आली.

१३.४ महानगर आयुक्त यांनी असेही नमूद केले की, वरील सर्व बाबींचा विचार करुन विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाग-१, भाग-२ भाग-३ व भाग-४ या रस्त्याच्या कामाकरीता निविदा देकार, वस्तु व सेवा कराच्या किंवा इतर करांच्या दरामध्ये निविदा प्राप्त होण्याच्या दिनांकापासून आतापर्यंत झालेले बदल व कंत्राटीय कालावधीत आणखी बदल झाल्यास कंत्राटीय तरतुदीनुसार कंत्राटीय किंमतीमध्ये वेळोवेळी योग्य ते समायोजन करण्याच्या अधीन राहून, स्विकारण्यास खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे :-

| भाग (PKGNO.) | लघुत्तम निविदाकार | आर्थिक देकार + (प्रोव्हीजीनल सम +रॉयल्टी वजा करुन) (₹) | दर (टक्केवारीमध्ये) |
|---|---|---|---|
| १. | मे. एन.ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ८८,०१,२८,९८८.५७ + ४५,११,८५६.०० +२,६४,१९,७२१.०० | (-) ०.०६०% |
| २. | मे गजानन कन्स्ट्रक्शन | ६३,५३,२०,१९७.६२ +३६,२०,४४४.०० +१,९०,६१,५१२.०० | (-) ०.०१०% |
| ३. | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स प्रा.लि. | ८५,९७,२६,८५२.९९ + ४२,३६,६७८.०० +२,५९,०८,३९३.०० | (-) ०.४५% |
| ४. | मे आर ई इन्फ्रा प्रा.लि. | ७८,१५,६३,७९६.८० + २९,३७,३४६.०० +२,३४,४९,२५८.०० | (-) ०.०१०% |

**(वरील किंमती वस्तु व सेवाकर वगळून आहेत)**

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र.१४६६:</u>**

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गतमिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाग-१, भाग-२ भाग-३ व भाग-४ या रस्त्याच्या कामाकरीता

निविदा देकार, वस्तु व सेवा कराच्या किंवा इतर करांच्या दरामध्ये निविदा प्राप्त होण्याच्या दिनांकापासून आतापर्यंत झालेले बदल व कंत्राटीय कालावधीत आणखी बदल झाल्यास कंत्राटीय तरतुदीनुसार कंत्राटीय किंमतीमध्ये वेळोवेळी योग्य ते समायोजन करण्याच्या अधीन राहून, स्विकारण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे :-

| **भाग (PKG NO.)** | **लघुत्तम निविदाकार** | **आर्थिक देकार + (प्रोव्हीजीनल सम +रॉयल्टी) (₹)** | **दर (टक्केवारीमध्ये)** |
|---|---|---|---|
| १. | मे. एन.ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ८८,०१,२८,९८८.५७ + ४५,११,८५६.०० +२,६४,१९,७२१.०० | (-) ०.०६०% |
| २. | मे. गजानन कन्स्ट्रक्शन | ६३,५३,२०,१९७.६२ +३६,२०,४४४.०० +१,९०,६१,५१२.०० | (-) ०.०१०% |
| ३. | मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स प्रा.लि. | ८५,९७,२६,८५२.९९ + ४२,३६,६७८.०० +२,५९,०८,३९३.०० | (-) ०.४५% |
| ४. | मे. आर ई इन्फ्रा प्रा.लि. | ७८,१५,६३,७९६.८० + २९,३७,३४६.०० +२,३४,४९,२५८.०० | (-) ०.०१०% |

**(वरील किंमती वस्तु व सेवाकर वगळून आहेत)**

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**<u>बाब क्र.१४:</u>** **<u>तळोजा एमआयडीसी रस्ता ते अंबरनाथ – काटई नाका पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण आणि पर्जन्य वाहिन्यांचे बांधकाम करणे (भाग-२)</u>**

१४.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प राबविण्यात येत आहे. मुंबई नागरी पायाभूत प्रकल्पाचा विस्तार मुंबई महानगर प्रदेशातील इतर महानगरपालिका व नगरपरिषद क्षेत्रातही करण्यात यावा अशी त्या भागातील लोकप्रतिनीधींची मागणी होती. त्यानुसार मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाचा ठाणे, नवी मुंबई, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ-बदलापुर इत्यादी नगरपालिका/ महानगर पालिकांच्या क्षेत्रात विस्तार करण्यात आला. त्यानुसार विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत

विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्राधिकरणामार्फत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या तळोजा एम. आय. डी. सी. ते बदलापूर अंबरनाथ-काटई नाका रोड दरम्यानच्या रस्त्यांचे रुंदीकरण व मजबूतीकरण टप्पा १ अंतर्गत टप्पा-१ (LHS) मध्ये अस्तित्वातील १५.० मी. रुंदीच्या व ९.८८ किमी. लांबी पैकी उपलब्ध ८.६६ किमी. लांबी व १५ मी. रुंदीत काँक्रीट रस्त्याचे काम दि. ३१/०३/२०२१ रोजी पूर्ण करण्यात आले. सदर काम ५०% MIDC व ५०% निधी प्राधिकरणाच्या माध्यमातुन घेण्यात आले आहे. तसेच उर्वरीत १५ मी. रुंदित तळोजा MIDC रस्ता ते अंबरनाथ-काटई नाका रस्ता टप्पा II (RHS) च्या १०.२५ किमी तळोजा एमआयडीसी रोड ते अंबरनाथ - काटई रस्त्याच्या रोड पर्यंत रुंदीकरण आणि पर्जन्य वाहिन्यांचे बांधकाम भाग-२ करण्यासाठी दि. २०/१०/२०२२ रोजी झालेल्या १५३ व्या प्राधिकरणाच्या बैठकीत MIDC कॉंक्रिटीकरणाच्या कामास ₹ २६०.६० कोटी व भूसंपादनासाठी (₹ २९३.२८ कोटी) रक्कम असे एकूण ₹ ५५३.८९ कोटी सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सद्यस्थितीत अंदाजित २०% जागा उपलब्ध आहे.

१४.२ या अनुषंगाने सदर काम हाती घेण्यासाठी सल्लागार मे. टेक्नोजेम यांनी सदर रस्त्याचे अंदाजपत्रक १५ मीटर डी.पी. प्रमाणे ३ पदरी वाहनमार्गाचे काँक्रिट रस्त्याचे रुंदीकरण, पर्जन्य जलवाहिन्यांचे बांधकाम, अस्तित्वातील मो-यांचे रुंदीकरण, नवीन मो-यांचे बांधकाम व सेवावाहिन्याचे स्थलांतरीत करणे इत्यादी बाबी समाविष्ट केल्या आहेत.

१४.३ आराखडे व अंदाजपत्रक: सदर काम हाती घेण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सल्लागारामार्फत तयार केला असून या कामाचे आराखडे व ₹२६३.३५ कोटी वस्तु व सेवाकरासह रक्कमेचे सविस्तर अंदाजपत्रक प्राधिकरणास दिनांक १०/१०/२०२२ रोजी सादर करण्यात आले. अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे जिल्हा यांचे सन २०२२-२३ चे मंजूर दरसूचीवर आधारीत आहे. या कामास मुख्य अभियंता यांनी तांत्रिक मान्यता दिली आहे. प्रस्तावित कामासाठी MORTH ने निश्चित केलेले मानके (Specifications) निविदेमध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

१४.४ या कामाच्या निविदा प्रक्रियेबद्दल माहिती देताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, सदर कामाच्या ₹ २१२,७४,६६,२४८/- (वस्तु व सेवाकर वगळून) रॉयल्टी व चाचणी शुल्क समविष्ट करुन इतक्या अंदाजपत्रकीय रक्कमेस B-१ (टक्केवारी) स्वरुपात ई-निविदा सुचना मराठी व इंग्रजी वृत्तपत्राद्वारे दि. १६.०१.२०२३ रोजी तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या. प्रस्तावित रस्ता पूर्ण करण्याचा

कालावधी पावसाळयासह २४ महिने आहे. निविदा प्रक्रियेत ४ कंत्राटदार (१) मे. अजवानि इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., २) मे. आर के मदानी आणि कं., ३) मे. आरपीएस इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि., ४) मे. श्री. असोशिएटस यांनी भाग घेतला असुन त्यांची तांत्रिक कागदपत्रे संकेत स्थळावर प्रसारीत करण्यात आली. निविदेतील अटी शर्ती नुसार या कंत्राटदारांची कागदपत्रांची तांत्रिक पडताळणी करण्यात आली. त्यामध्ये कंत्राटदार मे. श्री असोशिएट्स यांनी सादर केलेल्या कागदपत्रात आढळलेल्या त्रृटी खालीलप्रमाणे :

- कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र, काम पूर्ण करण्याचा दिनांक व सदर प्रमाणपत्र देण्याचा दिनांक यामध्ये तफावत आढळली.
- काँक्रीट (RMC) प्लांट आणि सेन्सर पेव्हरचे MOU दिले आहेत. परंतु, खरेदी केल्याची पावती व इतर आवश्यक कागदपत्रे निविदेतील अटी शर्तीप्रमाणे सादर केले नाही.
- डांबराचे हॉट मिक्स प्लांटची कागदपत्रे कंत्राटदाराच्या निविदेतील अटी शर्ती प्रमाणे सादर केले नाही.

निविदेतील अटी शर्ती प्रमाणे कागदपत्रे नसल्याने निविदा शिफारस समितीने सर्वानुमते कंत्राटदार मे. श्री असोशिएट्स यांना अपात्र घोषित केले आहे व उर्वरीत ३ पात्र कंत्राटदाराचे आर्थिक लिफाफा (C) उघडण्यास मान्यता दिली. पात्र कंत्राटदारांची आर्थिक बोली तपशिल सोबत खालीलप्रमाणे सादर करण्यात आला आहे :-

| **अंदाजपत्रकीय रक्कम ₹** | **प्रोव्हिजनल सम ₹** | **रॉयल्टी ₹** | **चाचणी शुल्क ₹** | **निविदा रक्कम ₹(वस्तु व सेवाकर वगळून)** |
|---|---|---|---|---|
| १९५,८०,११,८२४/- | ९,७९,००,५९१/- | ६,६६,५८,८०३/- | ४८,९५,०३०/- | २१२,७४,६६,२४८/- |

प्राप्त निविदांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **निविदाकाराचे नाव** | **निविदाकाराची टक्केवारी** | **निविदा रक्कम टक्केवारी धरुन** | **निविदा रक्कम प्रोव्हिजनल सम +रॉयल्टी +चाचणी शुल्क ₹ (वस्तु व सेवाकर वगळून)** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. अजवानि इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | २.३४ | २००,३८,२९,३०१/- | २१७,७२,४८,९५८/- | प्रथम |
| २ | मे. आर के मदानी आणि कं. | १४.९१ | २२४,९९,५१,३८७/- | २४४,६५,८६,१८५/- | तृतीय |
| ३ | मे. आरपीएस इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि. | १० | २१५,३८,१३,००६/- | २३४,०२,१२८७२/- | द्वितीय |

त्यामध्ये मे. अजवानि इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची ₹२१७,७२,४८,९५८/-. (वस्तु व सेवाकर वगळून) (२.३४% अधिकदर) आर्थिक देकार असलेली लघुत्तम निविदा आहे. मे. अजवानि इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची निविदा सर्वात लघुत्तम असल्यामुळे व कामाच्या अंदाजित किंमतीपेक्षा जास्त असल्यामुळे निविदाकाराकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले होते. त्यानुसार निविदाकाराने दि.०७/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये वाढीव दराबाबत स्पष्टीकरण प्राधिकरणास सादर केले. निविदाकाराने पत्रान्वये सादर केलेले स्पष्टीकरण खालीलप्रमाणे:

- सद्यस्थितीत कामाच्या जागेवर अनेक अडथळे आहेत आणि कामांच्या अंमलबजावणीसाठी स्थानिक लोकांचा भुसंपादनासाठी विरोध राहणार आहे.
- या कामासाठी २४ महिन्यांचा कालावधी आहे तसेच निविदेमध्ये भाववाढीसाठीची रक्कम ५%ला सिमीत करण्यात आली आहे. संपुर्ण जागा ताब्यात नसल्यामुळे सदर काम २४ महिन्यात झाले नाही तर कंत्राटदारास ५% पेक्षा भाववाढीचा आर्थिक भार सोसावा लागणार आहे.

अंतिम निविदा प्रक्रियाचे २% अधिक म्हणजेच अंदाजित रक्कम ₹ १९५,८०,११,८२४ + २% = ₹ १९९,७१,७२,०६०/- सदर रक्कम कंत्राटदारामार्फत वाटाघाटीनुसार स्विकारण्यात आले आहे व निविदा पुनर्वालोकन समितीने वाढीव दराबाबतचे स्पष्टिकरण मान्य करुन कंत्राटदार मे.अजवानि इन्फ्रास्ट्रक्चर यांच्याशी वाटाघाटी करुन ₹ १९९,७१,७२,०६० + प्रोव्हिजनल सम +रॉयल्टी + चाचणी शुल्क = ₹२१७,००,००,०००/- (वस्तु व सेवाकर वगळून) मुळ किंमतीवर २% अधिक्यासहित बोली स्विकारण्याबाबत शिफारस केली आहे.

१४.५ महानगर आयुक्त यांनी असेही नमुद केले की, वरील सर्व बाबीचे अवलोकन करता विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत खालील प्रस्ताव कार्यकारी समितीस सादर करण्यात येत आहे. विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत तळोजा एमआयडीसी रस्ता ते अंबरनाथ-काटई नाका पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण आणि पर्जन्य वाहिन्यांचे व मो-यांचे बांधकाम भाग-२ कामासाठी मे. अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची प्रथम लघुत्तम निविदा किंमत करुन ₹ १९९,७१,७२,०६० + प्रोव्हिजनल सम +रॉयल्टी + चाचणी शुल्क = ₹२१७,००,००,०००/- (वस्तु व सेवाकर वगळून) मुळ किमतीवर २% अधिक्यासहित स्विकृती करण्यास विनंती केली.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र.१४६७:</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कमल ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत व त्यास सहाय्यभुत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत तळोजा एमआयडीसी रस्ता ते अंबरनाथ-काटई नाका पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण आणि पर्जन्य वाहिन्यांचे व मो-यांचे बांधकामाकरीता मे. अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी वाटाघाटी करून सादर केलेली प्रथम लघुत्तम निविदा रक्कम ₹ १९९,७१,७२,०६०/- + प्रोव्हिजनल सम +रॉयल्टी + चाचणी शुल्क = ₹ २१७,००,००,०००/- (वस्तु व सेवाकर वगळून) /-(रुपये दोनशे सतरा कोटी मात्र) मुळ किंमतीवर २% अधिक्यासहित स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**<u>बाब क्र.१५:</u>** **<u>प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या महत्वाच्या प्रकल्पांसाठी सुसाध्यता अहवाल, सविस्तर प्रकल्प अहवाल, निविदा संच इ. कामांसाठी पुनर्विलोकन (Peer review) करणे याकरीता तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणे.</u>**

१५.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर क्षेत्रामध्ये विविध पायाभूत प्रकल्पांची कामे करण्यात येतात. त्या अनुषंगाने नजिकच्या काळात काही महत्वाकांक्षी प्रकल्पांची कामे हाती घेण्यात येत आहेत. यामध्ये रस्ते, बोगदे, पुल इ. कामांचा समावेश आहे. प्राधिकरणाच्या प्रचलित कार्यपद्धतीनुसार नव्याने हाती घेण्यात येणाऱ्या प्रकल्पांचा सुसाध्यता अहवाल तयार करुन विविध सर्वेक्षणे, तपासण्या करुन प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागारांची नेमणूक करण्यात येते. सल्लागारांने सर्व सर्वेक्षणे / पडताळण्या पूर्ण करुन सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पाच्या कार्यान्वयासाठी ठेकेदार नियुक्तीची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येते.

१५.२ या कामाच्या स्वरुपाबद्दल माहिती देताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, प्राधिकरणामार्फत सध्या खालील प्रकल्पांची कामे प्राधान्याने हाती घेण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च (रु.कोटीत) |
|---|---|---|
| १ | ठाणे खाडी किनारा मार्गाचे बांधकाम करणे | २१७० |
| २ | पूर्व मुक्त मार्गाचे ठाणे पर्यंत विस्तारीकरण करणे | २०७० |
| ३ | आनंद नगर ते साकेत उन्नत मार्गाचे बांधकाम करणे. | १६०० |
| ४ | रा.मा. क्र. ४ ते काटई नाका पर्यंत उन्नत मार्गाचे बांधकाम करणे | ९०७ |
| ५ | ठाणे खाडी वरील पुलांचे बांधकाम करणे.<br>१. गायमुख ते पायेगाव<br>२. कासार वाडवली ते खारबाव<br>३. कोलशेत ते काल्हेर | १६९८ |
| ६ | कल्याण वळण रस्त्याचे (पॅकेज – १,२) बांधकाम करणे | ४०० |
| ७ | ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह पर्यंत भुयारी मार्ग बांधणे | ५२६० |
| | **एकूण** | **१४,१०५** |

१५.३ वरील सर्व कामांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता प्राधिकरणामार्फत स्वतंत्रपणे सल्लागारांची नेमणूक करण्यात आली आहे. तथापि, वरील सर्व प्रकल्प मोठ्या स्वरुपाचे असुन एकमेकांना पुरक स्वरुपाचे आहेत. त्यामुळे या सर्व प्रकल्पांचा एकत्रितरित्या अभ्यास होणे आवश्यक वाटते. तसेच प्रकल्पांचे अवघड स्वरुप पाहता सल्लागारांनी तयार केलेले संकलन स्ट्रक्चरल, अंदाजपत्रके इ. तांत्रिक बाबींचे स्वतंत्र सल्लागारामार्फत पुन्हा पडताळणी होणे आवश्यक वाटते. या बाबींचा विचार करता स्वतंत्र सल्लागारांनी तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालांचे एकत्रितरीत्या सर्वंकष अभ्यास करण्याच्या अनुषंगाने पुर्नविलोकन (Peer review) सल्लागारांची नेमणूक करणे प्रस्तावित करण्यात आले.

१५.४ कामाच्या निविदा प्रक्रियेबद्दल माहिती देताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, वरीलप्रमाणे नमुद केल्यानुसार एकूण रु. १४,१०५ कोटी अंदाजित रक्कमेच्या ७ प्रकल्पांचे पुनर्विलोकन करण्यासाठी सल्लागार नियुक्तीकरीता दि. २४/०७/२०२३ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरून निर्धारीत मुदतीत खालील २ सल्लागार संस्थांनी निविदा सादर केल्या:-

| अ.क्र. | सल्लागार संस्थेचे नाव | निविदा रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १. | मे. टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. | रु. २०,७०,८०,०००/- |
| २. | मे. हिल इंटरनॅशनल | रु. २९,८३,१०,०००/- |

वरील प्राप्त निविदांमधील मे. टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. यांनी सादर केलेली रु.२०,७०,८०,०००/- रक्कमेची निविदा लघुत्तम असुन सदर देकार एकूण कामाची किंमत रु.१४,१०५ कोटीच्या ०.१४६८% इतकी होती.

सदर देकाराबाबत स्पष्टीकरण देणेकरीता व देकाराची किंमत कमी करण्यासाठी अति. महानगर आयुक्त (२) यांचे समवेत सल्लागारांची दि. १७/०८/२०२३ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत सल्लागारांनी त्यांचे देकाराबद्दल पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण सादर केल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

१५.४.१ पुनर्विलोकनसाठी (Peer review) समाविष्ठ करण्यात आलेले प्रकल्प अतिशय अवघड स्वरुपाचे असून त्यामध्ये रस्ते, उन्नत मार्ग, पूल, किनारा मार्ग, खाडीवरील पूल आणि बोगदे मार्ग अशा कामांचा समावेश असून ही कामे दाट लोकवस्तीच्या आणि गजबजलेल्या शहरी भागांमध्ये करणे प्रस्तावित आहेत. सदर कामे करण्याकरीता उच्च शिक्षित व अशा प्रकारच्या कामांचा अनुभव असणाऱ्या मनुष्यबळाची आवश्यकता आहे. सध्या सर्वत्र सुरु असलेल्या मोठ्या प्रमाणावरील विकास कामांमुळे अशा प्रकारच्या मनुष्यबळासाठी जास्त रक्कम द्यावी लागते.

१५.४.२ निविदा प्रक्रिया Quality Cost Based System (QCBS) तत्वावर आधारीत असल्याने उच्च दर्जाचे मनुष्यबळ उपलब्ध करणे आवश्यक आहे.

१५.४.३ कामांकरीता देण्यात आलेली मुदत अतिशय कमी असल्याने, तसेच एकाच वेळी या प्रकल्पांची कामे करावयाची असल्याने मनुष्यबळाचे नियोजन त्यानुसार करावे लागणार आहे. तसेच मे. टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. यांनी रु. ५०,८०,०००/- इतक्या रकमेने देकार कमी करण्यास सहमती दर्शविल्यामुळे त्यांच्या देकाराची सुधारीत किंमत रु. २०,२०,००,०००/- इतकी असून ती प्रकल्प किंमतीच्या ०.१४३२% इतकी आहे.

१५.५ मे. टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. यांनी सादर केलेला सुधारीत देकार निविदा समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आला होता. दि. २३/०८/२०२३ रोजी झालेल्या निविदा समितीच्या बैठकीत या प्रस्तावावर विचार करुन निविदा काराने प्रकल्प निहाय सल्लागार शुल्क कळवावे तसेच त्यांनी सादर केलेल्या स्पष्टीकरणाच्या तीन मुद्यांचे प्रकल्प निहाय विश्लेषण सादर करावे अशा सुचना देण्यात आल्या. या अनुषंगाने निविदाकार मे. टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. यांचेकडून प्राधिकरणाने दि. २३/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये खुलासा मागविण्यात आला.

त्यानुसार मे. टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. यांनी त्याच्या दि. २५/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे खुलासा प्राधिकरणास सादर केल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

१५.५.१ सर्वसाधारणपणे Peer review च्या वावामध्ये इतर सल्लागारांनी तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाचे मूल्यमापन करणे अशा स्वरुपाचा अंतर्भाव असतो. तथापि, सध्याच्या कामाच्या वावा मध्ये रस्ते, किनारा मार्ग, उन्नत मार्ग, खाडीवरील पूल आणि बोगदे अशा विविध स्वरुपाच्या कामांचा समावेश असून प्रत्येक प्रकल्पाचे स्वरुप देखील विस्तृत आहे. त्यामुळे याकरीता अधिकचे मनुष्यबळ आवश्यक आहे.

१५.५.२ प्रकल्पांचे स्वरुप अवघड स्वरुपाचे असल्याचे स्पष्ट करताना पुढील बाबींचे विश्लेषण करण्यात आले आहे,

१५.५.३ बाळकुम ते गायमुख ठाणे खाडी किनारा मार्ग

- रस्त्याची एकूण लांबी १३.८ कि.मी. असून यापैकी सुमारे ६०% भाग उन्नत स्वरुपाचा आहे. तसेच रस्त्याची आखणी खाडी किनाऱ्यालगत असल्याने रस्त्याचे पायाचे (foundation) संकल्पन अवघड स्वरुपाचे आहे.
- रस्त्याची आखणी महत्वांच्या रस्त्यांना तीन ठिकाणी ओलांडत असून त्या ठिकाणी रस्त्याची आखणी तपासणे आव्हानात्मक आहे.
- खाडीवरील १०० मी. गाळ्याचे बांधकाम Segmental Balance Cantilever स्वरुपाचे करण्यात येणार आहे. उपरोक्त कामामध्ये समावेश असलेले १.५ कि.मी. लांबीचे भुयारी मार्गाचे काम खाडी किनारी करण्यात येणार असल्याने या कामाच्या तपासणी करीता वरिष्ठ तज्ञांची आवश्यकता आहे.
- सुमारे ७५ मी. लांबीच्या गाळ्याचे बांधकाम स्टीलमध्ये करावयाचे आहे.
- या व्यतिरीक्त रस्त्याची आखणी मेट्रो मार्गाखालून असल्याने याकरीता शक्य झाल्यास इतर पर्यायांचा अभ्यास करण्यात येईल.

१५.५.४ रा.मा.क्र. ४ ते कटाई नाका पर्यंत उन्नत मार्ग

- सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल सन २०१३ मध्ये तयार करण्यात आला होता. तसेच या प्रकल्पाचे सर्वेक्षण संक्षिप्त स्वरुपाचे दिसून येत असून या प्रकल्पाचे मूल्यमापन करण्याकरीता सखोल सर्वेक्षणाची आवश्यकता असू शकते.

..७३/-

१५.५.५ छेडानगर, घाटकोपर ते ठाणे पर्यंत पूर्व मुक्तमार्गाचे विस्तारीकरण करणे

- प्रकल्प लांबीमध्ये ७ महत्वाचे जंक्शन असून यावर ६ उड्डाणपुल अस्तित्वात आहेत.
- वाहतूक सर्वेक्षण आणि भविष्यातील होणारे वाहतुकीचे नियोजन यांचा प्रस्तावित मार्गिकांच्या अनुषंगाने सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे.
- प्रकल्पाच्या पाहणी दरम्यान दिसून आले की, काही जंक्शनच्या ठिकाणी उड्डाणपुल अस्तित्वात असूनसुद्धा वाहतुक कोंडी होत आहे. त्यामुळे या ठिकाणी वळण मार्ग / दिशानिहाय मार्ग अशा पर्यायांची पडताळणी करणे आवश्यक आहे.
- या प्रकल्पाकरीता अतिरिक्त भूसंपादन अतिशय अवघड असल्याने उपलब्ध रस्त्याच्या रुंदीमध्ये पुलाचे संकल्पन व आराखडे करणे आव्हानात्मक आहे.
- उन्नत मार्गांचे संकल्पन करताना अस्तित्वातील पूल व मेट्रो मार्गाचे स्तंभांचे अस्तित्व लक्षात घेणे आवश्यक आहे.
- स्तंभांचे बांधकाम करताना वाहतुकीवर परिणाम होणार आहे.

१५.५.६ ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह पर्यंत जमिनीखालून बोगद्याचे बांधकाम करणे

- काही ठिकाणी मृदू स्वरुपाच्या मातीचा थर अपेक्षित असून अशा ठिकाणी भूवैज्ञानिकांमार्फत सखोल तपासणी आवश्यक आहे.
- पूर्व मुक्तमार्गावरुन येणारी वाहतुक गिरगाव चौपाटी / मरीन ड्राईव्ह या ठिकाणी येऊन मिळणार असल्याने येथील नियोजनाचा सखोल अभ्यास आवश्यक आहे.
- अत्यंत दाट लोक वस्तीच्या भागातून रस्त्याच्या प्रकल्पाची आखणी असल्याने अस्तित्वातील रस्ते / पूल यांच्याशी सुयाग्य जोडण्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

१५.५.७ सध्या सर्वत्र मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांची कामे सुरु असल्याने तसेच प्रस्तावित प्रकल्पांचे स्वरुप आव्हानात्मक असल्याने याकरीता आवश्यक असलेले तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी त्यांना अधिक स्वरुपात मोबदला देणे आवश्यक आहे.

वरील बाबी नमूद करुन निविदाकारांनी प्रकल्प निहाय सल्लागार शुल्काचे विश्लेषण खालीलप्रमाणे सादर केल्याचे महानगर आयुक्त यांनी निदर्शनास आणले.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | लांबी / रुंदी | अंदाजित रक्कम रु. कोटी (जीएसटी वगळून) | सल्लागार शुल्क रु. कोटी (जीएसटी वगळून) |
|---|---|---|---|---|
| १ | बाळकुम ते ठाणे खाडी किनारा मार्ग | १३.३८ कि.मी. , ४० मी. (३+३ मार्गिका) | २,१७० | ३.११ |
| २ | छेडानगर, घाटकोपर ते ठाणे पूर्व मुक्त मार्गाचे विस्तारीकरण | १३ कि.मी. , २८ मी. (३+३ मार्गिका) | २,०७० | २.९६ |
| ३ | आनंद नगर ते साकेत उन्नत मार्ग | ६.३ कि.मी., २८ मी. (३+३ मार्गिका) | १,६०० | २.२९ |
| ४ | रा.मा.क्र. ४ ते कटाई नाका उन्नत मार्ग | ६.३ कि.मी., २८ मी. (३+३ मार्गिका) | ९०७ | १.३ |
| ५ | ठाणे खाडी पूल<br>गायमुख ते पायेगाव | पूल १.१० कि.मी., रस्ता १.८ किमी. (३+३ मार्गिका) | १,६९८ | २.४३ |
| | ब. कासारवडवली ते खारबाव | पूल ०.८० कि.मी., रस्ता १.० किमी. (३+३ मार्गिका) | | |
| | कोलशेत ते काल्हेर | पूल १.० कि.मी., रस्ता ०.५ किमी. (३+३ मार्गिका) | | |
| ६ | कल्याण वळण रस्ता (पॅकेज १,२) | ७ कि.मी. , ३०/४५ मी. | ४०० | ०.५७ |
| ७ | ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह पर्यत भुयारी मार्ग | लांबी ९.२ कि.मी , अंतर्गत व्यास ११ मी. (३ मार्गिका अधिक पदपथ)<br>टीबीएम बोगदा – ६.५ कि.मी.<br>कट ॲण्ड कव्हर – १.६७ कि.मी.<br>पोचमार्ग – १.०६ कि.मी.. | ५,२६० | ७.५३ |
| **एकूण सल्लागार शुल्क** | | | **१४,१०५** | **२०.२०** |

वरील प्रमाणे सल्लागारांकडून प्राप्त झालेला खुलासा निविदा समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आला. दि. ३०/०८/२०२३ रोजी झालेल्या निविदा समितीच्या बैठकीत या बाबींचे अवलोकन करुन सदर प्रस्ताव स्विकारण्याची शिफारस निविदा समितीने केल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

१५.६ उपरोक्त बाबींचे अवलोकन करुन महानगर आयुक्त यांनी 'प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या वरील नमूद ७ महत्वाच्या प्रकल्पांसाठी सुसाध्यता अहवाल, सविस्तर प्रकल्प अहवाल, निविदा संच इ. यांचे पुनर्विलोकन (Peer review) करणेच्या कामाकरीता

तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणेसाठी' मागविण्यात आलेल्या निविदांमधील लघुत्तम निविदाकार मे. टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. यांची रु.२०,२०,००,०००/- रक्कमेची सुधारीत निविदा स्वीकारणेचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला.

१५.७ चर्चेदरम्यान उपरोक्त सल्लागारांनी पुर्नविलोकन केल्यानंतर सुचविलेल्या बाबींबद्दल करण्यात येणाऱ्या कार्यवाही बाबत विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी सांगितले कि, अशा बाबींचा संबंधित कामांच्या अंदाजपत्रकात तसेच निविदा प्रपत्रात अंर्तभाव करुन त्यानुसार कंत्राटदार नियुक्तीसाठी निविदा प्रक्रिया करण्यात येईल.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४६८:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती 'प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रस्तावात नमूद केलेल्या ७ महत्वाच्या प्रकल्पांसाठी सुसाध्यता अहवाल, सविस्तर प्रकल्प अहवाल, निविदा संच इ. यांचे पुर्नविलोकन (Peer review) करणे याकरीता तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणे' या कामासाठी लघुत्तम निविदाकार मे. टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. यांची रु. २०,२०,००,०००/- रकमेची सुधारीत निविदा स्विकारण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.१६: कर्जत चार फाटा ते चौक फाटा पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे या कामाच्या निविदा स्विकृतीस मान्यता मिळणेबाबत.**

१६.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर क्षेत्रामध्ये विविध पायाभूत प्रकल्पांची कामे करण्यात येतात. त्या अनुषंगाने नजिकच्या काळात काही महत्वाकांक्षी प्रकल्पांची कामे हाती घेण्यात येत आहे. यामध्ये रस्ते, बोगदे, पूल इ. कामांचा समावेश आहे. प्राधिकरणाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार नव्याने हाती घेण्यात येणाऱ्या प्रकल्पांचा सुसाध्यता अहवाल तयार करुन विविध

सर्वेक्षण, तपासण्या करुन प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागारांची नेमणूक करण्यात येते किंवा संबंधित विभागामार्फत अंदाजपत्रक तयार करुन प्रकल्पाच्या कार्यान्वयासाठी ठेकेदार नियुक्तीची निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येते.

१६.२ या कामाच्या स्वरुपाबद्दल माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणामार्फत खालील कामे हाती घेण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (रु.कोटीत) |
|---|---|---|
| १ | कर्जत चार फाटा ते चौक फाटा पर्यंतच्या रस्त्या सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे . | ६५.५१ |

सदरच्या कामामध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या दोन्ही बाजूला पर्जन्य जलवाहिन्या (Open Precast U shape drain), डांबराचा फलेक्सिबल शोल्डर इ. कामे प्रस्तावित करण्यात आले आहे. फलेक्सिबल शोल्डरमध्ये सेवावाहिन्यांसाठी सोय करण्यात आली आहे व प्रत्येकी २०० मीटर वर क्रॉस पाईप व डक्ट देण्यात आले आहेत.

१६.३ सदर कामासाठी ठेकदार नियुक्तीकरिता दि. ०६/०५/२०२३ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. तसेच दि. १५/०५/२०२३ रोजी निविदापूर्व बैठक नियोजित करण्यात आली होती. परंतु, सदर निविदापूर्व बैठकीत कोणीही निविदाकार उपस्थित नव्हते, तसेच कंत्राटातील अटी व शर्तीबाबत कोणत्याही निविदाकाराकडून सुचना प्राप्त झाल्या नाहीत. त्यास अनुसरून निर्धारित मुदतीत खालील ३ कंत्राटदारांनी निविदा सादर केल्या :-

| अ.क्र. | निविदाकार | सादर टक्केवारी | सादर आर्थिक देकार (₹) |
|---|---|---|---|
| **१.** | **मे. पी. डी इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि.** | **०.००% (AT PAR)** | **६४,७३,१७,६७९/- (L१)** |
| २. | मे. जे. एम. म्हात्रे इन्फ्रा प्रा. लि | ४.५६०% Above | ६७,६८,३५,३६५/- (L२) |
| ३. | मे. ठाकुर इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. | ७.५००% Above | ६९,५८,६६,५०४/- (L३) |

१६.४ वरील प्राप्त निविदांमधील मे. पी. डी इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. यांनी सादर केलेली ₹ ६४,७३,१७,६७९ कोटी रक्कमेची निविदा लघुत्तम असुन सदर देकार कामाची एकूण किंमत ₹ ६५,५१,०२,४१८.३४ (रॉयल्टी सहित व वस्तु व सेवा कर वगळून) होती. वरील प्रमाणे प्राप्त लघुत्तम निविदा, निविदा समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आली. दि. ०९/०८/२०२३ रोजी झालेल्या निविदा समितीच्या बैठकीत सदर प्रस्ताव स्वीकारण्याची शिफारस निविदा समितीने केल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

१६.५ उपरोक्त बाबींचे अवलोकन करुन महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या वरील कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदांमधील लघुत्तम निविदाकार मे. पी. डी इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. यांची रु. ६५,५१,०२,४१८.३४ (रॉयल्टी सहित व वस्तु व सेवा कर वगळून) इतकी रक्कमेची निविदा स्वीकारणेचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र.१४६९:</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या कर्जत चार फाटा ते चौक फाटा पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करणे या कामासाठी लघुत्तम निविदाकार मे. पी. डी इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. यांची रु. ६५,५१,०२,४१८.३४ (रॉयल्टी सहित व वस्तु व सेवा कर वगळून) रकमेची निविदा स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१७:</u>** **<u>मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरीन ड्राईव्ह येथील सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम करण्यासाठी लघुत्तम आर्थिक देकार असलेल्या कंत्राटदाराच्या नियुक्तीस मान्यता देणेबाबत.</u>**

१७.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्याकरिता मूलभूत विकास योजना राबविण्यासाठी विविध प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच मुंबई शहर परिसरात भुयारी मेट्रो मार्ग-३, शिवडी ते वरळी उन्नत प्रकल्प, मुंबई पारबंदर प्रकल्प, सागरी किनारा मार्ग, नरीमन पॉईंट ते कुलाबा अशा विविध महत्त्वाच्या प्रकल्पांची कामे विविधशासकीय विभागांमार्फत प्रगतीपथावर आहेत. सद्य:स्थितीत दक्षिण मुंबईत ठिकठिकाणी वाहतूक संथगतीने होत असते, तसेच गर्दीच्या वेळी मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होते.

१७.२ महानगर आयुक्त यांनी प्रकल्पाची आवश्यकता नमूद करताना समितीस असे सांगितले की, प्राधिकरणामार्फत मुंबई शहराच्या पूर्व किनारपट्टीस समांतर असा पूर्व मुक्तमार्ग ऑरेंज गेटपर्यत बांधण्यात आला आहे. पूर्व मुक्त मार्गावरील वाहतूक मुंबई पोर्ट ट्रस्टच्या ऑरेंज गेट येथे गजबजलेल्या पी'डिमेलो मार्गावर येऊन मिळते, त्यामुळे गर्दीच्या वेळी याठिकाणी वाहनांच्या मोठया प्रमाणात रांगा लागतात. तसेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनलजवळील पी'डिमेलो मार्गावरील मुख्य पोस्ट ऑफिसच्या चौकात वाहतुकीचे नियमन करणे अवघड होत आहे. तथापि, मुंबई शहरात पूर्व पश्चिम बाजूस जोडणारी प्रभावी वाहतूक निर्गमन व्यवस्था नसल्याने मुंबईकरांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो व पर्यायाने इंधन व वेळेची हानी होते.

१७.३ अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी समितीस सांगितले की, मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्तमार्ग ते मरीन ड्राईव्ह, मुंबई सागरी किनारा मार्गाच्या (Mumbai Coastal Road) दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम या प्रकल्पाची शक्याशक्यता तपासणे (Feasibility Study), सविस्तर प्रकल्प अहवाल बनविणे (Detailed Project Report), कंत्राटदाराच्या नेमणुकीसाठी निविदा प्रक्रिया करणे आणि प्रकल्प व्यवस्थापनासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी मे. पडॅको कंपनी लि. यांची सल्लागार म्हणून दि.१५ नोव्हेंबर, २०२२ रोजी नेमणूक करण्यात आली.

१७.४ मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्तमार्ग ते मरीन ड्राईव्ह येथील सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम या प्रकल्पाकरीता ₹८०५६/- कोटी इतक्या रक्कमेच्या प्रकल्पाच्या एकूण अंदाजित खर्चास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि.१० मार्च, २०२३ रोजी झालेल्या १५४व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती असे समितीस सांगितले.

१७.५ या प्रकल्पासाठी कंत्राटदार नियुक्तीकरीता दि.२४ फेब्रुवारी, २०२३ रोजी महानिविदा (Mahatender) या संकेत स्थळावर निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदरच्या वृत्तपत्रातील जाहिरातीत नमूद केलेली कामाची अंदाजित किंमत ही सल्लागाराने ढोबळमानाने (block estimate) सादर केलेल्या अंदाजपत्रकीय किंमतीनुसार होती. तद्नंतर प्रकल्पाच्या मार्गरेषेच्या वेळोवेळी झालेल्या बदलांच्या अनुषंगाने सुधारित अंदाजपत्रकीय रक्कमेस तांत्रिक मान्यता घेण्यात आली. सदर कामाची पहिली निविदापूर्व बैठक दि.२० मार्च, २०२३ रोजी महानगर आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली झाली. या निविदापूर्व बैठकीदरम्यान निविदाकारांकडून उपस्थित करण्यात आलेले प्रश्न व सूचनांच्या अनुषंगाने सल्लागाराने सदर प्रश्नांची उत्तरे व त्याअनुषंगाने

निविदेत आवश्यक त्या सुधारणा दि.२३ मार्च, २०२३ रोजी प्राधिकरणास सादर केल्या. सीएससी-१ (CSC-1) व सीएसडी-१ (CSD-1) दि.२४ मार्च, २०२३ रोजी महानिविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या. तद्नंतर, निविदाकारांनी काही महत्त्वाचे तांत्रिक मुद्दे उपस्थित केले.

१७.६ दुसरी निविदापूर्व बैठक दि.२२ मे, २०२३ रोजी अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. कंत्राटदारातर्फे उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यांचा सविस्तर अभ्यास करुन सल्लागाराने दि.०९ जून, २०२३ रोजी उत्तर संच-२ व सुधारीत कंत्राटीय तरतूद सीएसडी-२ (CSD-2) प्राधिकरणास सादर केले. निविदाकारांनी उपस्थित केलेल्या विविध तांत्रिक मुद्दयाच्या अनुषंगाने सल्लागाराने निविदेतील काही महत्त्वाच्या तरतुदींबाबत बदल सुचविले.

१७.७ सल्लागाराने सादर केलेल्या सुधारित अहवालानुसार प्रकल्पाच्या डाव्या बाजूच्या भुयारी मार्गाची (LHS Tunnel) वळणाची त्रिज्या ही ३०० मीटरहून अधिक करण्यात आली. त्यामुळे वाहनांचा वेग ८० कि.मी. प्रति तास शक्य आहे. प्रस्तावित मार्गाच्या डावीकडील भुयारी मार्गाची सागरी किनारा मार्गास जुळणी करण्याऐवजी त्याखालून पुढे दक्षिण दिशेस नेण्याचे प्रस्तावित करण्यात आले. त्यामुळे सागरी किनारी मार्गास होणारी जुळणी टाळता येणे शक्य झाले व सागरी किनारा मार्गाची वाहतूक सुरक्षितपणे शक्य होणार असल्याचे अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी सांगितले.

१७.८ सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रस्तावित भुयारी मार्ग भूमिगत मेट्रो मार्ग-३ च्या खालून नेण्याचे प्रस्तावित करण्यात आले असून त्यामुळे भुयारी मार्ग जमिनीखालून सुमारे ४० मी. पेक्षा जास्त खोलीवरून जाणार असून त्यामुळे मध्य रेल्वे आणि उंच इमारतींच्या पायाचा अडथळा टाळता येणे शक्य होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

१७.९ अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असे स्पष्ट केले की, शिफारस केलेल्या उपरोक्त सुधारणांमुळे टनेल बोअरींग मशिनद्वारे करण्यात येणाऱ्या भुयारी मार्गाची तसेच कट आणि कव्हर भागाची लांबी वाढली. तसेच प्रकल्पाच्या डावीकडील बाजूचा भुयारी मार्ग मुंबई सागरी मार्गाच्या खालून पुढे नेऊन मरीन ड्राईव्ह येथील बी.डी.सोमानी चौकाच्या दक्षिणेस भूपृष्ठावर आणण्यात येणार आहे. या बाबींमुळे प्रकल्पाची एकूण लांबी सुमारे ९८८ मी. ने वाढून एकूण सुमारे ९.२३ कि.मी. इतकी झाल्याचे समितीस अवगत केले. या सुधारणांमुळे मरीन ड्राईव्ह येथे वाहतुकीच्या विनिमयासाठी किनारा भागात सुमारे ३५० मी. लांबीचा अतिरिक्त भराव टाकण्याचे

प्रस्तावित आहे. मरीन ड्राईव्ह येथे राणीचा कंठहार (Queens Neckless) या सौंदर्यपूर्ण व वैशिष्टयपूर्ण ठिकाणाचे पुरातन वास्तु संवर्धन समितीच्या (Heritage Committee) सूचनांनुसार जतन करण्याचे प्रस्तावित आहे.

१७.१० या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA), पुरातन वास्तु संवर्धन समिती, मुंबई मेरिटाईम बोर्ड तसेच आवश्यक त्या अन्य प्राधिकरणांची मान्यता घेऊन प्रकल्पाची अंमलबजावणी करणे प्रस्तावित आहे. सदर कामामध्ये विविध यंत्रणांची जसे की, मुंबई महानगरपालिका कोस्टल रोड प्रकल्प, पालिका प्रभाग कार्यालय, मुंबई मेट्रो लाईन-३, रेल्वे, अग्निशमन विभाग, टाटा पॉवर, नौदल, पालिका पाणी पुरवठा विभाग, मुंबई पोर्ट ॲथोरिटी इत्यादी प्राधिकरणांशी प्रकल्पाकरीता परवानग्या घेणेबाबत पत्रव्यवहार / बैठकी घेणे प्रगतीपथावर असून प्रकल्पाची अंमलबजावणी करताना संबंधीत विविध यंत्रणांशी समन्वय साधून काम करणे नियोजित आहे असे अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी नमूद केले.

१७.११ या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी ऑरेंज गेटकडील बाजूस मुंबई पोर्ट ॲथोरीटीची सुमारे २.९ हेक्टर जमिनीची कायमस्वरुपी तत्त्वावर आवश्यकता आहे. याबाबत मुंबई पोर्ट ॲथॉरिटीशी पत्रव्यवहार करण्यात आला असून जमिन हस्तांतरण करण्यासाठी प्राधिकरणामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

१७.१२ निविदाकारांच्या सूचनांच्या अनुषंगाने निविदेतील बदल, सीएससी-२ (CSC-2) व सीएसडी-२ (CSD-2) दि.१४ जून, २०२३ रोजी महानिविदा संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आले. ई-निविदा सादर करण्याच्या सुधारित अंतिम दिनांकास म्हणजेच ३० जून, २०२३ रोजी ई-निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त ई-निविदा दि.३ जुलै, २०२३ रोजी उघडण्यात आल्या.

१७.१३ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, ई-निविदा प्रक्रियेने राबविण्यात आलेल्या "ऑरेंज गेट, पूर्व मुक्तमार्ग ते मरीन ड्राईव्ह, सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम" करण्यासाठी (१) जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि.-नागार्जुना कन्स्ट्रक्शन कंपनीजेव्ही) व (२) मे.लार्सन ॲण्ड टूब्रो लि. या निविदाकारांनी निविदा सादर केल्या. निविदाकारांनी निविदा अनामत रक्कम भरल्याची खातरजमा आणि सादर केलेल्या निविदांच्या तांत्रिक बाबींची तपासणी करण्याची प्रक्रिया दि.०४ जुलै, २०२३ रोजी सल्लागारामार्फत सुरु करण्यात आली.

..८१/-

१७.१४ सल्लागाराने केलेल्या छाननीनुसार निविदाकारांनी निविदेत नमूद केल्यानुसार ₹५५.९८ कोटी रक्कमेची निविदा अनामत रक्कम बँक गॅरंटीच्या स्वरुपात भरणा केली आहे.सल्लागाराने प्राप्त निविदांची तांत्रिक छाननी ४ टप्प्यांत करताना निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता, आर्थिक उलाढाल, निविदा क्षमता (Bid Capacity) इत्यादी बाबी निविदेतील निकषांच्या अनुषंगाने तपासल्या.

१७.१५ प्राधिकरणाच्या निवड शिफारस समितीच्या दि.११ जुलै, २०२३ रोजीच्या पहिल्या बैठकीत सल्लागाराने निविदेतील अटी व शर्तीनुसार छाननी करुन तांत्रिक मूल्यमापन अहवाल सादर केला. सदर बैठकीत याबाबत सविस्तर चर्चा झाली. तसेच सदर बैठकीत दोन्ही निविदाकारांच्या प्रस्तावित कामाची पध्दत (proposed methodology) आणि निविदेतील आवश्यक ती संबंधित कागदपत्रे समितीसमोर सादर करण्यात आली. सल्लागाराने छाननी करुन सादर केलेल्या मूल्यमापन अहवालानुसार (१) जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि.-नागार्जुना कन्स्ट्रक्शन कंपनी (जेव्ही) व (२) मे.लार्सन ॲण्ड टूब्रो लि. या दोन्ही निविदाकारांचे तांत्रिक प्रस्ताव निविदेतील निकषांची पुर्तता करणारे आढळून आले. सबब, निविदा शिफारस समितीने वरीलप्रमाणे दोन्ही पात्र कंत्राटदारांच्या आर्थिक देकार उघडण्याची एकमताने शिफारस केली.

१७.१६ महानगर आयुक्त यांनी कार्यकारी समितीस असे सादर केले की, दोन्ही निविदाकारांचे आर्थिक देकार दि.२० जुलै, २०२३ रोजी उघडण्यात आले. कंत्राटदाराच्या आर्थिक बोलींचा सविस्तर तपशील दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे :

| **अ. क्र.** | **निविदाकाराचे नाव** | **तात्पुरत्या रक्कमेशिवाय (₹)** | **तात्पुरत्या रक्कमेसह व करांशिवाय (₹)** | **तात्पुरत्या रक्कमेसह व करांसहीत (₹)** |
|---|---|---|---|---|
| १. | जे.कुमार इन्फ्रापोजेक्टस लि. -नागार्जुना कन्स्ट्रक्शन कंपनी जेव्ही) | ६५२३,७८,६५,००० | ७४१४,९४,६५,००० | ८५८९,२२,८०,७०० |
| २. | लार्सन ॲण्ड टूब्रो लि. | ५८२५,३७,००,००० | ६७१६,५३,००,००० | ७७६५,०९,६६,००० |

१७.१७ दि.२० जुलै, २०२३ रोजी निविदा शिफारस समितीच्या दुसऱ्या बैठकीत सल्लागाराने दोन्ही निविदाकारांच्या आर्थिक देकारांबाबत मूल्यमापन अहवाल व त्या विषयीची संबंधित कागदपत्रे निविदा शिफारस समितीस सादर केली.

१७.१८ मे. लार्सन ॲण्ड टुब्रो लि. यांचा आर्थिक देकार हा लघुत्तम असून सदर देकार या कामाच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेपक्षा जास्त असल्याचे आढळले. सल्लागारातर्फे सादर करण्यात आलेल्या या बांधकामाच्या अंदाजपत्रकाची रक्कम ₹५२६० कोटी आहे.

मे.लार्सन ॲण्ड टूब्रो लि. या निविदाकाराचा लघुत्तम आर्थिक देकार ₹५८२५.३७ कोटी आहे. सदरचा आर्थिक देकार बांधकामाच्या अंदाजपत्रकाच्या रक्कमेपेक्षा सुमारे १०.७५% इतका जास्त असल्याचे महानगर आयुक्तांनी नमूद केले. मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि.-नागार्जुना कन्स्ट्रक्शन लि. (जेव्ही) यांचा आर्थिक देकार बांधकामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा सुमारे २४.०२% इतका जास्त असल्याचे आढळून आला.

१७.१९ निविदा शिफारस समितीच्या दि.२० जुलै, २०२३ रोजी झालेल्या दुसऱ्या बैठकीत सल्लागाराने सादर केलेल्या आर्थिक मूल्यमापन अहवालाविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चेनुसार मे.लार्सन ॲण्ड टुब्रो लि. या लघुत्तम निविदाकाराकडून त्याचे आर्थिक देकारापुष्ठर्थ स्पष्टीकरण प्राप्त करुन घेण्याचे ठरले.

१७.२० मे.लार्सन ॲण्ड टुब्रो लि. या लघुत्तम निविदाकाराने दि.०४ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या आर्थिक देकाराबाबत सविस्तर स्पष्टीकरण व त्याबाबतची कागदपत्रे प्राधिकरणाकडे सादर केली.

१७.२१ अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी असे विशद केले की, प्राधिकरणामार्फत कंत्राटदाराला त्यांच्या आर्थिक देकारामध्ये सवलत देण्याबाबत विनंती करण्यात आली. तथापि, कंत्राटदाराने याबाबत असे कळविले की, प्रकल्पाकरिता देण्यात आलेला आर्थिक देकार स्पर्धात्मक असून त्यात कोणतीही सवलत देणे शक्य नाही.

१७.२२ मुंबई परिसरात गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता आणि ठाणे-बोरीवली जोड बोगदयाचे काम हाती घेण्यात आलेले आहे. सदरचे दोन्ही प्रकल्प हे भुयारी मार्ग असल्याने त्यांची कामे टनेल बोअरींग मशिनद्वारे करण्यात येणार आहेत. लघुत्तम देकारानुसार टीबीएम मशिनद्वारे अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या शहर भागातील भूमिगत रस्त्याचा प्रती किमी खर्च सुमारे ₹५१४ कोटी इतका येत असून तो गोरेगाव-मुलुंड जोड रस्त्याच्या ₹५२९ कोटी प्रती किमी इतक्या खर्चापेक्षा कमी असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

१७.२३ प्राप्त निविदाकाराचा लघुत्तम आर्थिक देकार व प्रकल्पाच्या संबंधित बाबींची छाननी करण्यासाठी प्राधिकरणातर्फे आय.आय.टी., मुंबई या त्रयस्थ संस्थेची नेमणूक करण्यात आली. आय.आय.टी., मुंबईने प्रकल्पाच्या लघुत्तम आर्थिक देकाराच्या अनुषंगाने छाननी करून त्यांचा अहवाल दि.०६ सप्टेंबर, २०२३ रोजी प्राधिकरणास सादर केला.

१७.२४ निविदा शिफारस समितीची तिसरी बैठक दि.६ सप्टेंबर, २०२३ रोजी झाली. या बैठकीत सल्लागाराने निविदाकारांकडून प्राप्त झालेल्या सविस्तर स्पष्टीकरणाबाबत खुलासा, आय.आय.टी., मुंबई यांचेकडून प्राप्त झालेला अहवाल व गोरेगाव-मुलुंड जोडरस्ताच्या कामाचा तुलनात्मक तक्ता व अन्य बाबींचे सादरीकरण केले.

१७.२५ लघुत्तम निविदाकाराचा आर्थिक देकार अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा जास्त आढळला तरी आय.आय.टी. मार्फत नमूद केल्यानुसार खालील बाबी हया अंदाजपत्रकीय तरतुदींपेक्षा वाढीव असून त्यामुळे प्राप्त लघुत्तम आर्थिक देकार हा स्विकाहार्य आहे असे निविदा शिफारस समितीच्या बैठकीत नमूद केले.

| अ. क्र. | बाब | वाढीव परिणाम टक्क्यामध्ये |
|---|---|---|
| १. | प्रकल्पाचे तपशिलवार संकल्प चित्रासाठींचा शुल्क (design charges) | २% ते ३% |
| २. | अप्रत्यक्ष खर्च जसे की बँक शुल्क, विम्यापोटीची रक्कम इत्यादी. | १% ते २% |
| ३. | युटिलिटी गॅलरीचे प्रगत प्री-कास्ट तंत्रज्ञानाने बांधकाम | ३% ते ४% |
| ४. | शहरातील भूमिगत बांधकाम व मरिन ड्राईव्ह येथे असणारी प्रकल्पाशी संबंधित जोखीमाचे मुल्यमापन | १% ते २% |
| ५. | एकूण परिणाम — आर्थिक देकाराची योग्यता | ७% ते ११% |

१७.२६ वरील बाबींचा सर्वंकष विचार करून मे. लार्सन ॲण्ड टुब्रो लि. या निविदाकाराचा लघुत्तम आर्थिक देकार योग्य आढळल्याचे निविदा शिफारस समितीने नमूद केले. सबब, सदरचा आर्थिक देकार स्विकारण्याबाबत निविदा शिफारस समितीने एकमताने शिफारस केली.

१७.२७ महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, प्रकल्पाच्या ₹८०५६/- कोटी इतक्या एकूण प्रकल्प किंमतीस प्राधिकरणाच्या १५४ व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली होती. सल्लागाराने शिफारस केलेल्या बदलांमुळे प्रकल्पाच्या एकूण किंमतीत सुमारे ₹६८६/- कोटी रुपयांची वाढ झाली. सद्यस्थितीत एकूण प्रकल्प खर्च ₹८७४२ कोटी इतका आहे. या रक्कमेत बांधकाम खर्च, तात्पुरती रक्कम (provisional sum), पर्यावरण सुरक्षा संबंधित तरतूद, लेबर सेस, इन्शुरन्स, भू-संपादन, भाववाढ, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची फी इत्यादी बाबींचा अंर्तभाव आहे. प्रकल्पाचा वाढलेला वाव पहाता प्रकल्पाचा बांधकाम कालावधी ४८ महिन्याऐवजी ५४ महिने इतका करण्यात आला आहे असे महानगर आयुक्तांनी सांगितले.प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत प्रकल्पाच्या एकूण प्रकल्प किंमतीस मान्यता घेण्याचे प्रस्तावित आहे.

१७.२८ मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरीन ड्राईव्ह, मुंबई सागरी किनारा प्रकल्पाच्या दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम व अन्य तदनुषंगीक कामे करण्याकरिता मे.लार्सन ॲण्ड टुब्रो लि. यालघुत्तम निविदाकाराचा सर्व करांसहित व तात्पुरत्या रक्कमेसह असलेला ₹७,७६५,०९,६६,०००/-इतक्या रक्कमेचा आर्थिक देकार रास्त व वाजवी असून कार्यकारी समितीस मान्यतेकरिता सादर करण्यात आला.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४७०:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन)अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभुत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरीन ड्राईव्ह, मुंबई सागरी किनारा प्रकल्पाच्या दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम व अन्य तदनुषंगीक कामे करण्याकरिता मे. लार्सन ॲण्ड टुब्रो लि. या निविदाकाराचा सर्व करांसहित व तात्पुरत्या रक्कमेसह असलेला ₹७,७६५,०९,६६,०००/- (रुपये सात हजार सातशे पासष्ठ कोटी नऊ लाख सहासष्ठ हजार फक्त) इतक्या रकमेचा लघुत्तम देकार स्विकारण्यास व कंत्राटदाराच्या नियुक्तीस मान्यता देण्यास आणि त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.१८: मे. कॅपिटल फोरचून्सव्दारे प्रस्तावित मेट्रो मार्गिका-१ (ML-१) उपक्रमाच्या मूल्यांकनाचे पुनरावलोकन करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याकरिता मान्यता मिळणेबाबत.**

१८.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने (RIInfra) यांनी दिनांक १३ जुलै, २०२० रोजीच्या पत्राद्वारे शासनाला विनंती केली होती की मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने मुं.मे.वन.प्रा.लि. मध्ये रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरच्या

असलेल्या ७४% शेअर होल्डिंगचे अधिग्रहण करावे. कार्यकारी समितीने दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी झालेल्या २६५ व्या बैठकीत, एमएमओपीएलकडून मेट्रो मार्गिका-१ च्या संचालन आणि देखभालीसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्याचा ठराव केला आणि महानगर आयुक्त यांना यासंदर्भातील निर्णय घेण्यासाठी अधिकृत केले. त्यानुसार, मे. कॅपिटल फॉर्च्युन्स प्रा. लि. (मेसर्स अर्बन मास ट्रान्स्पोर्ट कंपनी आणि मेसर्स अनोमा लॉ ग्रुप LLP सह संयुक्त उपक्रम) ची नियुक्ती "मेट्रो मार्गिका-१ कॉरिडॉरचे धोरणात्मक अधिग्रहण" करण्याच्या उद्देशाने मूल्यांकन करण्याच्या कामासाठी करण्यात आली आहे. त्यांनी पुढे असे सांगितले की, मे. कॅपिटल फॉर्च्युन (CF) यांनी त्यांचा मुं.मे.वन.प्रा.लि.(MMOPL) च्या एंटरप्राइझ मूल्याचे निर्धारण संदर्भातील (EV) अंतिम अहवाल सादर केलेला आहे.

१८.२ मे. कॅपिटल फॉर्च्युन (CF) ने त्यांचा मुं.मे.वन.प्रा.लि.(MMOPL)च्या एंटरप्राईझ मूल्याचे निर्धारण संदर्भातील (EV) अंतिम अहवालाचे पुनरावलोकन करण्यासाठी स्वतंत्र सल्लागाराची नियुक्ती करणे आवश्यक आहे. इंडिपेंडंट स्टडी ग्रुप (ISG) च्या अध्यक्षांनी ०८.०८.२०२३ रोजीच्या त्यांच्या टिप्पणीद्वारे कळविले आहे की, ISG च्या संदर्भ व अटींमध्ये (ToR) एमएमआरडीएने नियुक्त केलेला सल्लागार मे. कॅपिटल फॉर्च्युन द्वारे केलेल्या MMOPL च्या एंटरप्राईझ मूल्याचे तपशीलवार पुनरावलोकन करणे इत्यादी आणि इतर गोष्टींचा समावेश आहे. एंटरप्राईझेसचे मूल्य खूप महत्वाचे आणि महत्त्वपूर्ण आहे; आणि ते ISG च्या अहवालाची आधारशिला बनवते. ISG च्या सदस्यांनी या अहवालाबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले होते, त्यापैकी सर्वात महत्त्वाचे म्हणजे एंटरप्राइझ व्हॅल्यूवर येण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतींना दिलेल्या वेटेजबद्दल होते. आणि त्याबाबतीत मिळालेली उत्तरे ही समाधानकारक नाहीत.

त्यांनी पुढे असे सांगितले की, वरील बाबी लक्षात घेता, मे. कॅपिटल फॉर्च्युनने सादर केलेल्या मूल्यमापन अहवालाचे त्याबाबतची गणना आणि कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी योग्य पध्दतीने पुनरावलोकन करणे आवश्यक आहे.

त्यांनी पुढे असे नमूद केले की, या संदर्भात आयएसजीचे अध्यक्ष यांनी मे. क्रॉल ॲडव्हायजरी प्रा. लि., (डफ आणि फेल्प्स वरून रिब्रँड केलेले) यांची स्वतंत्र सल्लागार म्हणून नियुक्ती करण्याचे सूचविले होते. या संदर्भात, मे. क्रॉल ॲडव्हायजरी प्रा. लि., कडून कोटेशन मागविण्यात आले होते.

१८.३ यापुढे त्यांनी सल्लागाराच्या नियुक्तीच्या संदर्भाच्या महत्त्वाच्या बाबी पुढील प्रमाणे आहेत :-

- कामाचे स्वरूप :
  1. मेट्रो मार्गिका-१ चे एंटरप्राइझ मूल्यांकनाचे पुनरावलोकन; आणि
  2. मेट्रो मार्गिका-१ च्या स्थिर मालमत्तेच्या बदली खर्चाचा अंदाज.
- सल्लागाराच्या कामाचा कालावधी : सदर कामाचा कालावधी २ ते ३ आठवड्यांचा असेल.
- कन्सल्टन्सीची फी: रु. २०,६०,०००/- (वस्तू व कराविरहित)

१८.४ चर्चेस अनुसरुन त्यांनी असे नमूद केले की, प्राधिकरणाच्या अधिकारांच्या शिष्टमंडळानुसार (Delegation of Power-DoP) मध्ये नमूद केल्याप्रमाणे महानगर आयुक्त यांना तज्ञांच्या नियुक्तीसाठी प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार आहे. याप्रमाणे मे. क्रॉल ॲडव्हायझरी प्रा. लि. यांची स्वतंत्र सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यासाठी प्राधिकरणाने कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधीन राहून मान्यता दिलेली आहे.

सविस्तर चर्चेनंतर सदर बाबीस मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सहमती दर्शविली.

**निर्णय : त्यानंतर बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४७१:**

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिनियम १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मे. क्रॉल ॲडव्हायझरी प्रा. लि. यांचा रु. २०,६०,०००/-(वस्तू व कराविरहित) एवढ्या किंमतीचा आर्थिक देकार स्विकारण्यास व त्यांची स्वतंत्र सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यास करारनाम्यातील होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास याद्वारे कार्यकारी समिती मान्यता देत आहे.

..८७/-

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.१९: विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत (Extended MUIP) ठाणे-बेलापूर रस्त्यावरुन ऐरोली कटाई नाका उन्नत मार्गावर जाण्यासाठी मार्गिकेचे संकल्पन व बांधकाम ठोक रक्कम (Design-Build Lump-sum) पध्दतीवर करणेकरीता लघुत्तम निविदा स्विकारण्यास मान्यता मिळणेबाबत.**

१९.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातंर्गत रस्त्यांचे बांधकाम व रुंदीकरण तसेच पुलांची कामे हाती घेण्याचे ठरले. त्यानुसार दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १३४ व्या बैठकीत प्रस्तावित १७ कामांकरीता ₹. ३६२८.५१ कोटी रुपयांच्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर कामामध्ये ऐरोली-कटाई नाका मार्ग प्रकल्पाचा अंतर्भाव असून त्यास भूसंपादनाच्या किंमती व्यतिरिक्त ₹. ९४४.२० कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर ऐरोली-कटाई नाका प्रकल्पाच्या भाग-१ व २ साठी ₹. १४४१.३९ कोटी इतक्या वाढीव खर्चाच्या रक्कमेस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या १५३ व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली. सदर रस्त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होण्याच्या दृष्टीने सदर प्रकल्प खालील ३ भागांत विभागण्यात आलेला आहे :-

१) भाग १: ठाणे-बेलापूर रस्ता ते राष्ट्रीय महामार्ग क्र.४: लांबी सुमारे ३.४३ कि.मी.
२) भाग २: ऐरोली पूल ते ठाणे-बेलापूर रस्ता:लांबी सुमारे २.५७ कि.मी.
३) भाग ३: राष्ट्रीय महामार्ग क्र.४ ते कटाई नाका जंक्शन:लांबी सुमारे ६.३० कि.मी.

१९.२ महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, मा. आमदार श्री. गणेश नाईक यांनी प्राधिकरणास दिनांक २५ ऑक्टोबर २०२१ रोजीच्या पत्रान्वये ऐरोली येथे ठाणे-बेलापूर रस्त्यावरून मुलूंडच्या दिशेने चढण्याकरीता व मुलूंडकडून ठाणेच्या दिशेने उतरण्याकरीता मार्गिका बांधण्याबाबत मागणी केली. ठाणे-बेलापूर रस्त्यावरून ऐरोली ते कटाई नाका उन्नत मार्गावर चढण्याकरीता व उतरण्याकरीता स्वतंत्र मार्गिका बांधण्याकरीता शक्याशक्यता अभ्यास

(Feasibility Study) करण्यासाठी तसेच अंदाजपत्रक व नकाशे इ. तयार करणेकरीता नवी मुंबई महानगरपालिकेने मे. आकार अभिनव कन्स्टंट प्रा. लि. यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक केली आहे. सदर कामासाठी लागणारे सल्लागार शुल्क नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत सल्लागारास अदा करण्यात येणार आहे. मे. आकार अभिनव कन्सल्टंट प्रा. लि. यांनी ठाणे-बेलापूर रस्त्यावरून ऐरोली ते कटाई नाका उन्नत मार्गावर चढण्या व उतरण्याकरीता प्रस्तावित स्वंतत्र मार्गिकांबाबत शक्याशक्यता अहवाल (Feasibility Report), अंदाजपत्रक व नकाशे इ. प्राधिकरणास दिनांक २० एप्रिल २०२२ रोजी सादर केले. सल्लागाराने सादर केलेल्या ₹. ९२,१०,१५,२७७/- इतक्या अंदाजित किंमतीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकरीता महानगर आयुक्त यांना सादर करण्यात आला. सदर बाबत महानगर आयुक्त यांनी असे आदेशित केले की,प्रथमत: ठाणे बेलापूर रस्त्यावरुन ऐरोली कटाई नाका प्रकल्पावर चढण्यासाठीच्या मार्गिकेचे (Up ramp) बांधकाम प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात यावे. ऐरोली कटाई नाका रस्ता प्रकल्प व सदर Up ramp चे कामपूर्ण झाल्यावर वाहतूक अभ्यास करावा व तद्नंतर ऐरोली कटाई नाका प्रकल्पावरून ठाणे बेलापूर रस्त्यावर उतरण्याकरीताच्या मार्गिकेचे (Down ramp) बांधकाम हाती घेण्यात यावे. त्याअनुषंगाने ठाणे बेलापूर रस्त्यावरून ऐरोली कटाई नाका उन्नत मार्गावर जाण्यासाठी मार्गिकेचे संकल्पन व बांधकाम तत्वावर ठोक रक्कम पद्धतीवर (Design-Build Lump-sum) करणेच्या कामाचा खर्च, इतर आवश्यक बाबी व सर्व करांसहित एकूण रक्कमेस ₹. ५३,४७,५१,०८७/- (रुपये त्रेपन्न कोटी सत्तेचाळीस लाख एकावन्न हजार सत्याऐंशी फक्त) {वस्तु व सेवाकर, प्रॉव्हीजनल सम व रॉयल्टी करासहीत}मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १५४ व्या बैठकीतदिनांक १० मार्च २०२३ रोजी कार्योत्तर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

१९.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, सदर कामासाठी ऑनलाईन ई-निविदा सूचना प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर तसेच इंग्रजी व मराठी दैनिक वृत्तपत्रांमध्ये दिनांक ८ डिसेंबर, २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या. इच्छुक निविदाकारांसमवेत निविदापूर्व बैठक दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी घेण्यात येऊन त्यांनी बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा खुलासा व सामाईक बदल संच दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आले. निविदाकारांचे तांत्रिक प्रस्ताव (Cover-१) दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी उघडण्यात आले. खालील २ निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या;

१) मे. एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.
२) मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लि.

१९.४ निविदाकारांनी सादर केलेल्या तांत्रिक प्रस्तावांची छाननी करून प्रकल्पाचे सल्लागार मे. आकार अभिनव कन्स्ल्टंट प्रा.लि. यांच्या अहवालानुसार मे. एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. व मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांचे तांत्रिक प्रस्ताव पात्र होत आहेत. अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ रोजी निविदा शिफारस समितीची पहिली बैठक झाली. सदर कामासाठी सल्लागार मे. आकार अभिनव कन्स्ल्टंट प्रा. लि. यांचे अहवालानुसार निविदेतील तांत्रिक अटी व शर्तीची पूर्तता करणारे निविदाकार मे. एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. वमे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लि.यांचे आर्थिक देकार (Cover-२) उघडण्याची शिफारस निविदा शिफारस समितीव्दारे करण्यात आली. तद्नंतर वरील २ निविदाकारांचे आर्थिक देकार (Cover-२) दिनांक १७ मे, २०२३ रोजी उघडण्यात आले. निविदाकारांनी सादर केलेले आर्थिक देकार खालीलप्रमाणे;

| **अ. क्र.** | **निविदाकारांचे नाव** | **आर्थिक देकार (वस्तु व सेवा कर, प्रोव्हीजनल सम व रॉयल्टी शुल्क वगळून) (₹.)** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | मे. एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | ५१,९५,००,०००/- | प्रथम लघुत्तम |
| २ | मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लि. | ५५,००,००,०००/- | व्दितीय लघुत्तम |

उपरोक्त तपशीलानुसार मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचा ₹.५१,९५,००,०००/- किंमतीचा आर्थिक देकार हा प्रथम लघुत्तम असून निविदेमध्ये नमूद अंदाजित रक्कम ₹.४१,३४,४०,६९१/- (वस्तु व सेवा कर, रॉयल्टी शुल्क व प्रोव्हीजनल सम वगळून) पेक्षा २५.६५% अधिक इतक्या दराचा आहे. सदर लघुत्तम देकार हा अधिक्याचा असल्यामुळे निविदा शिफारस समितीच्या दि २४ मे, २०२३ रोजी झालेल्या दुसऱ्या बैठकीत ठरल्यानुसार मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना वाटाघाटी करणेकरीता कळविण्यात आले. त्यानुसार मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी दिनांक २२ मे, २०२३ रोजीच्या पत्राव्दारे त्यांचा देकार कमी करणे शक्य नसल्याचे कळविले.

१९.५ अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांच्या अध्यक्षतेखाली निविदा शिफारस समितीची तिसरी बैठक दिनांक ०४/०८/२०२३ रोजी संपन्न झाली.सदर बैठकीमध्ये मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचा ₹.५१,९५,००,०००/- हा देकार वाजवीपेक्षा जास्त (२५.६५% आधिक्याचा) असल्याने त्यांचेकडून निविदेतील मुख्य बाबींच्या अनुषंगाने दर पृथ:करण

(rate analysis justifying their quote) सादर करावे असे ठरले. मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचेकडून प्राप्त झालेल्या दर पृथ:करणाची छाननी करून सल्लागाराने त्यांचे अभिप्रायासह अहवाल सादर करावा अशी शिफारस समितीने केली. तसेच सदर बैठकीत सल्लागारास प्रकल्पाचे अंदाजपत्रक अदययावत राज्य दरसूचीच्या आधारावर करण्यात आले आहे किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात आली. सदर निविदा प्रपत्रे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये तयार करण्यात आल्याने प्रकल्पाचे अंदाजपत्रक २०२२-२३ च्या राज्य दरसूचीवर आधारित असल्याचे सल्लागाराने नमूद केले. त्याअनुषंगाने अद्ययावत राज्य दरसूचीच्या आधारावर प्रकल्पाचे अंदाजपत्रकाची तुलना करणे आवश्यक असल्याचे मत निविदा शिफारस समितीने व्यक्त केले.

१९.६ मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी त्यांचे दिनांक ८ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रान्वये ₹.४९,९०,००,०००/- इतक्या रक्कमेचा सुधारीत आर्थिक देकार सादर केला. यावर सल्लागाराने त्यांचे दिनांक ९ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केला. मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी दर पृथ:करणार्थ कोणत्याही प्रकारची गणितीय आकडेमोड अथवा त्यास सहाय्यभूत कागदपत्रे न जोडल्यामुळे, याबाबत त्यांना अभिप्राय देणे शक्य होत नाही असे सल्लागाराने त्यांचे अहवालामध्ये नमूद केले. तद्नंतर, प्राधिकरणाने दिनांक १० ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रान्वये मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना त्यांच्या देकाराबाबत दर पृथ:करण (rate analysis justifying their quote) तात्काळ सादर करणेबाबत पृनश्च: कळविले. सदर पत्राच्या अनुषंगाने मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रान्वये दर पृथ:करण सादर केले. सदर दर पृथ:करणावर सल्लागाराने त्यांचे दिनांक ६ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय सादर केले. सन २०२३-२०२४ च्या अद्ययावत दरसूचीवर आधारीत प्रकल्पाची अंदाजित किंमत ₹.४९.१४ कोटी असल्याचेही सल्लागाराने सदरपत्रामध्येनमूद केले आहे. मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचा ₹.४९.९० कोटीचा देकार हा प्रकल्पाच्या सन २०२३-२०२४ च्या अदययावत दरसूचीवर आधारित किंमतीच्या म्हणजेच ₹.४९.१४ कोटी पेक्षा १.५५% इतका अधिक आहे. मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी सादर केलेला अंतिम आर्थिक देकार ₹. ४९.९० कोटी हा वाजवी असून सदर देकार स्विकारण्याची शिफारस सल्लागाराने केली आहे.

१९.७ अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांचे अध्यक्षतेखाली निविदा शिफारस समितीची चौथी बैठक दिनांक ६ सप्टेंबर, २०२३ रोजी झाली. सदर बैठकीमध्ये मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचा, तसेच त्यावर सल्लागाराने सादर केलेल्या अभिप्रायांचा व शिफारशीचा विचार करता ठाणे बेलापूर रस्त्यावरून ऐरोली कटाई नाका उन्नत मार्गावर जाण्यासाठी मार्गिकेचे संकल्पन व बांधकाम ठोक रक्कम पद्धतीवर (Design Build Lump-sum) करणेकरीता मे. एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचा ₹.४९,९०,००,०००/- (वस्तु व सेवाकर, प्रोव्हीजनल सम व रॉयल्टी कर वगळून) इतक्या रक्कमेचा वाटाघाटी अंतीचा सुधारीत लघुत्तम देकार (निविदेतील अंदाजित रक्कम ₹.४१,३४,४०,६९१/- पेक्षा २०.६९% अधिक्याचा) स्विकृती करणेबाबत निविदा शिफारस समितीने शिफारस केली आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र.१४७२:</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ चे उपकलम, (१) व (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या सर्व अधिकारांचा वापर करुन विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत (Extended MUIP) ठाणे-बेलापूर रस्त्यावरून ऐरोली कटाई नाका उन्नत मार्गावर जाण्यासाठी मार्गिकेचे संकल्पन व बांधकाम ठोक रक्कम पद्धतीवर (Design Build Lump-sum) करणेकरीता मे. एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचा ₹.४९,९०,००,०००/- (रुपये एकोणपन्नास कोटी नव्वद लाख फक्त) (वस्तु व सेवाकर, प्रोव्हीजनल सम व रॉयल्टीकर वगळून) इतक्या रक्कमेचा वाटाघाटीअंतीचा सुधारीत लघुत्तम देकार (निविदेतील अंदाजित रक्कम ₹.४१,३४,४०,६९१/- पेक्षा २०.६९% अधिक्याचा) स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.२०:</u>** **<u>अंबरनाथ व कुळगांव – बदलापूर नगरपरिषदा आणि उल्हासनगर महानगरपालिकेसाठी संरचना – बांधणे – चालविणे – हस्तांतरित करणे (DBOT) या आधारावर एकात्मिक घनकचरा प्रक्रियेचे संचालन आणि सुविधेचा विकास करणेबाबतची लघुत्तम निविदा मंजूर करण्याबाबत.</u>**

२०.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी सादरीकरण करुन कार्यकारी समितीस खालील प्रमाणे अवगत केले:

१. अंबरनाथ व कुळगांव-बदलापूर नगरपरिषद या दोन्ही नगरपरिषदांचा एकत्रित घनकचरा व्यवस्थापनाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड (M/s.TUSPL) यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून निविदेद्वारे नियुक्ती केली. त्या अनुषंगाने सल्लागाराने या दोन्ही नगरपरिषदांचा एकत्रित घनकचरा व्यवस्थापनाचा सविस्तर प्रकल्प अहवाल दिनांक ०५.०६.२०२० रोजी अंबरनाथ व कुळगांव-बदलापूर नगरपरिषद या दोन्ही नगरपरिषदांना सादर केला असून या सविस्तर अहवालासाठी भारतीय प्रौद्योगिक संस्था मुंबई (IIT, Bombay) दिनांक ०७.१२.२०२० तांत्रिक मुल्यांकन (Technical Vetting) करण्यात आले आहे.

२. तद्नंतर, उल्हासनगर महानगरपालिकेने सदर एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पामध्ये सहभागी होण्यास सहमती दर्शविल्याने मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड (M/s.TUSPL) यांनी तयार केलेला अंबरनाथ नगरपरिषद, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद व उल्हासनगर महानगरपालिका यांचा एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचा सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला व हा अहवाल अंबरनाथ नगरपरिषदेने दिनांक ०८.०८.२०२२ रोजी प्राधिकरणास सादर केला. सदर प्रकल्पाची तांत्रिकदृष्ट्या भारतीय प्रौद्योगिक संस्था मुंबई (IIT, Bombay) यांनी तपासणी केली व तद्नंतर, दिनांक २६.०८.२०२२ रोजीच्या अंबरनाथ नगरपरिषदेच्या पत्राद्वारे भारतीय प्रौद्योगिक संस्था मुंबई (IIT, Bombay) यांनी सल्लागाराने सदर ३ स्वराज्य स्थानिक संस्थांसाठी तयार केलेल्या एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या सुधारित सविस्तर प्रकल्पाचे तांत्रिक मूल्यांकन (Technical Vetting) केलेला अहवाल प्राधिकरणास सादर केला.

३. अंबरनाथ व कुळगाव-बदलापूर नगरपरिषदा आणि उल्हासनगर महानगरपालिकेसाठी संरचना-बांधणे-चालविणे-हस्तांतरित करणे (DBOT) या आधारावर एकात्मिक घनकचरा प्रक्रियेचे संचालन आणि सुविधेचा विकास करणेबाबतचा अंदाजे प्रतिदिन ६०० टनाचा संयुक्त प्रकल्प आहे. मुंबई महानगर प्रदेशातील कुळगाव-बदलापूर नगरपरिषद क्षेत्रातील सर्व्हे क्र. १८८, मौजे वालीवली येथील २३.८० एकर जागे पैकी १३.४९ एकर जागेवर प्रस्तावित आहे.

**२०.२ त्यापुढे अशी चर्चा झाली की,**

१. मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या दिनांक २०.१०.२०२२ रोजी झालेल्या १५३ व्या बैठकीत, अंबरनाथ व कुळगांव-बदलापूर नगरपरिषदा व उल्हासनगर महानगरपालिकेचा संयुक्त घनकचरा प्रकल्प प्राधिकरणामार्फत राबविण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला व या बैठकीत झालेल्या चर्चेस अनुसरून ठराव क्र. १६२० अन्वये खालील प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे :-

i) प्राधिकरणाने प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग यांना दिनांक १२.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीस अनुसरुन नगर विकास विभागाच्या प्राप्त होणाऱ्या पुढील निर्देशानुसार अंबरनाथ नगरपरिषद, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद आणि उल्हासनगर महानगरपालिका यांचा मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामार्फत एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

ii) अंबरनाथ नगरपरिषद, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद आणि उल्हासनगर महानगरपालिका यांच्या एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामार्फत तांत्रिक मंजूरी देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

iii) एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची निविदा प्रकाशित झाल्यानंतर व प्रकल्पाची प्रत्यक्ष किंमत ठरल्यानंतर आणि भागधारकांच्या जबाबदाऱ्या निश्चित झाल्यानंतर मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाचा सहभाग आणि वास्तविक व्यवहार्यता तफावत निधी (VGF) याकरीता प्राधिकरणाद्वारे अर्थसंकल्पामध्ये वेळोवेळी तरतूद करण्यास याद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

iv) सदर मुद्यांबाबत तसेच, हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**२०.३ त्यापुढे अशीही चर्चा झाली की,**

१. प्राधिकरणाच्या १५३ व्या बैठकीतील ठराव क्रमांक १६२० च्या अनुषंगाने सदर प्रकल्पास प्राधिकरणाच्या अभियांत्रिकी विभागातर्फे दिनांक १८.११.२०२२ रोजी रु. १४८.६८ कोटीच्या रक्कमेच्या प्रकल्पास तांत्रिक मंजुरी देण्यात आली आहे

२. महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार, अंबरनाथ नगरपरिषद, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद व उल्हासनगर महानगरपालिका यांच्या सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालास (Revised DPR) राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या (State Level Technical Committee -SLTC) दिनांक ०१.१२.२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने अंबरनाथ नगरपरिषद, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद व उल्हासनगर महानगरपालिका यांच्या रुपये १४८.३८ कोटी इतक्या किंमतीचा एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**तक्ता -१**

(रुपये कोटीत)

| **प्रकल्पाची मंजूर किंमत डीपीआर नुसार** | **अंबरनाथ नगरपरिषद, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद व उल्हासनगर महानगरपालिका यांचा एकत्रित निधी (स्वच्छ भारत अभियान (ना.) १.० / नपा- मनपा/ स्वनिधी/ शासन निधी/ एमएमआरडीए मार्फत)** | **एमएमआरडीए कडून उपलब्ध होणारा निधी** | **एकूण** |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १४८.६८ | १९.८२ | १२८.८८ | १४८.६८ |

टिप - सदर प्रकल्पाकरीता कुळगाव-बदलापूर नगरपरिषद जागा उपलब्ध करून देत असल्याने त्यांचा हिस्सा निरंक राहील.

“ ४. महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्ती :

४.१ सदर एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची निविदा प्रक्रीयेसंदर्भातील कार्यवाही एमएमआरडीए मार्फत करण्यात यावी.

४.२ निविदा अंतिम झाल्यावर एमएमआरडीए मार्फत सदर प्रकल्पाकरीता गठीत केलेली विशेष प्रयोजन वाहन समिती (Special Purpose Vehicle) ही कार्यान्वयन यंत्रणा राहील.

४.३ घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नुसार सदर प्रकल्पाची अंमलबजावणी विहित कालावधीमध्ये करणे, कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

४.४ प्रकल्पातील ज्या घटकांकरीता स्वच्छ भारत अभियान (नागरी) १.० मध्ये मान्यता देण्यात आली आहे, त्याच घटकांकरीता स्वच्छ भारत अभियान (नागरी) चा निधी वापरता येईल.

४.५ सविस्तर प्रकल्प अहवाल भविष्यातील आवश्यकता विचारात घेवून तयार केलेला आहे. या प्रकल्प अहवालाची अंमलबजावणी सुरू करताना सध्याची आवश्यकता विचारात घेवूनच आवश्यक खरेदी व बांधकामे करण्यात यावीत.

५ शासन निर्णयातील प्रकल्प राबविण्याची कार्यपद्धती:

घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येत असलेल्या एकात्मिक सविस्तर प्रकल्प अहवालाची अंमलबजावणी करताना पुढील प्रमाणे निश्चित केलेले उद्दिष्ट पूर्ण करणे (Outcome base) कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.:-

- ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत निर्मिती करणे अथवा त्यावर वायोमिथेनायझेशन पध्दतीने प्रकिया करणे.
- खत निर्मिती करण्यात येत असेल तर, ओल्या कचऱ्यापासून निर्माण केलेल्या सेंद्रिय खताची FCO मानकानुसार राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या प्रयोगशाळेमधून तपासणी करून घेवून त्यास "हरित महासिटी कंपोस्ट" हा ब्रँड मिळविणे. तसेच या सेंद्रिय खताची "हरित महासिटी कंपोस्ट" या नावाने विक्री करणे.
- सुक्या कचऱ्याचे पदार्थ पुनर्प्राप्ती सुविधा केंद्रावर (Material Recovery Facility) दुय्यम विलगीकरण (Secondary Segregation) करावे. यापैकी पुनर्वापर होऊ शकणाऱ्या सुक्या कचऱ्याचा पुनर्वापर करावा अथवा शक्य असल्यास त्याची विक्री करावी.
- उपरोक्त सर्व प्रक्रियांनंतर शिल्लक राहणाऱ्या उर्वरित कचऱ्याची भराव भूमीवर विल्हेवाट लावणे बंधनकारक राहील."

**२०.४ आणखी अशी चर्चा झाली की,**

१. सदर सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालाच्या आधारे व नीती आयोग मानकाच्या धर्तीवर व DEA, GoI यांच्या PPP प्रकल्पाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तसेच, वर उल्लेखित दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील सर्वबाबी अंर्तभूत करुन मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड (M/s.TUSPL) (अंबरनाथ नगरपरिषदेने या प्रकल्पासाठी नियुक्त केलेला प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) यांनी सदर प्रकल्पासाठी

सिंगल स्टेज दोन लिफाफा (single stage two envelope method) निवड प्रक्रियेचे निविदा विनंती प्रस्ताव तयार केला असून, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण, KfW Development Bank व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांसोबत चर्चा करून, सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता प्राप्त केल्यानंतर ई-निविदा सूचना मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात दिनांक ०५.०२.२०२३ रोजी प्रकाशित करण्यात आली. तसेच, सदर ई-निविदा विनंती प्रस्ताव दिनांक १०.०२.२०२३ रोजी खालील तीन खंडात, महाटेंडर पोर्टलवर प्रकाशित करण्यात आला.

- खंड १-निविदा विनंती प्रस्ताव (RFP)
- खंड २ - सवलत करारनामा (Concession Agreement),
- खंड ३-प्रकल्प माहिती ज्ञापन (Project Information Memorandum)

२. सदर प्रकल्पामध्ये, अंबरनाथ नगरपरिषद, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद आणि उल्हासनगर महानगरपालिका यांच्याद्वारे निर्माण होणाऱ्या मिश्र कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी कुळगाव-बदलापूर नगरपरिषद क्षेत्रातील सर्व्हे क्र. १८८, मौजे वालीवली येथील २३.८० एकर जागेपैकी १३.४९ एकर जागेवर प्रस्तावित असून येथे ६०० टन प्रति दिन मटेरियल रिकव्हरी या करिता संरचना-बांधणे-चालविणे-हस्तांतरित करणे (DBOT) यांचा व्यापकपणे समावेश असून या प्रकल्पामध्ये १२ + ३ महिन्यांचा बांधकाम कालावधी असून १५ वर्षांचे संचालन आणि देखभालीसह, दर वर्षी किमान ३३० दिवस कार्यरत राहून मटेरियल रिकव्हरी सुविधा (MRF) उभारणे याचा समावेश आहे. मटेरियल रिकव्हरी सुविधेद्वारे ("MRF") नगरपालिकेच्या घनकचऱ्याची पूर्व-प्रक्रिया, विलगीकरण आणि पुनर्प्राप्ती या बाबी शक्य होतील.

**२०.५ आणखी पुढे अशी चर्चा झाली की,**

प्राप्त निविदांचे मूल्यांकन करण्यासाठी महानगर आयुक्त यांनी अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे निविदा मूल्यमापन समिती गठीत करण्यात आली.

**तक्ता -२**

| | | |
|---|---|---|
| १. | अतिरिक्त महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | अध्यक्ष |
| २. | वित्त सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | सदस्य |
| ३. | मुख्य अधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद | सदस्य |
| ४. | मुख्य अधिकारी, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद | सदस्य |
| ५. | सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका | सदस्य |
| ६. | प्रमुख, अभियांत्रिकी, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | सदस्य |
| ७. | प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | निमंत्रक |

**२०.६ आणखी पुढे अशीही चर्चा झाली की,**

१. दिनांक २१.०२.२०२३ रोजी सर्व्हे क्र. १८८, मौजे वालीवली येथील प्रत्यक्ष जागेची पहाणी (site visit) संभाव्य निविदाकार, अंबरनाथ व कुळगाव-बदलापूर नगरपरिषद आणि या प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे अधिकारी यांचे सोबत करण्यात आली.

२. सदर निविदेबाबत दिनांक २२.०२.२०२३ रोजी निविदा पूर्व बैठक घेण्यात आली. सदर निविदा पूर्व बैठक, निविदा मूल्यमापन समितीच्या उपस्थितीत, संभाव्य निविदाकार आणि या प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे अधिकारी यांचे सोबत घेण्यात आली.

२०.७ **आणखी अशी चर्चा झाली की,**

१. महानगर आयुक्तांनी एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरिता KfW Development Bank यांचेमार्फत निधी प्राप्त करण्यास मान्यता दिली होती. तद्नंतर, दिनांक १४.११.२०२२ रोजी मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाकडून KfW Development Bank यांना अंबरनाथ नगरपरिषद, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद आणि उल्हासनगर महानगरपालिका यांच्या एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल पाठविण्यात आला व प्राधिकरणातर्फे सविस्तर प्रकल्प अहवालाचा तपशील विचारात घेण्याची विनंती केली.

२. यानंतर, KfW Development Bank यांच्यासोबत सुरु असलेल्या विविध पत्रव्यवहारास व त्यांचेसोबत झालेल्या बैठकीस अनुसरून KfW Development Bank यांनी सदर प्रकल्पाकरिता आर्थिक सहाय्य देण्यास स्वारस्य दर्शविले आहे.

३. निविदा पूर्व बैठकीत व तद्नंतर उपस्थित केलेल्या प्रश्नांचे / मुद्दयांचें स्पष्टीकरण यांस KfW Development Bank यांचेकडून मान्यता प्राप्त केल्यानंतर स्टँडर्ड सेट ऑफ डेव्हिएशन्स (SSD) उपस्थित केलेल्या प्रश्नांचे / मुद्दयांचें स्पष्टीकरण स्टँडर्ड सेट ऑफ डेव्हिएशन्स (SSD) च्या स्वरूपात दिनांक १०.०५.२०२३ रोजी महाटेंडर पोर्टल वर प्रसिद्ध करण्यात आले होते.

२०.८ **आणखी अशीही चर्चा झाली की,**

ई-निविदा विनंती प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक १९.०५.२०२३ पर्यंत होती. तद्नंतर दिनांक २२.०५.२०२३ रोजी सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेनंतर ई-निविदा

प्रक्रियेनुसार निविदा (तांत्रिक प्रस्ताव) उघडण्यात आले व त्यास ५ निविदाकारांचा प्रतिसाद प्राप्त झाला. त्या संबंधित तपशील खालीलप्रमाणे आहे :-

**तक्ता -३**

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | निविदाकाराचा प्रकार |
|---|---|---|
| १ | M/s. R&B Infra Project Limited | एकमेव निविदाकार |
| २ | M/s. Landmark Corporation Pvt. Limited | एकमेव निविदाकार |
| ३ | M/s. Antony Lara Enviro Solutions Private Ltd | एकमेव निविदाकार |
| ४ | M/s. C.D. Transport and Environmental Techno | मुख्य निविदाकार व कंसोर्टियम भागीदार |
| ५ | M/s. Konark Structural Engineers Pvt. Ltd | एकमेव निविदाकार |

२०.९ **आणखी पुढे अशी चर्चा झाली की,**

१. सदर ५ निविदाकारांचा तांत्रिक प्रस्ताव प्राधिकरणामार्फत मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड (M/s.TUSPL) यांना पाठविण्यात आला. निविदा विनंती प्रस्ताव आणि स्टँडर्ड सेट ऑफ डेव्हिएशन्स (SSD) मध्ये नमूद केलेल्या निकषांनुसार आणि निविदेतील अटी व शर्ती नुसार या ५ निविदाकारांनी सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची जसे की, निविदा मूल्य व अनामत रक्कम, संस्थेची नोंदणी, संचालन वर्षे, वार्षिक आर्थिक उलाढाल, निव्वळ नफा आणि घनकचरा प्रक्रिया प्रकल्प व Material Recovery Faciltiy (MRF) ची संरचना आणि बांधकाम या क्षेत्रातील प्रकल्पांच्या उभारणीचा व संचालनाचा अनुभव, तांत्रिक क्षमता इ. या निकषांची मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड (M/s.TUSPL) यांनी छाननी / तांत्रिक पडताळणी केली.

२०.१० **पुढे अशी चर्चा झाली की,**

१. निविदा मूल्यमापन समितीची दिनांक १२.०७.२०२३ रोजी पहिली बैठक होऊन त्यात मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड (M/s.TUSPL) यांनी तयार केलेला छाननी / तांत्रिक पडताळणी अहवाल निविदा मूल्यमापन समितीपुढे सादर केला व त्या अनुषंगाने, निविदा मूल्यमापन समितीच्या शिफारसीनुसार निविदाकारांकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले.

..९९/-

२. **निविदाकारांकडून मागविलेले स्पष्टीकरण व तांत्रिक पडताळणी :**

अ. निविदाकारांचे स्पष्टीकरण प्राप्त झाल्यानंतर मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड (M/s.TUSPL) यांनी प्रस्तावांची छानननी केली व तांत्रिक पडताळणी अहवाल तयार केला.

**२०.११ पुढे अशीही चर्चा झाली की,**

१. निविदा मूल्यमापन समितीची दिनांक १०.०८.२०२३ रोजी दुसरी बैठक होऊन त्यात निविदाकारांचे स्पष्टीकरण प्राप्त झाल्यानंतर मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड (M/s.TUSPL) यांनी तयार केलेला तांत्रिक पडताळणी अहवाल निविदा मूल्यमापन समितीसमोर सादर केला. निविदा विनंती प्रस्तावातील कलम क्र. २.२ मध्ये परिभाषित केलेल्या पात्रता निकषानुसार पात्र ठरलेल्या निविदाकारांचा तांत्रिक मूल्यमापनासाठी विचार करण्यात येईल असे नमूद केले असल्याने, त्यांनी पात्र ठरलेल्या निविदाकारांचे पुढील तांत्रिक मूल्यमापन, प्रस्तावामध्ये अंतर्भूत असलेल्या खालील तक्ता -३ मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार केली:-

**तक्ता -४**

| अ.क्र. | निकष | एकूण गुण |
|---|---|---|
| १ | निविदाकाराची संबंधित आर्थिक क्षमता | १५ |
| २ | प्रकल्पाचा क्षमता | ३० |
| ३ | मुख्य कर्मचाऱ्यांचा संबंधित अनुभव | २० |
| ४ | प्रस्तावित दृष्टिकोन आणि कार्यपद्धती | १० |
| ५ | पर्यावरण सामाजिक आरोग्य आणि सुरक्षा (ESHS) आणि व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य (OSH) व्यवस्थापन या संबंधी विशिष्ट अनुभव | ५ |
| | एकूण | ८० |

२. निविदा मूल्यमापन समितीच्या सदर बैठकीत निविदा विनंती प्रस्तावातील कलम क्र. २.२ मध्ये परिभाषित केलेल्या पात्रता निकषानुसार पात्र ठरलेल्या निविदाकारांचा तांत्रिक मूल्यमापनासाठी विचार करण्यात येईल असे नमूद केले आहे. त्या अनुषंगाने, ५ पैकी दोन निविदाकारांनी (M/s. Antony Lara Enviro Solutions Private Ltd व M/s. C.D.Transport and Environmental Techno) निविदा विनंती प्रस्तावातील कलम क्र. २.२ मध्ये परिभाषित केलेल्या पात्रता निकषांची पूर्तता न केल्याने सदर दोन निविदाकार तांत्रिक मूल्यमापनास अपात्र ठरले.

**तक्ता -५**

| | | R & B Infra Project Limited | Landmark Corporation Pvt. Ltd. | Antony Lara Enviro Solutions Pvt. Ltd. | C.D Transport and Environmental Techno | Konark Structural Engineers Pvt Ltd |
|---|---|---|---|---|---|---|
| **Summary of Bidder's Eligibility** | **Complied in Eligibility Criteria** | 1, 2, 3, 4, 5, 7, 8, 9 & 10. | 1, 2, 3, 4, 6, 7, 8, 9 10 | 1, 2, 3, 4, 6, 8, 9 & 10. | 8 & 9 | 1, 2, 3, 4, 5, 7, 8, 9 & 10. |
| | **Not complied in Eligibility Criteria** | Nil | Nil | 5 | 1, 2, 3, 4, 5, 6, & 10 | Nil |
| | **Conclusion:** | Compliant | Compliant | Non-Compliant | Non-Compliant | Compliant |

३. तसेच, निविदा विनंती प्रस्तावातील सर्व पात्रता निकषांची पूर्तता करणाऱ्या ५ पैकी खालील तक्ता- ६ मध्ये नमूद केलेल्या ३ निविदाकारांना तांत्रिक मूल्यमापनासाठी निविदा मूल्यमापन समितीद्वारे पात्र ठरविण्यात आले होते. त्या संबंधित तपशील खालीलप्रमाणे आहे:-

**तक्ता -६**

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | निविदाकाराचा प्रकार |
|---|---|---|
| १ | M/s. R&B Infra Project Limited | एकमेव निविदाकार |
| २ | M/s. Landmark Corporation Pvt. Limited | एकमेव निविदाकार |
| ३ | M/s. Konark Structural Engineers Pvt. Ltd | एकमेव निविदाकार |

४. निविदा विनंती प्रस्तावातील कलम क्र. ३.५, तांत्रिक प्रस्तावाचे मूल्यमापन व निविदाकारांचे शॉर्टलिस्टिंग- ६, दृष्टिकोन आणि कार्यपद्धती यानुसार मूल्यांकन प्रक्रिया म्हणून पात्र निविदाकाराने निविदा मूल्यमापन समितीपुढे सादरीकरण (२० गुणांसाठी) करावयाचे होते. पात्र निविदाकारांनी दिनांक १८.०८.२०२३ रोजी ऑनलाइन पद्धतीने निविदा मूल्यमापन समिती समोर तपशीलवार सादरीकरण केले.

**२०.१२ आणखी अशी चर्चा झाली की,**

१. निविदा मूल्यमापन समितीची दिनांक १८.०८.२०२३ रोजी तिसरी बैठक होऊन त्यात तक्ता- ६ मध्ये नमूद केलेल्या ३ पात्र निविदाकारांनी मूल्यमापन प्रक्रियेचा भाग म्हणून, निविदा मूल्यमापन समितीपुढे सादरीकरण केले व त्यानुसार निविदा मूल्यमापन समितीने सदर निविदाकारांचे २० गुणांसाठी मूल्यमापन केले.

२. निविदा विनंती प्रस्ताव कलम ३.१, मूल्यमापन प्रक्रिया iii) तांत्रिक मूल्यमापनानुसार, तांत्रिक मूल्यमापनात १०० पैकी ६० किंवा त्यापेक्षा जास्त गुण असतील असे निविदाकार वित्तीय प्रस्तावाच्या मूल्यमापनासाठी पात्र मानले जातील असे नमूद केले आहे.

त्या अनुषंगाने, निविदा मूल्यमापन समितीने सादर केलेल्या दिनांक ३०.०८.२०२३ रोजीच्या तांत्रिक निविदा मूल्यमापन अहवालानुसार, M/s. Landmark Corporation Pvt. Limited यांचे गुण ६० पेक्षा कमी असल्याने निविदा मूल्यमापन समितीने सर्वानुमते त्यांना अपात्र ठरविले. तसेच, M/s. R&B Infra Project Limited आणि M/s. Konark Structural Engineers Pvt. Ltd. या दोन निविदाकारांचे गुण ६० पेक्षा जास्त असल्याने, या दोन निविदाकारांना वित्तीय प्रस्तावाच्या मूल्यमापनासाठी पात्र ठरविले.

**तक्ता -७**

| Sr. No. | Evaluation parameters | Max. Score | Bidder 1 | Bidder 2 | Bidder 3 |
|---|---|---|---|---|---|
| | | | Sole Bidder | Sole Bidder | Sole Bidder |
| | | | M/s.R & B Infra Project Limited | M/s. Landmark Corporation Pvt. Ltd. | M/s. Konark Structural Engineers Pvt. Ltd. |
| 1 | Technical Score (Excluding score presentation) | 80 | **62.50** | **43.50** | **55.50** |
| 2 | Presentation Score | 20 | **10.67** | **7.06** | **8.99** |
| **3** | **Total Score** | **100** | **73.17** | **50.56** | **64.49** |

३. **वित्तीय प्रस्ताव उघडण्यास महानगर आयुक्त यांची मान्यता :**

अ. या बाबत निविदा मूल्यमापन समितीने सादर केलेल्या दिनांक ३०.०८.२०२३ रोजीच्या तांत्रिक निविदा मूल्यमापन अहवालास व तद्नंतर दोन पात्र निविदाकारांचे वित्तीय प्रस्ताव उघडण्याकरिता सादर केलेल्या टिप्पणीस महानगर आयुक्त यांची मान्यता घेण्यात आली.

आ. त्या अनुषंगाने, निविदा मूल्यमापन समितीचा अंतिम तांत्रिक निविदा मूल्यमापन अहवाल KfW Development Bank यांना पाठविण्यात आलेला आहे.

**२०.१३ आणखी अशीही चर्चा झाली की,**

पात्र झालेल्या दोन निविदाकारांचा वित्तीय प्रस्ताव दिनांक ०१.०९.२०२३ रोजी निविदा मूल्यमापन समिती व दोन पात्र निविदाकारांसमक्ष महाटेंडर प्रणालीद्वारे उघडण्यात आल्या. सदर निविदेच्या वित्तीय प्रस्तावाचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

**तक्ता -८**

| **अ. क्र.** | **निविदाकाराचे नाव** | **नवीन घनकचरा सुविधेकरिता, एकात्मिक घनकचरा प्रक्रियेचे संचालन आणि सुविधेचा विकास करणे या करिता निविदाकाराने उद्धृत केलेले शुल्क (प्रति टन)** | **शेरा** |
|---|---|---|---|
| **१** | M/s. R&B Infra Project Private Limited | **₹ २७९.००** | **L१ (लघुत्तम निविदाकार)** |
| **२** | M/s. Konark Structural Engineers Pvt. Ltd. | **₹ ३६०.००** | L२ |

**२०.१४ पुढे आणखी अशी चर्चा झाली की,**

प्राधिकरणाने सदर निविदेच्या वित्तीय प्रस्तावाचा तपशील, सल्लागार मे. टंडन अर्बन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड (M/s. TUSPL) यांना दिनांक ०१.०९.२०२३ रोजीच्या ई-मेलद्वारे सादर केला. त्यास अनुसरून, त्यांना वित्तीय प्रस्तावाचा तपशीलावर अहवाल सादर करण्याची विनंती केली.

**२०.१५ पुढे आणखी अशीही चर्चा झाली की,**

१. निविदा मूल्यमापन समितीची दिनांक ०६.०९.२०२३ रोजी चौथी बैठक होऊन त्यात सल्लागाराने वित्तीय प्रस्तावाचा अहवाल तयार करून सदर अहवाल निविदा मूल्यमापन समिती समोर दिनांक ०६.०९.२०२३ रोजी सादर केला.

२. मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड यांनी निविदा मूल्यमापन समिती समोर सादर केलेल्या प्रारूप वित्तीय प्रस्तावाच्या विश्लेषण अहवालानुसार M/s. R&B Infra Project Limited हे वित्तीय प्रस्तावानुसार लघुत्तम निविदाकार असल्याचे दिसून आले व लघुत्तम निविदाकारासोबत वित्तीय प्रस्तावाबाबत वाटाघाटी करण्याचे ठरले.

३. निविदा मूल्यमापन समितीने केलेल्या वाटाघाटीनुसार M/s. R&B Infra Project Limited यांनी ₹ २७९/- प्रति टन दराऐवजी ₹ २४८/- प्रति टन दर इतक्या शुल्काचा सुधारित वित्तीय प्रस्ताव सादर केला.

४. सदर M/s. R&B Infra Project Limited यांनी सादर केलेला ₹ २४८/-प्रति टन दर इतक्या शुल्काच्या सुधारित वित्तीय प्रस्तावाच्या अनुषंगाने, मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड (M/s.TUSPL) यांनी सादर केलेल्या दिनांक ०७.०९.२०२३ रोजीच्या सुधारित अंतिम वित्तीय प्रस्तावाच्या विश्लेषण अहवालानुसार M/s. R&B Infra Project Limited हे लघुत्तम पात्र निविदाकार असल्याने यांना प्राधान्यकृत निविदाकार (preferred bidder) ठरविण्याबाबत शिफारस केली.

५. निविदा मूल्यमापन समितीने सल्लागाराला निविदेच्या छाननीसाठी, स्पष्टीकरणे घेणे व योग्य ते स्पष्टीकरण प्राप्त करून प्राधिकरणास अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. समितीने पुढे असे ही स्पष्ट केले की, प्राधिकरण दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे निविदाकाराला मोबदला देईल व निविदाकाराला सदर शासन निर्णयाव्यतिरिक्त केलेल्या खर्चापोटी मोबदला देणार नाही. तसेच, अंतिम वाटाघाटी करून ठरलेली रु. २४८/- प्रति टन ही रक्कम निविदा विनंती प्रस्तावाप्रमाणे व शासन निर्णयाप्रमाणे, स्थानिक स्वराज्य संस्था व निविदाकाराला बंधनकारक राहील. तसेच, निविदाकाराने सादर केलेले वित्तीय मॉडेल हे सूचक (indicative) मानले जाईल व ते प्राधिकरणावर बंधनकारक असणार नाही, परंतू, रु. २४८ /- प्रति टन ही रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थांना निविदाकाराला देणे मात्र बंधनकारक राहील. सल्लागाराने निविदाकारांनी सादर केलेल्या निविदेतील वाढीव भांडवली अनुदानाबद्दलचे खालील तक्ता व स्पष्टीकरण सादर केले आहे.

**तक्ता — ९**

| Particulars | As per Government Grant Estimate (Based on 2021-22 SOR and Quotation) | Quoted by R & B Infra Project Limited (L1) | Difference between Quoted L1 bid and estimate |
|---|---|---|---|
| Plant and machinery | 101.51 | 100.90 | -0.61 |
| Vehicles | 2.72 | 3.26 | 0.54 |
| Building and Civil Works | 41.77 | 53.31 | 11.54 |
| SLF | 1.68 | 2.06 | 0.38 |
| IEC | 0 | 1.00 | 1.00 |
| **Total Capital Cost** | **147.68** | **160.52** | **12.84** |
| Financial Charges | 0.00 | 4.82 | 4.82 |
| Contingency | 0.00 | 6.42 | 6.42 |
| **Total Capex plus Contingency and Financial charges** | **147.67** | **171.75** | **24.08** |

६. सदर वाढीव किंमतीबाबत निविदाकाराने सादर केलेले स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे:

i) इमारत आणि पायाभूत सुविधांच्या खर्चामध्ये वाढीव खर्चाचे प्रमुख कारण म्हणजे प्रकल्प स्थळाचे सपाटीकरण (साइटचे लेव्हलिंग) आणि यंत्रसामग्रीची पायाभूत आवश्यकता आणि सुविधेच्या संरक्षणासाठी जागा बंदिस्त करणे.

ii) निविदाकाराने प्राधिकरणाचे अंदाजपत्रक हे वर्ष २०२१-२०२२ च्या दरानुसार असून ते वर्ष २०२२-२३ च्या दारपत्रकाप्रमाणे असणे गरजेचे आहे असे स्पष्टीकरण दिले आहे.

iii) तसेच, निविदाकाराने रु. १ कोटी खर्च सार्वजनिक घटकांसाठी (Public Sensitization) आणि IEC (Information Education & Communication) करीता जोडला आहे.

iv) निविदाकाराने २४-२५अंश सेल्सिअस दरम्यान खोलीचे तापमान असलेल्या बंदिस्त दरवाजाच्या RDF इमारतीचे बांधकाम विचारात घेतले आहे.

v) या व्यतिरिक्त रु. ६.४२ कोटी (४ %) आकस्मिकता आणि रु. ४.८२ कोटी (३%) आर्थिक शुल्काचा वित्तीय मॉडेलमध्ये निविदाकाराद्वारे विचार करण्यात आला आहे. अशा प्रकारे, प्रकल्पाची एकूण भांडवली किंमत रु. १७१.७५ कोटी इतकी आहे.

vi) हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर निविदाकाराने तंत्रज्ञानाचे हस्तांतरण (Technology Risk Transfar) करायचे असल्याने व अंतिम १०% रक्कम ४८ महीन्यांनतर दिली जाणार असल्याने प्रकल्पाची एकूण भांडवली किंमत रु. १७१.७५ कोटी एवढी मानण्यात आली आहे.

७. निविदाकाराने सादर केलेली रु.२७९/- या दराप्रमाणे येणारा सुधारीत IRR १४ % असून तो रु. २४८/- या दराप्रमाणे १२% इतके होईल असे सल्लागाराने नमूद केले आहे.

८. निविदा मूल्यमापन समितीच्या दिनांक ०८.०९.२०२३ रोजीच्या वित्तीय प्रस्तावाच्या अहवालानुसार सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरीनंतर M/s. R&B Infra Project Limited यांचा लघुत्तम निविदाकार म्हणून ₹ २४८/- प्रति टन इतक्या शुल्काचा सुधारित वित्तीय प्रस्ताव स्विकारण्यास व त्यांना प्राधान्यकृत निविदाकार (preferred bidder) म्हणून स्विकारण्याची शिफारस केली आहे.

९. निविदा मूल्यमापन समितीने तयार केलेल्या वित्तीय प्रस्तावाच्या अहवालास व M/s. R&B Infra Project Limited यांचा लघुत्तम निविदाकार म्हणून ₹ २४८/- प्रति टन इतक्या शुल्काचा सुधारित वित्तीय प्रस्ताव व त्यांना प्राधान्यकृत निविदाकार (preferred bidder) म्हणून सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेच्या अधीन राहून स्वीकारण्यास तसेच, M/s. R&B Infra Project Limited यांना निविदा विनंती प्रस्ताव व दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून लेटर ऑफ अवॉर्ड (LOA) देण्यास व त्याबाबतच्या कार्यकारी समितीसमोर सादर करावयाच्या बाब टिप्पणीस महानगर आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे.

१०. महानगर आयुक्त यांनी पुढे असे नमूद केले की, महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे सदर प्रकल्पाकरिता रु. १४८.६८ कोटी इतका भांडवली निधी मंजूर असून, निविदा विनंती प्रस्तावाप्रमाणे सदर प्रकल्पाचा भांडवली खर्च रु.१४७.६८ कोटी इतका नमूद केला आहे. या प्रकल्पासाठी निविदाकाराने प्रकल्पाच्या भांडवली खर्चाकरिता दिलेल्या देकारानुसार प्रकल्पाची भांडवली किंमत रु. १७१.७५ कोटी इतकी आहे. तरीही या प्रकल्पाकरिता मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाकडून उपलब्ध होणारा निधी हा महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार रु.१२८.८८ कोटी इतका कमाल असेल व वरील शासन निर्णयात नमूद केल्यानुसार अंबरनाथ व कुळगाव-बदलापूर नगरपरिषदा आणि उल्हासनगर महानगरपालिका यांचा एकत्रित निधी हा रु. १९.८२ कोटी असून एकूण निधी हा रु.१४८.६८ कोटी (रु.१२८.८८ कोटी + रु.१९.८२ कोटी) इतका असेल.

११. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही नमूद केले की, अंतिम वाटाघाटी करून ठरलेली रु.२४८/- प्रति टन ही रक्कम निविदा विनंती प्रस्तावाप्रमाणे व शासन निर्णयाप्रमाणे, स्थानिक स्वराज्य संस्था व निविदाकाराला बंधनकारक राहील. तसेच, निविदाकाराने सादर केलेले वित्तीय मॉडेल हे सूचक (indicative) मानले जाईल व ते प्राधिकरणावर बंधनकारक असणार नाही, परंतू, रु. २४८/- प्रति टन ही रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थांना निविदाकाराला निविदेतील अटी व शर्तींच्या अधीन राहून देणे मात्र बंधनकारक राहील.

**२०.१६ बाब टिप्पणीमधील मुद्दे विचारात घेता खालील प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मंजुरीसाठी सादर:**

अंबरनाथ व कुळगाव-बदलापूर नगरपरिषदा आणि उल्हासनगर महानगरपालिकेसाठी संरचना-बांधणे-चालविणे-हस्तांतरित करणे (DBOT) या आधारावर एकात्मिक घनकचरा प्रक्रियेचे संचालन आणि सुविधेचा विकास करणेबाबतची लघुत्तम निविदा मंजूर करण्याबाबत कार्यकारी समितीस विनंती करण्यात येत आहे.

१. अंबरनाथ व कुळगाव-बदलापूर नगरपरिषदा आणि उल्हासनगर महानगरपालिकेसाठी संरचना-बांधणे-चालविणे-हस्तांतरित करणे (DBOT) या आधारावर एकात्मिक घनकचरा प्रक्रियेचे संचालन आणि सुविधेचा विकास करणे याकरिता, M/s. R&B Infra Project Limited यांची सुधारित शुल्क ₹ २४८/- प्रति टन प्रक्रिया, परिचलन व देखभाल शुल्क (O&M Charges) असलेली प्रथम लघुत्तम निविदा स्विकृत करण्यास व त्यांना प्राधान्यकृत निविदाकार (preferred bidder) म्हणून स्वीकारण्यास तसेच, M/s. R&B Infra Project Limited यांना निविदा विनंती प्रस्ताव व दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून लेटर ऑफ अवॉर्ड (LOA) देण्याच्या प्रस्तावास विनंती करण्यात येत आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४७३:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत व त्यास सहाय्यभुत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे अंबरनाथ व कुळगाव-बदलापूर नगरपरिषदा आणि उल्हासनगर महानगरपालिकेसाठी संरचना-बांधणे-चालविणे-हस्तांतरित करणे (DBOT) या आधारावर एकात्मिक घनकचरा प्रक्रियेचे संचालन आणि सुविधेचा विकास करणे याकरिता, M/s. R&B Infra Project Limited यांची सुधारित शुल्क ₹ २४८/- प्रति टन प्रक्रिया, परिचलन व देखभाल शुल्क (O&M Charges) असलेली प्रथम लघुत्तम निविदा स्विकृत करण्यास व त्यांना

प्राधान्यकृत निविदाकार (preferred bidder) म्हणून स्वीकारण्यास तसेच, R&B Infra Project Limited यांना निविदा विनंती प्रस्ताव व दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून लेटर ऑफ अवॉर्ड (LOA) देण्याच्या प्रस्तावास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२१: मेट्रो मार्ग-२ब मधील पॅकेज क्र. सीए-१०१ (डि .एन.नगर ते एम.टी.एन.एल,बीकेसी) च्या स्थापत्य बांधकामाच्या करारनाम्यातील टायपोग्राफिकल त्रुटीमुळे होणाऱ्या वाढीव खर्चास व करारनाम्यातील पूर्वीचे सूत्र Vs= q x R x (Ws-Wo)/Ws बदल करून Vs = q x R x (Ws-Wso)/Wso असे करण्यास मंजूरी देणेबाबत.**

२१.१ मेट्रो मार्ग २ब प्रकल्पातील पॅकेज क्र. सीए-१०१ च्या स्थापत्य बांधकामाच्या करारनाम्यातील भाववाढीच्या (Price Variation, Escalation) तरतूदीबाबत महानगर आयुक्त यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली : -

करारनाम्यात भाववाढीसाठी तरतूद (Special Conditions of Contract (SCC) 35, Sub-Clause11.1.3) खालील प्रमाणे आहे: -

**"SCC, Cl. No. 35, (11.1.3)": -**

*The rates as per the accepted Bill of Quantities shall be applicable till the completion of the Work and will be varied only to the extent of permissible price variation under this Clause. However, this adjustment shall be to the extent that full compensation for any rise or fall in costs to the Contractor is not covered by the Price variation formula, the rates in the accepted Bill of Quantities shall be deemed to include amounts to cover the contingency of such rise or fall in costs.*

*The price variation will be payable only on the Indian currency component (no adjustment for Foreign currency component) of the Contract Price as per the follow price variation formula.*

*Payment as per the contract shall be subject to adjustment in accordance with the following Price Variation formula, and other terms given herein, to provide for*

*variation in the market rates of inputs like labour, materials and fuel / energy during the currency of the Contract:*

***V= Vl + Vs + Vc + Vf + Vm***

*Where,* *V* = *Total adjustment on account of all factors*

*Vl* = *Adjustment on account of labour component*
= *p x R x (I − Io) / Io*

*Vs* = *Adjustment on account of Steel component*
= *q x R x (Ws − Wso) / Ws ..............................................(अ)*

*Vc* = *Adjustment on account of Cement component*
= *r x R x (Wc − Wco) / Wco*

*Vf* = *Adjustment on account of Fuel/Lubricant component*
= *s x R x (Wf − Wfo) / Wfo*

*Vm* = *Adjustment on account of Machinery and Machine Tools*
= *t x R x (Wm − Wmo) / Wmo*

*p* = *Cost Coefficient of Labour to the Total Cost= 0.22*

*q* = *Cost Coefficient of Steel to the Total Cost= 0.25*

*r* = *Cost Coefficient of Cement to the Total Cost= 0.15*

*s* = *Cost Coefficient of Fuel and Lubricant to the Total Cost = 0.05*

*t* = *Cost Coefficient of Machinery and Machine Tools to the Total Cost = 0.18*

***Note**: p+ q + r + s + t = 0.85, balance 0.15 shall be fixed component*

*R* = *Gross value of the work done by the Contractor for the period of work under consideration, after excluding there from the cost of any materials supplied free or at fixed rate to the Contractor.*

*Wso* = *All India Price Index (with base Oct' 2012=100) for Reinforcement bars (TMT500) for primary manufacturers, issued by Central Public Works Department (CPWD) for the month in which the tender was opened.*

*Ws* = *All India Price Index (with base Oct' 2012=100) for Reinforcement bars (TMT500) for primary manufacturers, issued by Central Public Works Department (CPWD) for the period of work under consideration.*

२१.२. उपरोक्त तरतूदीत (अ) येथील लोखंडाच्या भाववाढीसाठी महानगर आयुक्त यांनी पुढे असे देखील नमुद केले की, पॅकेज सी-१०१ कंत्राटामध्ये लोखंड (स्टील) या घटकासाठीचे टंकलेखातील त्रुटीमुळे सूत्र Vs= q x R x (Ws-Wso)/**Ws** असे नमूद आहे. परंतु, प्राधिकरणाच्या विविध पकल्पांमध्ये व सदर कंत्राटांमध्ये लोखंड (स्टील) हा घटक सोडुन इतर सर्व घटकांची सूत्रे V= q x R x (W-Wo)/Wo याप्रमाणे आहेत. सबब सदर सुत्र सुधारणे आवश्यक आहे.

२१.३. महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कंत्राटातील उपरोक्त त्रुटी सुधारणेसाठी प्रकल्पाचे कंत्राटदार मे. जे कुमार इन्फ्रास्ट्रप्रोजेक्ट्स लि. यांचेकडून दि. १६.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये विनंती प्राप्त झाली होती. त्यानुसार साधारण सल्लागार यांनी सदर सुत्रात दुरूस्ती करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणास सादर केला आहे.

त्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या सामान्य सल्लागारांमार्फत दि. ०७.०६.२०२३ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार प्रकल्प पूर्ण होईपर्यंत लोखंडासाठीच्या भाववाढीच्या सुत्रात बदल केल्याने प्राधिकरणास एकूण अंदाजित रक्कम रुपये ४५,११,१९,४२५/- (रु. पंचेचाळीस कोटी अकरा लाख एकोणवीस हजार चारशे पंचवीस) (Ws निर्देशांक, मे २०२३ प्रमाणे) एवढा आर्थिक भार पडू शकतो अशी माहिती दिली.

२१.४. महानगर आयुक्त यांनी कार्यकारी समितीस पुर्वीचे सूत्र Vs= q x R x (Ws-Wo)/**Ws** बदल करुन Vs = q x R x (Ws-Wso)/**Wso** असे करण्यास मंजुरी देण्यासाठी विनंती केली.

२१.५. उपरोक्त बाबत समितीच्या सदस्यांमध्ये चर्चा करताना अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी संक्षिप्त स्वरूपात भाववाढीसाठीच्या परिगणनेचे विविरण सादर केले. तद्नंतर कार्यकारी समितीच्या सदस्यांनी अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांना सदर पॅकेज सी-१०१ च्या कंत्राटाचे स्वाक्षरीकृत करारनामाबद्दल विचारणा केली. त्यानुषंगाने अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी पुष्टी केली की, सदर करारनाम्यावर स्वाक्षरी करण्यात आली आहे. कार्यकारी समितीच्या सदस्यांनी चर्चा करून स्वाक्षरीकृत करारनाम्यात बदल करणे योग्य नाही असे नमूद केले व सदर प्रस्ताव अमान्य करण्यात आला.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव कार्यकारी समितीकडून अमान्य करण्यात आला.**

**बाब क्र.२२: मेट्रो मार्ग ९ व ७अ (सीए - ४८) च्या करारनाम्यातील टायपोग्राफिकल त्रुटीमुळे होणा-या वाढीव खर्चास व करारनाम्यातील सूत्र Vs = Adjustment on account of steel component = q x R x (Ws-Wso)/Wso बदलण्यास मंजूरी देणेबाबत.**

२२.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केल कि, मेट्रो मार्ग ९ व ७अ यांस प्राधिकरणाच्या दि. २९ मार्च २०१७ रोजीच्या १४२ व्या बैठकीत तसेच मंत्रीमंडळाच्या दि. ११ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत व दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१८ च्या नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक एमआरडी-३३१७/प्र.क्र.१३८/ नवि-७, अनुसार

अंदाजित केलेल्या ₹ ६,६०७ कोटी मुळ किंमतीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मुंबई मेट्रो मार्ग-९ (दहिसर ते मिरा भाईंदर) व मुंबई मेट्रो मार्ग -७अ (अंधेरी ते सीएसएमआयए) साठी मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांच्या अंदाजपत्रकीय किंमत, रु. १८१३.१७ कोटी पेक्षा १०.२०% जास्त म्हणजे रु. १९९८.०० कोटी एवढा लघुत्तम देकाराची ई-निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य अर्थिक बदलासह अधिदान करण्यास कार्यकारी समितीच्या दिनांक ०५.०९.२०१९ रोजी झालेल्या २६२ व्या बैठकीत मान्यता देण्यात आली असून मेट्रो मार्ग ९ चे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून सद्य:स्थितीत प्रकल्पाचे काम सुमारे ६५% पुर्ण झाले आहे.

२२.२ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत अधिक माहिती देताना असे सांगितले की, कोणतीही दरवाढ सूची ठरविताना खालील सूत्र वापरले जाते: V= q x R x (W-Wo)/Wo यात W = आरबीआयनुसार चालू निर्देशांक असतात व Wo = आरबीआयनुसार आधार निर्देशांक असतात. CVC व FIDIC च्या मार्गदर्शन तत्वान्वये तसेच प्राधिकरणाच्या विविध प्रकल्पामध्ये व सदर कंत्राटांमध्येही स्टील सोडून बाकीच्या सर्व घटकांची सूत्रे V= q x R x (W-Wo)/Wo याप्रमाणेच असून स्टीलचे सूत्र Vs= q x R x (Ws-Wso)/Ws टाइपिंग त्रुटीमुळे चुकले असल्याने सदर सूत्र बदलणे गरजेचे आहे.

२२.३ सविस्तर चर्चेनंतर कार्यकारी समितीने नमूद केले की, या टप्प्यावर कोणताही बदल हा करारातील बदल असेल तसेच या टप्प्यावरील सूत्र बदल निविदेच्यावेळी न केल्यामुळे उर्वरित निविदाकारासाठी अन्यायकारक होईल. सदर सूत्र बदलल्यामुळे मोठ्या आर्थिक परिणामांना सामोरे जावे लागेल व सदर सूत्र सांक्षाकित करारनाम्यात असल्याने त्यात बदल करणे तांत्रिकदृष्ट्या योग्य नाही. वरील विविध बाबी लक्षात घेता कार्यकारी समितीने बाब टिपण्णीतील प्रस्ताव अमान्य केला आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव कार्यकारी समितीकडून अमान्य करण्यात आला.**

**बाब क्र.२३: मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल - दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२२ ते दिनांक ३१ मार्च, २०२३**

२३.१ महानगर आयुक्त यांनी मुंबई नागरी विकास प्रकल्प –फिरता निधीबाबत संक्षिप्त माहिती दिली.

२३.२ दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत ह्या निधीत अंशदान, कर्ज परतफेड आणि ठेवी व कर्जावरील व्याज तसेच भांडवलीकृत व्याज असे एकूण ₹२१६७.१६ कोटी पैकी एकूण ₹१४५६.४८ कोटी कर्ज स्वरूपात व ₹१.१६ कोटी अनुदान स्वरूपात वितरित करण्यात आले आहे. कर्ज व अनुदान वितरित केल्यानंतर निधीतील निव्वळ शिल्लक ₹३५४.३२ कोटी आहे. अहवालाधीन काळात कोणतेही वितरण केले गेले नाही. अहवालाधीन सहामाहीमध्ये विविध संस्थांकडून कर्ज परतफेडीची ₹५३०.९८ कोटी इतकी रक्कम (मुळ रक्कम, व्याज व विलंब देय आकार) येणे होती, त्यापैकी ₹१३.७१ कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली.

२३.३ भिवंडी – निजामपूर महानगरपालिका व उल्हासनगर महानगरपालिकाकडून अनुक्रमे ₹३४.४८ व ₹१३.९२ इतके तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळकडून ₹४९८.८६ इतकी रक्कम थकविली आहे.

२३.४ त्यानंतर यासंदर्भात अशी चर्चा झाली की, थकविलेले हप्ते परत करण्यास तसेच पुढील परतफेड हप्ते नियमितपणे चालू ठेवण्याकरिता सदर महानगरपालिकेला निर्देश देणेबाबत प्राधिकरणामार्फत नगर विकास विभाग (२) यांना विनंती करण्यात यावी तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास प्राधिकरणास निर्देश देणेबाबत नगर विकास विभाग (१) यांना विनंती करण्यात यावी.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र.१४७४:</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ (इ) व ४६ अ अन्वये प्राप्त झालेल्या व त्यास यासंबंधी सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून थकविले हप्ते परत करण्यास तसेच पुढील परतफेड हप्ते नियमितपणे चालू ठेवण्याकरिता संबंधित महानगरपालिकांना निर्देश देणेबाबत प्राधिकरणामार्फत नगर विकास विभाग (२) यांना विनंती करण्याचे तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास प्राधिकरणास निर्देश देणेबाबत नगर विकास विभाग (१) यांना विनंती करण्यात यावी.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील विषया संदर्भात आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*****